
# श्री साईलीला



प्रिल १९६८ : रामनवमी विशेषांक किंमत ७५ पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर,

टे. नं. ३५५७३१

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

ग्रंथ वाचल्यानें आपला कार्यभाग साध्य होत नाहीं. जें वाचलें तें आपल्या कृतींत उतरलें पाहिजे. त्या ग्रंथांतील भावार्थाचा आपण निदिध्यास घेतला पाहिजे. तसें घडलें नाहीं तर पुस्तकीज्ञान व्यर्थ होय. तुम्हीं वेद वाचा, उपनिषदें वाचा, गीता वाचा किंवा रामायण, महाभारत वाचा जें आचरणांत येईल तेवढें तुमचें. बाकीचें त्या ग्रंथाचें. तें केवळ ग्रंथांत गडप होऊन रहायचें. तुम्हीं कोरडे पाषाण! असें होतां कामा नये,

—श्रीसाईसच्चरित्


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] एप्रिल १९६८ [ अंक १ ला

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह)

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

भारतांत मर्यादा—पुरुषोत्तम रामचंद्र यांचा जन्म होऊन व रामराज्य होऊन शेकडो नव्हे तर कांहीं हजार वर्षे लोटली तरीही प्रतिवर्षी रामजन्मचा सुखसोहळा व त्यामुळें मिळणारा आनंद हिंदु समाज अव्याहत लुटीत आला आहे. कोणत्याही दृष्टीनें पहातां रामाची तुलना कोणाशींही करता येणार नाहीं. असा हा अतुलनीय महापुरुष भारतांत होऊन गेला हे खरोखर भारतीयांचें महाभाग्य होय.

श्री साईबाबानीं शिरडींत रामजन्माच्या उत्सवास महत्त्व दिलें यांतील इंगित काय हें ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राम हा सर्वव्यापी आहे. प्रत्येकाच्या अंतःकरणांत त्या नावाला आत्यंतिक मानाचें स्थान आहे. गेल्या हजारो वर्षांपासून रामस्मरणामुळें हिंदु जनतेला मोठा आधार मिळत आला आहे. कोणताही प्रसंग असो. मनाला दिलासा देणारा, आराम देणारा, जर कोणता पवित्र शब्द असेल तर तो राम हाच होय.

राम चरित्र काय शिकवितें! आदर्श पुत्र कसा असवा, आदर्श बंधू कसा असावा, अदर्श पति कसा असावा आदर्श योद्धा कसा असवा, आदर्श मित्र कसा असवा नि आदर्श; राजा कसा असावा तर श्रीरामासारखा प्रत्येक बाबतींत श्रीराम चंद्रानें उच्चांत उच्च आदर्श आमच्यापुढें ठेविला आहे. आमच्या जीवनांत रामाचें स्थान अनन्यसाधारण आहे. आमची घडवणूक गेल्या हजारो वर्षांपासून राम—चरित्र करीत आलें आहे.

राम हे दोन शब्द; परंतु त्यांत केवढीं जादु भरलेली आहे. ती किमया शब्दांनी वर्णन करून सांगतां येण्यासारखी नाहीं. राम हेंच आमचें जीवन सर्वस्व आहे. ते दोन शब्द भरलेले आहेत. त्या महामंत्राचा ज्यानें ध्यास घेतला, त्या नावाला जो चिकटला, तें नाम हेंच ज्यानें आपलें सर्वस्व केलें तो सुखी झाला.

रामनाम हें सर्व पापांचा नाश करणारें व तुम्हांला निर्भय करून तुमच्याकडून जगांत पराक्रम करवून घेणारें अमोघ शस्त्र आहे.

अशा श्रीरामचंद्राचा उच्च आदर्श सर्वांनीं आपल्यापुढें ठेवावा, प्रत्येकानें

त्याची आठवण करावी व जन्माला येऊन त्या जन्माचें सार्थक करावें, हीच श्रीराम-जन्माचा सोहळा चालू करण्यामागें साईबाबांची अपेक्षा होती.

यावरून बाबांची लोककल्याण साधण्याची दृष्टि दिसून येते. ती आपण ओळखली पाहिजे नि श्रीरामाचा उच्च आदर्श सदैव दृष्टीपुढें ठेऊन वागलें पाहिजे.

त्याच उद्देशानें साई-लीला मासिकाचा रामनवमी विशेषांक दर वर्षी प्रसिद्ध करण्यांत येत असतो.

प्रिय वाचक ! या अंकांत श्रीरामासंबंधानें विविध दृष्टिकोनांतून लिहिलेले लेख प्रसिद्ध करण्यांत येत आहेत! आमच्या अनेक लेखक मित्रांस आम्हीं विनंती केल्यावरून लेख लिहून पाठविले याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद त्यांच्याकडून घडलेली ही एक पवित्र सेवा आहे. ती करण्याची श्रीसाईबाबांनीं आमच्या लेखकबंधूना प्रेरणा दिली. वाचकांनीं हीं सेवा गोड मानून घ्यावी हीच प्रार्थना.

—संपादक



## शिरडी येथील श्री रामनवमी उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथील श्री रामनवमी उत्सव सालाबादप्रमाणें मि॥ चैत्र शु॥ ८ शके १८९० शनिवार दि. ६-४-१९६८ पासून श्रीक्षेत्र शिरर्डी येथें सुरू होईल. त्याची समाप्ति मंगळवार दि. ८-४-१९६८ रोजीं आहे.

म्हणून नम्र विनंती कीं आपण आपल्या कुटुंबीय मंडळींसह मित्रमंडळींना घेऊन श्रींच्या तीर्थप्रसादास यावें आणि बाबांचा आशीर्वाद घ्यावा, अशी संस्थानतर्फे विनंति आहे.

श्री साईबाबांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्तानें

# श्री साईबाबा फौन्डेशन

स्थापन झाला असून त्यासाठीं निधी जमवीत आहों. आपणाकडून त्यासाठीं खास सहाय्य यावें अशी अपेक्षा आहे.

या खेरीज हॉस्पिटल, बालविभाग, शिक्षण व इमारतीसाठीं निधी गोळा होतो. आपल्या इच्छेप्रमाणें रक्कम विशिष्ट कार्यासाठीं देण्याची कृपा करावी.

कायम फंडाचे सभासद :

आश्रयदाते—रु. ५०० किंवा अधिक (एका रकमेनें)

आजीव— रु. १००—४९९ ,,

मेंबर— दर साल रु. ५

# प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

लेखक : सदानंद चेंदवणकर

**श्री. सदानंद चेंदवणकर या धार्मिक विषयांवर नि स्थलांवर सतत लिहिणाऱ्या लेखकास कोण ओळखत नाहीं? अष्ट विनायक प्रसिद्ध गणेशस्थानें, पं. सातवळेकर चरित्र वगैरे सुमारें ३०।३५ छोटी-मोठीं पुस्तकें लिहून त्यांनीं मराठी वाङ्मयांत उपयुक्त भर घातली आहे.**

★

**राम हा आम्हा भारतीयांचा प्यारा देव आहे आणि त्याचें रामायण आमच्या भारतीय संस्कृतीशीं अत्यंत निगडीत आहे. आमच्या या परम पवित्र व स्फूर्तिप्रद रामायणाचा प्रचार देशोदेशी झालेला आहे. तेव्हां रामायणाचा प्रसार आणि रामपूजेचा प्रसार यासंबंधींचा रंजक व माहिती-पूर्ण असा हा लेख आहे.**

चैत्र शुद्ध नवमी हा दिवस रामनवमी म्हणून भारतात अती व उत्साहाने साजरा केला जातो. हजारों वर्षांपूर्वी या तिथीस सत्य, सदाचार आणि धैर्याचे प्रतीक भगवान पुरुषोत्तम प्रभुरामचंद्र इक्ष्वाकुवंशात कौसल्या मातेच्या पोटी अधर्माचा नाश करण्याकरिता आर्यावर्तात जन्मास आले आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वानें सारीपृथ्वी पवित्र करून टाकली आणि रामराज्याची निर्मिती केली. राम जन्मापासून तो आजपर्यंत आणि यापुढेही आमच्या भारतीय इतिहासाचा सारा गौरव "राम" या दोन अक्षरात समाविष्ट झालेला आहे. रामाची सारी कथा ही भारतीय साहित्याच्या उत्कर्षास सदैव प्रेरणा देणारी असून रामाचे जीवन हे भारतीयांचे आदर्श जीवन म्हणून जगांत सर्वत्र गौरविले जाते.

रामनाम स्मरण ही अमोघ शक्ती आहेत. प्रत्येक संकट प्रसंगी रामस्मरण हे संकट मुक्त करणारी सर्वात मोठी शक्ती आहे. मन आणि आत्मा यांचें शुद्धीकरण

करण्याकरितां रामनाम रामबाण परिणाम घडवून आणते. आमचे गांधीजी तर रामाचे अनन्यभक्त होते. आपल्या प्रत्येक प्रार्थनेत ते रामस्मरण करीत असत. सन्मार्गाचे दर्शन या महान मंत्रामुळे होते आणि आत्मा व शरीर व सुंदर राहते असे ते म्हणत असत, परलोकगमन करताना सुद्धा ते रामनामाचा जप करीतच गेले. आदिकवी महर्षी वाल्मिकीनें अत्यंत रोचक शब्दांत सर्व प्रथम रामायणाची रचना केली असली तरी जगातील बहुतेक सर्व भाषातून दाशरथी राम, जनकसुता वैदेही ( सीता ) सुमित्रा पुत्र लक्ष्मण व दशानन रावण यांच्यासंबंधींच्या मानवी हृदयास चिरंतन आकर्षित करणाऱ्या आदर्श व बोधप्रद अशा कथा लिहिल्या गेल्या असून त्यामधून रामनामाचा अगाध महिमा वर्णिलेला आहे.

भारताचा मिसर देशाशी प्राचीन कालापासून संबंध असल्याने तिथे इक्ष्वाकु वंशातील राजे राज्य करीत होते असा उल्लेख सापडतो. युरोपियन इतिहासकारांनी या वंशास 'हिक्सास' असें म्हटलें आहे. या कुळातील राजाना गो-पालनाचा मोठा शोक होता व ते घोडेस्वारीत मोठे तरबेज होते. या मिसर देशाच्या साहित्यात "रामसेस" असा रघुवीराचा उल्लेख असून रामपूजा अजूनही तिथे प्रचलित आहे.

बौद्ध साहित्यात "अनाम कम जात कम" 'दशरथ कथानम्' व 'दशरथ जातक' या मल्या मोठयां तीन ग्रंथातून रामकथा लिहिली गेली आहे. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात 'अनाकम जातकम्' या ग्रंथाचा चीनी भाषेत अनुवाद झाला तो अद्यापपर्यंत चीनी त्रिपिटकात जतन करून ठेवण्यात आलेला आहे परंतु त्यामधे प्रभु रामचंद्रास सावत्र आई कैकयीमुळे वनवास घडला असे म्हटलेले नसून खमता कौस एका हिची आज्ञा मानून रामाने राजत्याग केला असे वर्णिलेले आहे.

जैन साहित्यात राम, लक्ष्मण व रावण या त्रयींची धर्मांतील त्रिषष्टी महापुरुषात गणना केलीली आहे. त्यांच्या रामकथेनुसार वानर व राक्षस हे विद्याधर वंशातील आहेत असे म्हटलेले आहे. चीनी भाषेत 'की-कि०अ-ये' यानावे रामायण उपलब्ध आहे त्यांत रामाचा वनवास आणि पुनरपि आगमनाचे वर्णन असले तरी सीता हरण व युद्धादी प्रसंगाचे वर्णन मात्र नाही. या रामायणांत दशरथास "च-उ-चे रामास" "लो-मो," आणि लक्ष्मणास लो-मन अशी मोठी गमतीदार नावे दिली आहेत. या रामायणाचा रचना काल इ. स. ४७२ हा आहे. कांडापर्यंत रामायण लिहिले गेले असून यामधील कथा मात्र भारतीय रामायणाशी मिळती जुळती आहे. कंबोडियातील सहाका शतकातील सहाका शतकातले

प्राप्त शिलालेखाच्या आधारे तेथील मंदिरातून रामकथेचा खूप प्रचार आणि रामपूजेचा प्रसार होता असें दिसून येते.

तिबेटी रामायणातून लक्ष्मणास 'रेष्म' किंवा 'रिष्म' आणि सीतेस 'सीत' किंवा 'जित' तर कांही ठिकाणी 'सीज्स' व 'सीयस' असे संबोधले असून 'लंफूस' नामक एका वानर स्त्रीने स्त्रीने सीताहरणाची बित्तं बातमी रामास प्रथम दिली असा उल्लेख केलेला आहे. त्या कथेत सुग्रीवाच्या भावाचे नाववाली नसून 'नण्ड' असे आहे. याच नण्णानें रावण महालात सीता शोधार्थ प्रवेश केला. त्याने रावणाच्या बायको बरोबर वार्तालाप सुरू केला रावणास हे पसंत न पडून त्याने माल-प्रदेशावर लता प्रहार केला. त्या सरशी रामास मूर्च्छा आली. रामाची जी शोकनीय अवस्था बघून समस्त वानर वृंद शोकाकुल झाला व त्यांनी जीवन नामक एका वैद्याकडे रामास स्वास्थ्य लाभ प्राप्त करून देण्यासंबंधी अगदी अजीजीनें प्रार्थना केली. जीवकाने 'सुमित्रा' नामक पर्वतावरून अमृत संजीवनी आणण्यास सांगितले व ती कामगिरी याच नण्डाकडे सोपविण्यात आली. परंतु जाता जाता अमृत वल्लीचेच नांव तो विसरला व शेवटी त्याने सुमित्रा पर्वताच्या पर्वत उचलून आणला व आपली कामगिरी उत्कृष्ट प्रकारे बजावली अशी मोठी मजेदार कथा आहे. या तिबेटी रामायणात दशरथ-परशुराम युद्धाचा उल्लेख नाहीं. अत्यंत जुन्या तिबेटी रामायणात सीतेस 'दशग्रीव पुत्री' असे संबोधलेले आहे. 'पद्मावरिय' या जैन ग्रंथातही असाच उल्लेख सांपडतो.

सयाम हा बुद्धांचा देश जरी असला तरी तेथील सांस्कृतीक जीवनांत रामाची कथा खूपच खोलवर गेलेली आहे. तेथील साहित्य, शिल्प, व रंगभूमी या सर्वच ठिकाणी रामकथेचा खूपच प्रभाव दिसून येतो. सयामा भाषेत रामायणास 'रामकीन' [राम कीर्ति] असे म्हणतात व सीतेस 'सीडा' व रावणास 'ध्वसकंध' अशा नावानें संबोधलेले आहे. समस्त सयाम प्रदेशावर सत्ता चालविणारा राजा खमेंग हा अनन्य रामभक्त होता. त्यानें इ. स. ११७५ ते १२११ पर्यंत राज्य केले. या राजाच्या नंतरच त्यापूर्वी होऊन गेलेल्या राजवंशाशी 'राम' हा शब्द निगडीत असायचा. राजा आपल्या नावाबरोबर 'राम' या शब्दाचा अवश्य उपयोग करी. जसे महाराज बुद्राम, महामहंतक राम, सुखदेवराम याप्रमाणे रामायणाचा सयाममधे प्रचार यवद्विप (जावा) व कंबोडिया मधून झाला असावा. बँकॉक शहरातील जुन्या देवळामधून, राजवाड्यातून रामायण कथेतील विविध चित्रे खोदलेली असून ती सर्व वाल्मिकी रामायणाच्या सयामी संस्करणास अनुसरून काढलेली आहेत. मलाय्म साहित्यात रामगाथा 'हिकामतेसेरि राम' या स्वरूपात आढळते. जावा, बाली येथे सणा सुदीच्या प्रसंगी रामलीलेचा कार्यक्रम अवश्य करण्यांत येतो.

अमेरिकासारख्या दूर देशातही रामपूजेचा व रामकथेचा भरपूर प्रचार अजुनही आहे वाचून तुम्हास आश्चर्य वाटेल. दक्षिण अमेरिकेतील आदिवासी ' रामासेत्वा नावाचा एक सण अजुनही साजरा करतात. या सणप्रसंगी रामासारख्याच दिसणाऱ्या एका मूर्तीची महापूजा केली जाते. पेरू देशातील कित्येक जुन्या कवितावर रामायणाची व महाभारताची छाप आहेच. होमर या जुन्या विश्वविख्यात कवीनें लिहिलेले ' इलियड ' हे महाकाव्य तर सर्वस्वी रामायणावरच आधारलेले आहे असा एक अलीकडील वाद आहे. रामायणात चितारलेले सारे सारे प्रसंग या इलिकडमध्ये आहेत हे अभ्यासूना सहज दिसून येईल.

जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणी सर्वत्र रामच राम आहे असें आमच्या सर्व भारतीय कवींनीं वेळोवेळीं वर्णिलेले आहे. वेरूळच्या कोरीवलेण्यांतल्या कैलास लेकांत संपूर्ण रामकथा कोरून ठेवण्यांत आलेली आहे. कवी संत, रामदास, संत कबीर, संत तुलसीदास हे अनन्य रामभक्त होते. हिंदींत रामायणाची रचना सर्व प्रथम तुलसीदासानें केली. तामीळ भाषेंत कंबन नामक संत कवीनें तुलसीदासामाणेच स्वतंत्रपणे रामायणाची रचना केली आहे, तर बंगालीत कृत्तीवासाने प्रथम रामायण रचले. राम हा ईश्वराचा साक्षात् अवतार आहे या दृष्टीने तुलसीने रामगाथा गायिली. त्याचप्रमाणे कंबन आणि कृत्तिवासानी सुद्धा राम हा प्रत्यक्ष परमेश्वराचाच अवतार आहे. भूतलावरील जनतेची सुखदुःखे भोगण्यासाठीं तो रामाच्या स्वरूपात प्रकट झाला आहे अशा भावनेची राम चरित्रे लिहिलेलीं आहेत. दिवंगत हिंदी राष्ट्रकवी मैथिली शरण गुप्त इतके रामभक्त होते की त्यांना राम–पद कमलावरच आपली सारी काव्यधारा वहावून प्रभु रामचंद्राच्या प्रती आपले अनन्य साधारण प्रेम व्यक्त केले आहे. ऋषिकेशचे ख्यातनाम स्वामी श्रीशिवानन्द यांच्या कथानुसार रामायणही एक उद्दश्य शक्ती आहे. रामाचे स्मरण करणारा काम, मद, लोभ, मत्सर, क्रोध व मोह या षड्रिपुवर सहज विजय मिळवूं शकतो. आपल्या एका सायंप्रार्थनेंत गांधीजी म्हणतात, रामनामाचा उच्चार करून हनुमंतानें पर्वतही उचलला, पत्थर सुद्धां पाण्यात तरू लागला, शिळा बनलेल्या अहिल्येचा उद्धार झाला, ध्रुव, प्रल्हाद वाल्मिकी इत्यादींची निगडीत असे. रामनाम प्रत्येकांने दररोज अवश्य घ्यावे. स्वतः गांधीजींनी अखेरच्या क्षणीं सुद्धां ' हे राम ! ' हे शब्द उच्चारलेले होते ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट होय.

रामनामाचा असा हा महिमा आहे. देशोदेशी आज रामायण वाचले जात आहे. आणि रामकथेचा प्रचार–प्रसार होत आहे. म्हणून प्रत्येक भारतीयाने सकाळी उठताज रामनाम अवश्य घ्यावे.

--- ❋ -----

# कृत्तिवासप्रणित रामायण

लेखक : श्री. गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

**रामायण या महाकाव्याचा मूळ लेखक प्रतिभासंपन्न वाल्मिकी, सर्व भाषांतून त्या रामायणाचीं भाषांतरें झाली हिंदी भाषिकांत तुळसीदास कवींचे 'रामचरित्र मानस' किंवा तामीळ भाषिकांत कंबनकवी रचीत रामायण. जसें अत्यत लोकप्रिय आहे, तसेंच बंगाल प्रांतांतील बंगाल भाषिकांत कृत्तिवास या महाकवीनें रचलेसें रामायण, गेलीं पांच सहाशें वर्षांपासून बंगाली स्त्री पुरुषांपुढे त्या महाकाव्यानें उच्चादर्श ठेविला आहे.**

**त्या बंगाली महा कवीचा नि त्यानें रचलेल्या सुंदर राम-कथेचा श्री. कवीटकर यानी थोडक्यांत परंतु मनोहारी पद्धतीने परिचय करून दिला आहे.**

इंग्रजांचें राज्य भारतावर होण्यापूर्वी भारतांत महाराष्ट्र, गुजराथ, पंजाब राजस्थान, बंगाल वगैरे प्रांतांत छोटी छोटी स्वतंत्र राज्यें होती तीं ऐकमकांना परकीय समजून परस्परांवर स्वाऱ्या करीत असत, परंतु स्वातंत्र्योतर काळांत ही राजकीय व्यवस्था एकदम पालटली. भाषावार प्रांत झाले. परस्पर विचार विनिमयासाठीं हिंदी या देशी भाषेस भारतानें मान्यता दिली. मातृभाषेवरील प्रेम ठेवूनहि ही राष्ट्रभाषा सार्वत्रिक भाषा होत आहे. अशावेळीं लोकांचे आचार विचार ज्यांत उमटले आहेत अशा विविध भारतीय भाषांतील अभिजात साहित्याचा अभ्यास भावनात्मक ऐक्याच्या दृष्टीनें होणें अत्यंत इष्ट आहे. यादृष्टीनें बंगाली भाषेतील कृत्तिवासानें लिहिलेल्या व बंगाली जनतेच्या हृदयांत ज्याला आदाराचें स्थान आहे, अशा प्रसिद्ध रामायणाचा परिचय प्रस्तुत लेखांत करून घ्यावयाचा आहे.

वाङ्मयीन व सांस्कृतिक क्षेत्रांत व्यास आणि वाल्मीकी यांचे स्थान अढळ

आहे. त्यांच्यासारखे थोर भाग्य फारच थोड्यांच्या वाट्यास आलें असेल त्यांचे महाभारत व रामायण हे राष्ट्रीय ग्रंथ ऐतिहासिक सत्यावर उभारलेले आहेत. त्यातील वर्ण्य विषय उदात्त व गंभीर आहे. त्यांच्या दिव्य व वीर्यवती वाणीने शतकानुशतके कोट्यवधि लोकांच्या जीव्हेवर अक्षरशः नर्तक केले, निराश जीवांना दिलासा दिला, संसारी जनांना आनंद दिला, राजनीतिज्ञांना सल्ला दिला, वीरांचें बाहू स्फुरण पावले संशयानें दगाळलेल्या मनांना प्रकाश दिला सामान्यांना मार्गदर्शन करणारीं सुभाषित-रत्नें दिली, मुमुक्षूंना भक्तिप्रवण केले, लेखकांच्या प्रतिभाविलासाला अवसर दिला आणि देशी भाषांना समृद्ध केले.

तुलसी रामायण ही जशी महान् कलाकृती आहे. तशी बंगाली भाषेतील कृत्तिवास प्रणीत रामायण ही महान् काव्यकृती आहे. या दोनही महाकाव्यांनीं अनुक्रमें हिन्दी व बंगाली भाषांना समृद्ध केले, कुटुंबाच्या. देशाच्या व राष्ट्राच्या हितासाठीं सर्वस्वाचा त्याग करणारीं उदात्त स्वभावचित्रें रेखाटून त्यानीं जनतेचे शील; संवर्धन व भारतीय संस्कृतीचे भारणपोषण केले. पित्याच्या वचनासाठीं राज्यत्याग करणाऱ्या रामचंद्रांत, मातृप्रेमाणे बंद झालेल्या आणि स्वसुखाविषयीं निरासक्त असणाऱ्या लक्ष्मणांत व भरतांत, पतिनिष्ठ जानकींत, स्वार्थत्यागपूर्वक स्वकर्तव्य करीत राहणाऱ्या उर्मिलेंत ही राष्ट्रीय, कल्याण व सुख समृद्धि साधणारी शिकवण स्पष्ट व्यक्त झालेली आहे. कृत्तिवासांची भाषा सरळ व सुबोध आहे. त्याची वाणी प्रसादमय व अजोस्वी आहे. प्रसन्न व शांतपणें वाहणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणें त्यांच्या कथेचा ओघ आहे. कथानकांत करुण व भक्तिरस यांचा प्रकर्ष आहे, व निसर्ग मनोहर स्वभावचित्रें आहेत. त्यामुळें कृत्तिवासांची रामकथा चित्ताकर्षक झाली आहे. कौटुंबिक सद्गुणांचा विकास करण्याचे अद्भुत सामर्थ्य त्याच्या वाणींत आहे. प्रभु रामचंद्राचे यश गाणाऱ्या कृत्तिवासाच्यां या ग्रंथानें वंगीय जनतेची पवित्रित करण्याचें, व त्यांचे जीवन सुखसमृद्ध करण्याचे कार्य गेल्या पांच शतकांच्यावर केले आहे व यापुढेंही करीत राहील.

बंगालमधील चोवीस परगण्यातील फुलिया गांवी कृत्तिवास हा महान् कवि सन १३४६ फेब्रुवारीमध्ये एका पवित्र ब्राह्मण कुलांत जन्मला व त्यानें आपल्या काव्यप्रतिभेने फुलियाचें नांव अखिल बंगालमध्यें निनादून सोडले. त्यांच्या वडिलांचे नाव वनमाळी ओझा (उपाध्याय) यांचे पूर्वज इ. स. ७३२ मध्यें कानोजहुन बंगालमध्यें आले होते. हें घराणे पूर्वीपासून विद्वत्तेबद्दल प्रसिद्ध होते. कृत्तिवासानें पद्मानदीच्या काठांवर बसून संस्कृत भाषेचा व तत्कालीन अनेक शास्त्रांचा अभ्यास केला. त्याची विद्वत्ता पाहून गौडेश्वर या राजानें राजदरबारीं त्याचा सत्कार केला व

देशी भाषेत रामायण रचण्यास सांगितलें. राजाज्ञेनुसार कृत्तिवासानें रामायण ग्रंथ पुरा केला आणि वंग–साहित्यांत आपलें नांव अजरामर केलें. या कृत्तिवासाच्या काव्य–रचनेचे वाचून आबालवृद्ध प्रेमानें कौतुक करतात–बंगालमधील सर्व जातींतील लोक धार्मिक भावनेनें त्याचें पारायण करीत असतात. हा ग्रंथ त्यांना भगवद्गीते-प्रमाणें पूज्य वाटतो.

वाल्मीकी रामायणाच्या आधारें कृत्तिवासानें आपले रामायण सप्तकाण्डांत 'पयार' व 'त्रिपुदी' या सोप्या छंदांत प्राकृत जनासाठीं गायिले आहे, हा कवि जरी वाल्मीकींना वाट विचारीत चाललेला असला तरी त्याच्या प्रतिभेनें वाल्मीकींच्या कथानकास सोडून रामयणांत नसलेले विषय पुराणांतून घेऊन आपल्या ग्रंथांत समाविष्ट केले आहेत.

अहीरावण महीरावण वध, रावणाचा रामास राजकारणासंबंधी उपदेश, रावणाच्या आकृतीवर सीताशयन या कृत्तिवासांच्या काव्यशक्तींतून निर्माण झालेल्या नवीन व स्वतंत्र रचना आहेत कृत्तिवासांचे काव्य महाकाव्य म्हणून अधिक परि-चयाचें आहे. तत्वचिंतनाच्या दृष्टीमुळें तें जाड्यपणानें किंवा बोजडपणानें भरलेलें नाहीं. तर तें प्रसन्न आहे. त्यांत अलंकारांचा खटाटोप नाही. किंवा कृत्रिमता नाहीं. त्यामुळें सामान्य वंग–जनतेंत त्याला अधिक लोकप्रियता मिळाली.

श्रीरामचंद्राच्या यौवराज्याभिक प्रसंगीं कैकेयीनें भरताचा हक्क दशरथापुढें मांडला नसता तर रामायणच झालें नसते. कैकयी ही अप्रतीम सुंदर होती. ती स्वभावानें गोड होती. रामावर तिचें अतिशय प्रेम होतें. राज्याभिषेकासाठी चाललेल्या गडबडीची वार्ता तिला मंथरेनें दिली. तेव्हां तिला अतिशय आनंद झाला.

मंथराया वचः श्रुत्वा शयनात सा शुभानना ।
उत्तस्थौ हर्षसंपूर्णा चंद्रलेखेव शारदी ॥

मग असें कोडें पडतें कीं, 'रामे वा भरते वाहं विशेषं नोपलक्षये' असें मानणारी कैकयी पुढें स्वभावविरूद्ध कां वर्तन करते? याची कारण मीमांसा कृत्तिवासानें कैकयी व मंथरा यांच्या संवादांत उत्तम केली आहे. त्यांतील कैकेयी व मंथरा यांचें स्वभाव चित्रण स्पष्ट करणाऱ्या कृत्तिवासांच्या मूळ काव्यांतील पंक्ति अशाः—

**मंथरा कैकयीस म्हणते—**

कैकेयी तोमार दुखः आमार अंतरे।
बालें हित बिपरीत बुझावो आमारे ॥
सपत्नी तनय राजा ध्रुमि आनन्दिता।
कौशल्या तोमार चेये बुद्धिते पण्डिता ॥

निजपुत्र राजा करे स्वामीर सोहागे।
थाकिबा दासीर न्याय कौशल्यार आगे॥

थाकिल कौशल्या राणी सीतार संपदे।
दाँडाइबे नारिबि सीतार परिच्छदे॥

कौशल्या जिनिले तुमि सोहागेर दापे।
निज पुत्रे राजा करे सेई मनस्तापे॥

भरत थाकिल गिया मातामह घरे।
राजार कि दोष दिब ना देखि ताहारे॥

सतीनेर आनन्देते आनन्द सतिनी।
हेन अपरूप कभु ना देखि ना शुनि॥

लालिया पालिया बड करिनु भरते।
माता पुत्रे पडिला से कौशल्यार हाते॥

श्रीराम लक्ष्मण दुइ एकइ शरीर।
उभय करिब राज्य भरत बाहिर॥

तबे त भरत तोर हइल बंचित।
हिंद कथा बलिलाम बुझिस आहेत॥

**याचा मराठींत भावार्थः—**

कैकेयी, तुझें दुःख मी मनांत वागविलें. मी तुला तुझें हित काय ते सांगत आहे. यांत उलट असल्यास मला समजावून सांग. तुझ्या सवतीचा मुलगा राजा होतो आणि त्याचा तुला आनंद वाटतो. खरोखरी कौसल्या तुझ्यापेक्षां जास्त बुद्धिमान होय. ती आपल्या नवऱ्याच्या कृपेनें आपल्या पुत्रास राजा करीत आहे. पुढें तुला कौसल्येसमोर दासी सारखे उभे रहावे लागेल. सीतेच्या वैभवामुळें कौसल्या राणीच राहाणार. पण तूं मात्र सीतेप्रमाणें राणी राहाणार नाहींस. तूं आपल्या सौंदर्यदर्पानें कौसल्येस जिंकलेस. यावरून तिला वाईट वाटून तिनें आपल्या पुत्रास राजा करण्याचें योजिलें आहे. भरत मातुलगृहीं जाऊन राहिला आहे. आतां तो महाराजांपुढें नसल्यामुळें त्यांना काय दोष द्यावा? मात्र सवतीच्या आनंदानें आनंदित झालेली सवत कधीं पाहिली नाहीं अगर ऐकिली नाहीं. भरताचे लालन-पालन करून मी त्याला मोठा केला, पण आतां तो कौसल्येच्या हातीं गेला. श्रीराम व लक्ष्मण एक देहमात्र आहेत. ते दोघे राज्य करतील आणि भरत मात्र बाहेर

राहाणार म्हणून तर भरताची फसगत झाली. तुझ्या हिताची गोष्ट सांगितली. पण तुला वाटते अकल्याणाची ! ”

मंथरेच्या बोलण्याचा कैकईवर इष्ट तोच परिणाम झाला आणि ती मंथरेस म्हणाली:—

(कैकेयी बलेन) कुंजि तुमि हितैषिणी।
राम मम मंदकारी किछुइ ना जानि ॥
भरत प्रवासे राम राजा हबे आजि।
केमने अन्वथा करि युक्ति बल कुंजी ॥
नूपतिर प्राण राम गुणेर सागर।
केमने पाठाव तारे बनेर भितर ॥
घरेते राखिब वरं राज्य नाहि दिब।
कोन दोषे श्रीराममेरे बनं पाठाइब ॥

“ कुबडे, तूं माझे कल्याण चिंतणारी आहेस. पण रामचंद्र माझे अकल्याण करणारा कसा आहे, त्याचा कांहीं उलगडा होत नाहीं. भरत दूर गेला आहे आणि राम आज राजा होणार. तेव्हां हा सर्व बेत हाणून पाडण्याची युक्ति सांग. राम महाराजांचा प्राण आहे. तो गुणांचा सागर आहे, त्याला वनवासास कशी पाठवूं ! त्याला घरीच ठेवीन. राज्य तेवढें देणार नाहीं तर त्याला उगीच काय बोल लावून अरण्यांत पाठवूं ! ”

याशिवाय कृत्तिवासाच्या काव्यकृतींत आणखी एक गंभीर प्रसंग आहे. तो म्हणजे सीतेच्या पाताल प्रवेशाचा. दैवी शक्तीचें सहाय्य असतांना देखील जगांतील दुःखे दूर लोटता येत नाहींत. हे कटु सत्य तत्वप्रेमी वाल्मीकींनी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. सत्याची कास सोडण्यांत भ्याडपणा आहे, मनांची दुर्बलता आहे, असेंच श्रीरामचंद्राचें चरित्र शिकवितें. म्हणून सीतेच्या पाताल प्रवेशाची हकीकत सत्यास धरून होय.

आदि कवि वाल्मीकींनें या प्रसंगास अनुसरून शब्द चित्रांनीं उदात्ततेनें वातावरण निर्माण केलें आहे.

सर्वान् समागतान् दृष्ट्वा सीता काषाय वासिनी ।
अब्रवीत् प्रांजलि वाक्य मधो दृष्टिर वाङ्मुखी ॥ १ ॥
यथाहं राघवादन्यं मानसापि न चिंतये ।
तथा मे माधवी देवी विवर दातुमर्हति ॥ २ ॥

या प्रसिद्ध श्लोकांत वाल्मीकीं सीतेची शुचिता, शालीनता, कारुण्यावस्था यांचें हृदयस्पर्शी चित्र सुरेख वर्णन केलें आहे कृत्तिवासांनीं याच प्रसंगाचें चित्र ‘सीता देवीर पाताले प्रवेश’ मध्यें सहृदयतेनें रेखाटलें आहे ते लिहितातः—

हात जोडून सीता सावकाश बोलूं लागली. ती म्हणाली, “रघुनाथ, मला हा जीव काय करायचा आहे ? तुमच्या बोलण्यावरून अग्नि प्रवेश पूर्वी देवासमक्ष मी सत्यपरीक्षा करून दाखविली. महाराज, देव जें स्वतः बोलले ते आपण ऐकिले. नंतर मला आश्वासन देऊन अयोध्येस आणिलेत. मग अकस्मात् मला वनांत कां पाठविलेंत ! महाराणी होऊन ऋषींचे घरी राहाण्याचा प्रसंग मला आला आहे. फलमूळ खाऊन मला उपवास घडत आहेत. पितृगृही किंवा पतिगृहीं मला आधार मिळत नाहीं. अग्नींत परीक्षा होऊनहि आपण अपमान करीत आहांत ब्रह्मदेवानें जें कांहीं सांगितलें तें आपण ऐकिलेंत. त्याचप्रमाणें तुमच्या मृत पित्यानेंहि तुम्हांस कित्येक गोष्टी सांगितल्या, त्यातही श्रवण केल्यात, व मग मला अयोध्येस घेऊन आलात. जितक्या म्हणुन कुलस्त्रिया आहेत, तितक्या घरीं राहातात. मी मात्र परीक्षा देण्यासाठीं वारंवार सभेंत येत असते. आपण गुणसंपन्न आहां. विचारानें पंडित आहां. तरी विचार करून परीक्षा घेणे योग्य होते. मी आतां अदृश्य होते. त्यायोगानें तरी आपला त्रास चुकेल. याउपर संसाराची आशा मला राहिलेली नाहीं. आतां मी पातालांत जातें, यामुळें तरी आपल्यास झालेल्या, दुःखाचा आणि लाजेचा शेवट व्हावो. यामुळें आजपासून जानकीचें मुख पाहाण्याचा प्रसंग आपणावर येणार नाही मला आपण निस्सीम अपवाद देत आलांत आणि सत्व–परीक्षेसाठी वारवार सभेंत आणिलेत.”

जानकीचें चरित्र पाषाणास द्रव आणील इतकें तें कारुण्यपूर्ण आहे ते निर्व्याज, निस्सीम, अखंड प्रेमाचा आदर्श आहे. कृत्तिवासांस वाल्मीकीप्रमाणें करुण रस उत्पन्न करतां आला आहे, या प्रसंगीं सीता पुढें म्हणतेः—

जन्मे जन्मे मोर तुमि हओ पति।
आर कोन जन्मे मोर कराना दुर्गति॥

(महाराज, जन्मोजन्मीं आपण माझे पति व्हावें आणि पुढील जन्मांत तरी माझी दुर्गती पुन्हां करूं नये.)

यानंतर, भूमातेला सीतेनें हांक मारली. ती हाक सप्तपातालांत असलेल्या भूमातेनें ऐकली व जानकीस नेण्यासाठीं ती पुढें आली. सप्त पातालांतून एक विवर उत्पन्न झालें. त्यांतून एकदम एक सुवर्ण सिंहासन वर आलें. आणि त्या योगानें हा भूलोक दाही दिशांनीं प्रकाशित झाला.

अकस्मात् उठिल सुवर्णसिंहासन ।
दशदिक आलो केर ए मर्त्यभुवन ॥

सोन्याचे विविध अलंकार घातलेली, सुंदर वस्त्रें परिधान केलेली पृथ्वी देवी प्रगट झाली. तिनें ' बाळे ' म्हणून सीतेस मोठ्याने हाक मारली. तिला पोटाशीं धरून सिंहासनावर घेतले; व रामास ती उद्देशून म्हणाली, " लोकांच्या बोलण्यावरून ज्या अर्थी सीतेची परिक्षा पहात आहेस त्या अर्थी लोकास घेऊन सुखानें रहा " पृथ्वीचें भाषण सर्व लोकांनीं ऐकलें. सीतेनें आपल्या दोन्ही मुलांची आशा केलीं नाहीं. फक्त रामचंद्राकडे लक्ष लावून तिनें पातलांत प्रवेश केला. ती पातलांत प्रवेश करीत असतां रामानें तिचे केस धरले. तो मूठभर केस मात्र त्याच्या हातीं आले. इकडे सीतादेवी पातालांत गेली. आतांपर्यंत जानकीच्या रूपानें राहणारी, लक्ष्मीचा देह धारण करून स्वर्गास गेली. त्यामुळें सर्व देवांना आनंद झाला.

सीतार चरित्रकथा शुने जेइ लोके ।
पुञ्ज पुञ्ज पुण्य हय पाप नाहि थाके ॥

सीता चरित्र ऐकल्यानें अतिशय पुण्यसंचय होईल अशी शेवटी फलश्रुति दिली आहे.

भारतीय भाषा साहित्यांत उत्कृष्ट व भूषणभूत झालेल्या कृतीचा हा परिचय संस्कृतीच्या उपासकांना आनंद देणारा वाटेल अशी आशा करणें अयोग्य होणार नाहीं.

---

**ऋण निर्देश :** श्री. वि. के. सामक यांच्या कृत्तिवासी रामायणाच्या आधारे अत्यंत कृतज्ञतापूर्वक-लेखक



# " ललाट रेखा "

( चाल : धावधाली साईनाथा )

गत जन्मींच्या पुण्याईनें । मानव जन्मीं तूं आला ॥
दोष कुणाला देऊं नको तूं । भोग कुणा कां कधीं सुटला ॥धृ०॥

दामाजीनें लुटविली कोठी । वाचविलें मूक जनतेला ॥
हुंडी चुकती करण्यासाठीं । ' विठू ' पंढरीचा झाला ॥
दोष कुणाला देऊं नको तूं । भोग कुणा कां कधीं सुटला ॥१॥

ब्राह्मण पुत्र शापासाठीं । पुत्र वियोग त्या घडला ॥
पुज्य पित्याचें वचनासाठीं । रामासही वनवास आला ॥
दोष कुणाला देऊं नको तूं । भोग कुणा कां कधीं सुटला ॥२॥

हरिश्चंद्रासही सत्वासाठीं । पत्नि, राज्य त्याग घडला ॥
उरलेल्याही दानासाठीं । स्वयें विकले डोबाला ॥
दोष कुणाला देऊं नको तूं । भोग कुणा कां कधीं सुटला ॥३॥

क्षण भंगूर तूं सौख्यासाठी । रक्त पिपासू ( तूं ) झाला ॥
ऐश्वर्याच्या शिखरावती । साई प्रभूनच आठवला ॥
दोष कुणाला देऊं नको तूं । भोग कुणीं कां कधी सुटला ॥४॥

उरल्या आयुषी मुक्तीसाठीं । लावमुखीं अमृत पेला ॥
श्री साईच्या कृपेसाठी । तन मन ताहूंया प्रमूला ॥
दोष कुणाला देऊं नको तूं । भोग कुणा कां कधीं सुटला ॥५॥

लेखक : डी. नी. पोननीस, खडकी पुणे ३

# त्यात काय फायदा ?

## देव मनांत असला म्हणजे झालें

लेखक : द. शं. टिपणीस

श्री. द. शं. टिपणीस हे जीवनासंबंधानें खोलवर विचार केलेले व निष्ठावंत साईभक्त आहेत. गेलीं अनेक वर्षें ते साईलीलेच्या वाचकांस आपल्या कल्याणकारी विचारांचा अत्यंत त्यागपूर्वं केवळ सेवाभावानें फायदा देत आहेत. प्रस्तुत लेखही मुमुक्षु वाचकांचें मार्गदर्शन करणारा व त्यांना स्वकल्याणाचा मार्ग दाखविणारा आहे. —संपादक

**सकाळ**

"कसली करतां पूजाअर्चा ! त्यांत काय फायदा ? शास्त्र पाळतात म्हणे. अहो तुमच्या शास्त्राला अंतच नाहीं. प्रत्येकाची प्रत्येक वेळीं निरनिराळीं शास्त्रें. कशाला कांहीं अर्थ नाहीं. बिनबुडाची भांडी ही आणि त्यासाठीं बसता आटाआटी करीत. त्यांत काय फायदा ? सगळा खुळ्यांचा बाजार. कथा कीर्तन भजनांत काय फायदा ? देवाच्या नांवानें ओरडायचें झालें. नुसता Waste of time an energy दुसरें काय ? भक्तीचें प्रदर्शन आम्हीं करीत नाहीं. देव मनांत असला म्हणजे झालें. वेळतरी कोणाला आहे असल्या गोष्टी करायला ? इतकीं कामें आहेत. म्हातारणीं रिकामें बसायचें ते देव देव करीत बसावें हें ठीक."

**संध्याकाळीं**

"छे बुवा, आपण कधींच जात नाहीं कीर्तनाला. हो, बुवा चांगले गातो असें म्हणतात खरें. आलो असतो गाणें ऐकायला. पण काय करणार ? विचारायला

जायच आहे. तिकीटे रिझर्व्ह केली आहेत. आलो तर निष्कारण Waste of money होईल."

घरोघरीं अशा प्रकारचे संवाद थोड्या फार फरकानें ऐकूं येतात. यामुळें नाना प्रश्न मनांत येतात, भजन कीर्तन Waste of time and energy आणि पिक्चरला वा नाटकाला best of time and energy waste म्हणजे काय ? व best म्हणजे काय ? कशाला waste म्हणावयाचें ? ( माफ करा हे इंग्रजी शब्द वापरतो, त्या खेरीज विद्वत्ता आहे असें वाटत नाहीं. काय करूं ? ) हें जो तो आपल्यापुरतें ठरवितो. फायदा झाला कीं BEST व ज्यांत तोटा होतो तें WASTE एकाचा फायदा वा तोटा कशाला म्हणावयाचें ? ज्यानें पाकीट मारलें तो म्हणतो best आणि ज्याचें गेलें तो म्हणतो waste एकाचा waste तो दुसऱ्याचा best मग खरा waste आणि खरा best तरी कोण ? भजन कीर्तन कीं पिक्चर ? energy waste होते तरी कशांत ? भजन कीर्तनांत कीं पिक्चरमध्यें ? शास्त्रप्रमाणेंच, best waste and energy ही प्रत्येका पुरती निरनिराळी असतात म्हणजे ही सुद्धां बिनबुडाची भाडीच म्हणायची तर आणि मग त्यासाठीं आटाआटी काय म्हणून करायची ? त्यांत काय फायदा ? म्हणे सगळ्या खुळ्यांचा बाजार पण हें इतकें खुळे आले तरी कोठून ? जगांत शहाण्यांचा बाजार झाला म्हणूनच ना! देव मनांत असला म्हणजे झाले. पण मनांत इतक्या गोष्टीची गर्दी झाली आहे कीं त्यांत देवाला जागा तरी कोठून मिळणार ? देव मनांत पाहिजे म्हणजे काय ? माझ्या मनांत मुंबईला जावयाचें आहे यांत जो अर्थ तसा कांहीं अर्थ देव मनांत असणेचा आहे कीं काय ? कोठें तरी ऐकलेलें वा वाचलेलें चार शब्द झोंकून दुसऱ्यांना गार करण्याची माणसाला संवय असते, त्यांतलेच हें बोलणें पण आपण ऐकणारे. आपण काय समजायचें ? मनांत देव पाहिजे. अंतःकरणांत भक्ति पाहिजे. पूजा अर्चेंत काय आहे ? देवळांत काय आहे ? आमच्या भक्तिचें आम्ही नाहीं प्रदर्शन करीत. धार्मिक गोष्टींत अशा प्रकारे बोलण्याची एक फॅशनच होऊन बसली आहे. या मागें मानवी मनाचा कांहीं लपंडाव आहे काय ? पूजाअर्चा, भजन कीर्तन हें खरोखरच भक्तीचें प्रदर्शन आहे काय ? भक्तीचें प्रदर्शन आम्हीं करीत नाहीं असे म्हणणारे विनयामुळें भक्तीचें प्रदर्शन करीत नाहींत कीं त्यांच्याकडे मुळीं भक्तीच नाहीं तर तें प्रदर्शन तरी कसें करणार ? गरिबानें आम्ही श्रीमंतीचें प्रदर्शन करीत नाहीं असें म्हणण्या सारखे तर हें नाहीं ना ? या सर्व प्रश्नांचा बारकाईनें विचार करून त्यांतून कोणते सत्य बाहेर पडते. व अशा प्रकारे बोलणाऱ्यांची मानसिक ठेवण काय असते याचा शोध घेणें उद्बोधक होईल,

प्रथम Waste best आणि energy याचा विचार करू. waste

of time केव्हां होतो व best of time म्हणजे वेळेचा सदुपयोग केव्हां झाला असें म्हणावयाचें हा प्रश्न आपल्यापुढें आहे. वेळेचा सदुपयोग कळला की Waste of time सहज ध्यानीं येईल. सदुपयोग म्हणजे चांगला उपयोग. पण चांगला म्हणजे काय? चांगलें कशाला म्हणावयाचें? आज जें जग आपल्या भोंवतीं आहे त्याच्याकडे पाहिल्यावर असें म्हणावें लागते कीं जो तो आपल्यापुरतें चांगलें ठरवीत असतो, यामुळें प्रत्येकजण मी चांगलेंच करतो असें म्हणतों. वाईट करतो असें म्हणणारा कोण आहे जगांत? दुसऱ्याच्या बाबतींत म्हणणारे पुष्कळ आहेत पण स्वतःच्या बाबतींत असें म्हणणारा एकादाच हरीचा लाल असेल, नसेल. चांगल्या वाईटाचा शोध घेऊं लागलो तर बुद्धि गोंधळून जाईल, चांगलें कशाला म्हणावें व वाईट कशाला म्हणावें हें ठरविणें कठीण आहे. जें आवडतें त्याला चांगलें म्हणावयाचें व नावडतें त्याला वाईट म्हणावयाचें हा व्यवहारांतील ठोकळ सिद्धांत, गायनाची आवड असणाऱ्यानें १॥–२ तास चांगलें गायन ऐकलें कीं म्हणतो चांगला वेळ गेला. नाटकाचा शौकीन चांगलें नाटक पाहिल्यावर समजतो कीं छान वेळ गेला, गायन व नाटक आवडलें तर चांगला वेळ गेला. नाही तर फुकट वेळ गेला. Waste of time money and energy याचा अर्थ आपली आवड तेवढीं चांगली बाकी वाईट आपली आवड चांगली कीं वाईट कोण ठरविणार कसें ठरविणार? आकाशवाणीवर आपली आवड हा कार्यक्रम होतो. आवड कीं नावड? नक्की सांगा. नाहीं सांगता येणार आपण नावड म्हटलें तर लगेच दुसरें पाच पंचविस म्हणतील वा! कार्यक्रम छान होता, आवडला बुवा आवड म्हटले तर हें हा काय कार्यक्रम! म्हणणारी मंडळी पुढें सरसपतीला आवड म्हटलें कीं तें मनाचें काम मन आलें कीं आणखी गोंधळ थांग पत्ता लागू न देणारा बेटा तो काय चांगले काय वाईट याचा पत्ताच लागू देत नाहीं. मन ज्याला आज चांगलें म्हणते त्यालाच उद्या तें नाकें मुरडते वाईट मनाला चांगलें वाईट चांगले दिसते. चांगल्या मनाला सगळेंच चांगलें दिसण्याचा संभव आहे संतांना नाही कां सगळें जगच चांगले दिसतें? पुन्हां आजचें चांगलें तें उद्याचें वाईट ठरणें शक्य आहे तर उद्याचें वाईट परवाचे चांगलें ठरूं शकेल शंभर वर्षांपूर्वी एकाद्या ब्राह्मणानें शेंडी निमिशांना चाट दिली असती तर केवढा गहजब झाला असता पण आज शेंडी मिशा दाढी राखणें चेष्टेचा विषय झाला आहे. सारांश काय परिस्थिति बदलते, माणसाचें मन बदलते व माणूस बदलतो. चांगल्या वाईटाच्या कल्पना बदलतात. सर्व सृष्टीच जेथें बदलती आहे तेथे चांगलें वाईट तरी कसे स्थिर राहणार? मग पंचाईतच म्हणायची. चांगलें वाईट ठरवायचें तरी कसें? कां चांगलें वाईट असें कांहीं नाहींच? अगदीं बरोबर, जगांत चांगलेंही नाहीं आणि वाईटही नाहीं द्वित्व

नाहीच. आहे ते एकत्व. बाकी सगळे नाहीं नाहीं. नेति नेति यण हा झाला जाडाजुडा पडिती विचार. व्यवहारी माणसाला त्याचा काय उपयोग? त्याला जें आहे तें आहे असें समजून व्यवहार करावयाचे असतात. यामुळें व्यवहाराच्या दृष्टीनें चांगलें कोणते व वाईट कोणते हें पहाणें अधिक फायद्याचे आहे.

व्यवहारांत चांगलें कशाला म्हणतो. ज्यांत आयला फायदा आहे तें चांगलें पण फायदा कशाला म्हणावयाचें? आजची जागतिक दृष्टी पाहिली तर फायदा म्हणजे पैसा, पैसा मिळाला की सगळें कांहीं मिळालें ही सर्व सामान्य समजूत एकाद्याला भरपूर पैसा मिळाला कीं आपण म्हणतों नशीब काढलें बेट्यानें मुलगी श्रीमंत घराण्यांत गेली कीं सोनं झालं म्हणून आईवडील खुष असतात. मुलगा शिकला व भरपूर पैसे मिळवू लागला कीं शिक्षणाचें चीज झाले. काय शिकला याला महत्व नसून काय मिळतें याला महत्व आले आहे. पतीनें भरपूर पैसे मिळविलें कीं रामाला वरतान सीतेला जेवढा आनंद झाला असेल तेवढा आनंद पत्नीला होतो. एक काळ असा होता कीं कारखान्यांत नोकरी करणारा हलका समजला जाई. इतका कीं त्याला कोणी सभ्य गृहस्थ मुलगी देण्यास तयार नसे. ऑफिस मधला विशेषतः सरकारी कारकून याला भाव असे! देशांतील उद्योग धंदे वाढले पाहिजेत व त्याला हातभार आपण लावला पाहिजे असें म्हणून जो तो कारखान्याकडे धांव घेतो. या मागें देशभक्तीपेक्षां पैसा आहे. कारखान्यात पैशाचा फायदा आहे म्हणून गंगेचा ओघ तिकडे वळला आहे. आज ऑफिसांतील कारकुनाला कोणी विचारीत नाहीं. जमवताना कारखान्यांतील मुलगा अधिक पसंत. मग तो कारखान्यांत कारकून असला तरी बाध येत नाहीं. देवाच्या द्वारीं जातो. उद्देश हाकीं देवानें आपलें कल्याण करावें म्हणजे भरपूर पैसा द्यावा. पैसा मिळाला कीं सर्व मिळालें, एकाद्या रेल्वे अपघातांत तंगडी मोडली कींवा काम करताना कारखान्यांत हात मोडला तर तर त्याला नुकसान भरपाई म्हणून पैसा मिळाला की झालं. सर्व नुकसान भरून आलें. आपलें बहुतेक व्यवहार पैशावर आधारीत आहेत. श्रम, मान, कीर्ति यांचे मोजमाप करणारा तराजू म्हणजे पैसा. ज्याच्याकडे जेवढा पैसा अधिक तेवढा तो मोठा आणि मोठा म्हणजे मोठा या पलीकडे समाज कांहीं बघत नाहीं. चांगले वाईट ठरविण्याची ही दृष्टी. या दृष्टीनें चांगलें तें कीं ज्यांत पैसा मिळतो. पैशाचा पारा जसा चढेल उतरेल तसें चांगलें वाईट ठरते. विष्णुदासापेक्षां लक्ष्मीदास श्रेष्ठ. हें सर्व लक्षांत घेतलें तर तो माणूस म्हणाला तें खरें. भजन कीर्तनांत वेळ घालविणें waote of tine आहे आणि कारखान्यांत सवाई करणें best utilised tine आहे. आजचा समाज, त्याचें ध्येय त्याची सुखासीन प्रवृत्ति वगैरे लक्षांत घेतल्यास भजन कीर्तनांत वा भक्तींत वेळ घालविणें फुकट आहे. कारण ज्यांत पैसा नाहीं त्याला आपण फुकट म्हणतो.

माणसाला शरीर व मन असते. बहिरंग व अंतरंग मिळून माणूस झालेला आहे. आपण बरेचसे व्यवहार शरीराकडे लक्ष देऊन करीत असतो म्हणजे देह-बुद्धीनें करीत असतो. त्याचें जे परिणाम व्हावयाचे ते होत असतात. त्यासंबंधीं येथें जास्त विचार करण्याचें कारण नाहीं. पण शरीर आहे त्याकडे लक्ष देणें प्राप्त आहे. कारण आपण साधी माणसें आहोंत. शरीराच्या वाढीला व तें निरोगी राहण्यास जें जरूर तें सर्व आपणास मिळालें पाहिजे. सर्व प्रकारची शारीरिक सुखें आपण मर्यादा ओळखून शरीराला पुरविली पाहिजेत आपला संसार सुखी झाला पाहिजे. त्याला आजच्या जगांत पैशाची जरुरी आहे. त्यासाठी ज्यांत पैसे मिळतील असे उद्योग केले पाहिजे. पैसे मिळविण्यांत गेलेला वेळ best नव्हे तरी best utilised आहे हे निर्विवाद आहे कारण healthy mind lives in a healthy body शरीर सुखी व मन सुखी तर जीवन सुखी, यामुळे पैसा अलबत मिळवावा नव्हे जीवनास अवश्यक तेवढा पैसा मिळविणें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे. यासाठीं खर्च केलला वेळ हा वेळचा सदुपयोगच आहे पण हा पण आपण विसरतो. मर्यादेचें उल्लंघन करतो. लक्ष्मीचें गुलाम होतो येथेंच सर्व घात होतो. ही गुलामगिरी हीच खरी waste of tin आहे. शरीर पोषणास पित्ताची जरूरी आहे. पण तें वाजवीपेक्षां जास्त झालें तर कावीळी सारखे रोग होतात व त्रास करतात. तसाच पैसा वाजवीपेक्षां जास्त झाला, आपण सारखा त्याचा पाठलाग करीत राहिली तर बहिर्मंगाला. कितीही सुखदायी असला तरी अंतरंगाचा घात करणारा आहे. यास्तव पैशाची मर्यादा आपण ओळखली पाहिजे. प्रमाणांत दारू शरिराला पोषण असती तरी ती प्रमाणाबाहेर गेल्यास काय होतें ? लागतोच आपण सर्वजण तसाच पैसा व दारू दोहोंच्या रुपांत करत असला तरी वागणूकीत सारखेच मन सुखी ठेवण्यासाठीं शारीरिक सुख आपण मिळविणें योग्य असले तरी आणखी एक गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे. शारीराला सुख असें जें आपणांस वाटतें तें पुष्कळ वेळा वासनेला असतें. वासना पूर्ती झाली कीं सुख वाटते. तिला प्रतिबंध झाला वा विरुद्ध कांहीं घडलें कीं दुःख वाटतें म्हणजे आपल्या शरीरिक सुखाचा व्यवहारांतील संसारांतील जीवनांतील सुखदुःखाचा संबंध आपल्या अंतरंगाशीं आहे. आपले दैनंदीन जीवन आपलें सर्व आयुष्य हें सुखाचा शोध आहे. सुखासाठीं आपण संसार करतो व्यवहार करतो धडपडत असतो यामुळे सुखःदुखाचा संबंध ज्या आपल्या अंतरंगाशीं आहे त्या अंतरंगाची काळजी शरीराइतकीच घ्यावयास नको काय ?

कंदीलाची काच आपण घासून पुसून स्वच्छ ठेवतो ती पाण्याच्या स्पर्शानें तडकूं नये म्हणून काळजी घेतो. आत ज्या ज्योतीचा प्रकाश या बाह्यजगांत काचेच्या

मध्यस्थीनें प्रकाशणार आहे याची आपणास जाणीव असते. याच दृष्टीनें शरिराकडेही आपण कां पाहूं नये ? आपणास काय दिसते पण आंतील ज्योत दिसत नाही तिच्या अस्तित्वाचें भानच आपणांस नसतें. आपण शरीराची कांचेची निगा राखतो रोगाच्या स्पर्शानें खराब होऊं नये तडकूं नये मृत्यु येऊं नये म्हणून तापलेली काच जशी पाण्याच्या स्पर्शाला भिते तसें भिऊन वागतो पण आंतल्या वातीला कोजळी आली असली तिचा आकार बिघडला असला तर कांच स्वच्छ असूनही स्वच्छ प्रकाश पडेल ? याचा विचार आपण कधीं तरी करतो कां ? आपल्या चित्ताला वासनांच्या काजळ्या आल्या असलेल्या नाना विकारांनीं त्याचा आकार बिघडून गेला असला तर शरीर सर्व प्रकारें उत्तम असूनही आंतील आंतील ज्योतिचा प्रकाश, पराक्रम पुरुषार्थ या बाह्य जगांत स्वच्छपणे प्रकाशीत होईल काय ? आणि न झाला तर मग बाह्यजगांतील आपलें जीवन आपले व्यवहार व आपला संसार पराक्रमीपुरुषार्थी व खरा सुखी होईल काय ? यासाठीं वासनामुळें येणाऱ्या काजळ्या पाडून टाकणें व विकारामुळें येणाऱ्या कोजळया पाडून टाकणें व विकारामुळें बेढब बनलेला आकार छाटा छूट करून योग वळणशीर करणें जगांच्या राहो पण निदान स्वतांच्या सुखासाठीं तरी जरूर नाहीं काय ? मानव म्हणजे अंतर्ज्योतीचा जगाला प्रकाश देणारा कंदील आहे म्हणुन भल्याबुऱ्या वासनांचा विकारांचा नायनट आपले जीवन सुखी करण्यासाठीं केली पाहिजे. सुखी जीवनासाठीं तर प्राणीमात्राची धडपड चालू आहे. जीवनांचे ध्येय व जीवनाला सतत जीवंत ठेवणारें सुख आहे. हें साध्य करण्यासाठीं तो फोर्स वाढविण्यासाठीं जरूर तीं साधनें आपण उपयोगांत आणली पाहिजेत. यासाठीं परमार्थ साधन हें सर्वोत्कृष्ठ साधन आहे. म्हणून आपल्या जीवनांत परमार्थ अध्यात्म अवश्य पाहिजे. तो जेथें नाहीं तेथें सगळया काजळी वाती. जगाला त्यांचा काय उपयोग ?

हा ड्रायविंग फोर्स वाढण्यास चित्त शुद्ध पाहिजे. जस जसें चित्त अधिकाधिक शुद्ध होत जाईल तस तसें या फोर्सचा फोर्स अधिकाधिक वाढत जाईल. भक्ति, नामसंकीर्तन, भजन, पुजन, कीर्तन उपवास ही चित्त शुद्ध करणारी साधने आहेत. सद्गुण हें चित्त शुद्ध करणारे आहेत. भजन पूजन कीर्तनादी साधने आपल्या ठायीं सद्गुण निर्माण करतात. हें कसें ? ज्याचें आपण चिंतन करतो त्याचें गुणधर्म आपल्या ठायीं निर्माण होतात असा मानस शास्त्राचा एक सिद्धांत आहे. देवाच्या ठायीं सद्गुण आहेत असें समजतो. तशी आपली भावना असते. भजन किर्तनामध्यें हें चिंतन विशेष होते. यामुळें आपल्या ठायीं सद्गुणाची वाढ होये. म्हणजेच दुर्गुण कमी होतात. म्हणजेच चित्तावरच्या कोजळ्या कोळिष्टे हळूं हळूं नाश पावतात व

चित्त शुद्ध होत जाते. उपवासानेही फायदा होतोच तो दुहेरी होतो व तो दुहेरी होतो. शरीर शुद्धि होते तसेंच चित्त शुद्धीही होते. मात्र उपवासाच्या मर्यादा ओळखून तो केला पाहिजे. ज्या योगे इतरांचे व व स्वतांचे मन भडकेल अशा गोष्टी करता कामा नये. पण ही गोष्ठ महाकठीण कारण आजच्या जमान्यांत उपवासाला भरपूर अडथळे निर्माण होत असतात. यामुळें आजची सामाजीक परिस्थिति लक्षांत घेतली तर उपवास हें साधन निकामी झालें आहे out of date झालें आहे असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. एका ऐवजी दुसरा पदार्थ खाणें एवढाच अर्थ उपवासाला असला (व तसा तो आहे हा अनुभव) तर मग अध्यात्मिकदृष्ट्या लपवास निरुपयोगी आहे व प्रकृतीलाही अपायकारक आहे. ज्यांत उप–वास नाहीं. (देवाजवळ सान्निध्य) तो उपवास असला तरी शेवटीं त्याचा उपहास होतो. भजन कीर्तन व पूजनांतही आपलें लक्ष, मन कुठें आहे? देवाकडे आहे कीं ते इतर कोठें भटकत आहे यावरच चिंतनाचे योग्य परिणाम होणें अवलंबून आहे हें विसरून चालणार नाहीं. या सर्व साधनांचा त्यांच्या मर्यादा पाळून सतत उपयोग केल्यानें चित्तशुद्धि तर होतेच शिवाय आणखीही पुष्कळ परिणाम घडून येतात. ही साधने आपल्या संतांनीं वापरली आहेत. त्यांनीं आपले अनुभव वर्णन केले आहेत. खरें सुख त्यांच्या हातीं लागले होते. या सर्व गोष्टींचा विचार करून आतां सांगा कीं, भजन कीर्तनांत घालविलेला वेळ वेस्ट ऑफ टाईम आहे की बेस्ट ऑफ टाईम आहे?

उपास तापास म्हातारपणीं करावेत, भजन पूजन म्हातारपणीं ठीक. त्यावेळीं कांहीं उद्योग नसतो. वेळ असतो. बसावें हरी हरी करीत. तरुणपणीं अनेक उद्योग असतात. तें करायचें सोडून भजन पूजनांत वेळ घालविणें म्हणजे waots of time आहे हे विचार अत्यंत फसवे आहेत. बोलणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला दोघांनाही फसवे आहेत. म्हातारपण म्हणजे काय व हरीहरी करायला देवाची भक्ति अगदीं साधी पूजादीरूपानें करायला काय लागते याची कल्पना बोलणाऱ्याला नाहीं. हरी हरी नामस्मरण हें मनांत आलं म्हणजे करतां येते असें नाहीं. त्याला संवय लागते. तें अंगवळणी पडावें लागतें. दारू बाजाच्या जीवनांत दारुची संवय जशी भिनून गेलेली असते व पहिली उतरली नाहीं तोच पुन्हां चढविण्यासाठीं त्याचा हात आपोआपच बाटलीकडे जातो तसेच नामस्मरणाचें व भक्तिचें आहे. आपल्या जीवनांत नामस्मरण व भक्ति इतकी भिनली पाहिजे कीं चित्त जरासे जरी रीकामे राहते असें दिसल्याबरोबर मन आपोआप नामस्मरणाकडे वळलें पाहिजे व उतरां पहाणारी भक्ति पुन्हां चढविली गेली पाहिजे. दारुचा जसा कैफ तसा भक्तिचा कैफ आला पाहिजे. सर्वांत दोहोंच्या गुणधर्मांत जमीन अस्मानाचा फरक आहे हें निराळे. मुद्दा असा

कीं इतकी संवय मनबुद्धयादी इंद्रियाना चुटकीसारखी होऊं शकत नाहीं. दारुची संवय चटकन अंगवळणी पडते कारण वाईट लवकर चिकटे पण चांगले चिकटतां चिकटत नाहीं. सतत प्रयत्ना नंतर कांहीं वर्षांनीं नामस्मरण अंगवळणी पडते. पुन्हां त्यांत अडथळे निर्माण होतात तें निराळेंच. त्यांतील जबरदस्त अडथळा म्हणजे अहंकार. अहंकाराचें तोंड विषयाकडे असते तर भक्तीचें तोंड वैराग्याकडे असते. अहंकार विषयांवर पोसतो तर भक्ति विषयांना मारक असते. मनाला भक्ति देवाच्या दाराकडे खेंचतें तर अहंकार त्याला त्या दिशेनें जाऊं देत नाहीं. ( म्हणूनच सुरवातीस दिलेले भाषण त्या व्यक्तीचें नसून त्याच्या अहंकाराचें आहे. ) मन अध्यायाकडे जाऊं लागले तर अहंकार त्याच्या मार्गांत नाना बयादी व अडथळे निर्माण करील. काम क्रोध लोभ मोहादी मारेकरी त्याच्यावर घालील. या सर्वांचा पूर्ण समाचर घेतल्या खेरीज नामस्मरण सिद्ध होणार नाहीं. यांचा नायनाट करणे म्हणजे काही गळ्याचा नायनाट करण्याइतके सोपे नाही कीं दिलें पेनिसिलीन झाला चुटकी सरखा बरा काम क्रोधादी Baeteria सहजासहजी मरणारा नहीं, त्याला प्रयत्न श्रम व वेळ भरपूर पाहिजे, आतां सांगा म्हतारपणीं, मृत्यु उंबरठ्यावर उभा असतां वेळ भरपूर मिळेल कीं तरुपणीं ? म्हातारपणीं इंद्रिये थकतात व त्यांची कार्य क्षमता कमी होतें नव्हे इंद्रिये थकली त्यांची कार्य क्षमता कमी झाली म्हणजेच म्हतारपण येते. बहिरेपणा येतो मग म्हाताऱ्यानें मजन कीर्तन एकावें तरी कसें ! डोळे अधु होतात. पुष्कळवेळां चष्म्याही धड उपयोगी पडत नाहीं, मग देवासंबंधी चार ओळी तो वाचणार त्या काय ? शरीर नाना विकृतींनीं जर्जर होते. त्यामुळें मनशांति ढळतें अशा वेळीं तरुणपणीं नाम स्मरणाची वा भक्तिची संवय अंगवळणी पाडून घेतली नसेल तर ती होणें शक्य नाहीं म्हातारपणी देव धर्म हें म्हणणे म्हणजे करूं उद्या असें म्हणून काम टाळण्याच्या व्यवहारांतल्या प्रघानासारखा आहे. जें कांहीं चांगलें करायचे तें आज. उद्यांचें कोणी पाहिले ! आला क्षण आपला व तोच भाग्याचा करून घेणें हें व्यवहारप्रमाणें परमार्थांतहीं कसोशीनें पाळले पाहिजे.

सुरवातीच्या भाषणांत आणखी एक मुद्दा आहे. देव मनांत असला म्हणजे झालें. याचा अर्थ काय ? बाजारांतून मूर्ती आणून आपण देवघरांत ती स्थापन करतो तसा एकादा देव माणून मनांत ठेवावयाचा कीं काय ? कोठे तरी साहित्यांत वाचलेले अगर केव्हां तरी ऐकलेले शब्द जमेल तेथें पेरीत जाणे ही एक हल्ली फॅशन झाली आहे. शब्दांचा कोषांतील अर्थ आम्हाला माहीत असतो पण त्यां मागी गर्भितार्थ फारच थोड्याना समजतो, अर्ध्या हळकुंडीनें पिवळ्या झालेल्यांचें समाजांत अधिक्य झालें कीं कोणत्याही शास्त्रीय विचारांचा चोथा व्हायला वेळ

लागत नाहीं देव मनांत असला म्हणजे झाले. बोलणाऱ्याच्या मनांत कांहींही असो. त्याचा अर्थ त्याला कळो वा न कळो पण या शब्दाच्या मागें असलेला अध्यात्मिक अर्थ आपण माहीत करून घ्यायला हरकत नाहीं. देव मनांत असला असल्या संकेताची जरूरचि काय ? देवाच्या असण्यांत संकेत असूंच शकत नाहीं. कारण तो मुळांत आहेच. सर्वत्र आहे. मनांतही आहेच. मग असला विसला कसला आलाय ? मुद्दा आहे तो निराळाच. फिटिंग केलंय. कनेक्शन दिलंय. ग्लोब आहेत. जरूर ती सर्व व्यवस्था आहे. मग वीज आहे कीं नाही याच्या नुसत्या शंका बाळगा कशाला ? बटन दाबा. बल्बमधून वीज प्रकट होईल. अप्रगट आहे त्याला प्रगट करा. मानवी बल्बमध्यें चित्तांत देव आधीच येऊन बसलाय नव्हे मुळपासून तिथेंच आहे. विवेक वैराग्याची बटणें उघडा म्हणजे तो बल्ब मध्यें प्रगट होऊन बाह्य जगांत त्याचा प्रकाश फाकेल. शेषशाही भगवान चित् सागरावर झोंपलें आहेत. त्यांना जागे करा. पाण्यावर शेवाळ वाढले कीं पाणी दिसत म्हणून पाणीच नाहीं असें म्हणणें योग्य ठरणार नाहीं. शेवाळ दूर करा पाणी दिसेल. चित्तावर विकार, विषय, लोभादीचें भरपूर शेवाळ असेल तर तो भगवान तो परमेश्वर तो देव असूनही दिसणार नाही. हें शेवाळ आधीं दूर करा. म्हणजे दैव हृदयस्थ शक्तीनें नि तेजानें तळपू लागेल. असें झालें म्हणजे मनांत देव आहे असें म्हणतां येईल असें होण्यास प्रथम आपण आपलें चित्त शुद्ध करण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे. चित्त घासून पुसून स्वच्छ लख्ख करायचे म्हणजे काय करायचें ? चित्रांत घुसलेले नाना विकार व वासना यांना हुसकावून त्यांच्याऐवजीं विवेक व वराग्य यांना जागा द्यावयाची. पण हें तरी कसें करायचें ? भात करायचा ठरला खरा पण त्यासाठीं तांदुळ, भांडे, पाणी, अग्नी वगैरे साधने पाहिजेत ना ? आणि असली तर त्याचा उपयोग केला पाहिजे ना ! निसर्गानें त्या प्रभूनें सर्व कांहीं तयार ठेवलें आहे. फक्त योजकस्तत्र दुर्लभः चित्त शुद्ध झाल्याखेरीज चित्तांत मनांत देव येणार नाहीं, प्रगट होणार नाहीं. आणि विवेक वैराग्याखेरीज चित्त शुद्ध होणार नाहीं. म्हणून पहिली पायरी विवेक वैराग्य साध्य करून घेणें. भजन कीर्तनादी साधनें या कामीं अत्यंत उपयुक्त आहेत. म्हणून देव मनांत धरण्यासाठीं भक्ति नामस्मरण भजन–पूजनांत घालविलेला वेळ waste of time नसून best utilised time आहे. केवळ सिनेमा वा नाटक कादंबऱ्यांत घालविलेला वेळ waste च नव्हे तर worst आहे. सर्वसाधारण माणसानें पहिल्याचें ( भक्तीचें ) अजिंक्य राखून दोहोंतही थोडा फार वेळ खर्च केला तर तो गोल्डन पाथ होईल. सामान्य जीवानें हा सुवर्ण मध्य साधण्याबद्दल सदैव प्रयत्नशील राहणें हें कल्याणकारी आहे.

---

# नामदेवांची अमृतवाणी [ हिंदी ]

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

## मै अपराधी बाप मैं अपराधी

मी अपराधी आहे बावा ! मी अपराधी आहे. तुमची खरीखुरी भक्ति, सेव साधिली नाहीं, अंगचे घनदाट अज्ञान नष्ट झाले नाहीं. दुर्जनांच्या सहवासांत वावरलो त्यामुळें येथें अज्ञान मात्र फार वाढले. आणि खरी कमाई ( ज्ञान ) मात्र नष्ट झाले. संगीताप्रमाणें प्रखाशता वाढली. नारायणाच्या ( केवळ ) नामानें मनुष्य दोषमुक्त होतो. असा स्वामी नारायण क्षमाशील आहे, परमेश्वराच्या नाममात्रें करून नरकाचे निवारण केले. आणि नामाच्या ठिकाणीं भावना जखडून टाकल्या.

× × × ×

## सांच कहैं तौ जीव जग मारै

खरे म्हटले तर जीव जगावर मात करण्याचा प्रयत्न करीत आहे, पण एक असो अथवा अनेक असो. जीवानां अखेर नित्य हारच खावी लागते. अखेर सर्वच गोष्टी विनाशी आहेत. ( स्मशानांत ) जळणारी हाडे [ जणुं आपल्या मूर्खपणाला ] हसत असतात. मनाच्या मलिनत्वाची जाणीव नाहीं, आणि साबण, दगड व पाणी यांची तारीफ करतो. पाखंड वेष धारण करून पतन पावतो. आपण स्वतः अज्ञानी असून वेष मात्र पवित्र [ उज्वल ] करतो आणि बेटा संशयाच्या गर्तेत पडतो. नामदेव म्हणतात, संशय हाच शाप आहे. म्हणून पाप्या ! पंढरीनाथाचे स्मरण कर.

× × × ×

## संत सूं लेना संत सूं देना

संताशाच देण घण असावे. अशाप्रकारें संतसंगतींतच कठिण भवसागर तरून जावा. संतांची कृपा ( सावली ), संतांचे प्रेम, संतांची संगति मिळाली म्हणू-

नच ईश्वरप्राप्ति झाली. नामदेव असंतांची संगत कधींच करणार नाहीं. सतसंगतातिच मी सामाहून राहीन.

× × × ×

### धर हरि धंधाकार सबैला

सर्व धंदा म्हणजे श्रेष्ठ हरि होय तुझी चिंता राम ( परमेश्वर ) करील. नारायण ही माता आणि नारायण हाच पीता; आणि मित्रपरिवार म्हणजे वैष्णवजन होत असे केशवाचे पुत्र बहुत झाले आहेत आणि त्यांच्यामध्यें तूं नामदेवाला अर्पण केले आहेत. ( नामदेवांना समाविष्ट केले आहेत.

× × × ×

### माई तूं मेरे बाप तूं

विठ्ठला ! तूंच माझी आई. तूंच माझी आई. तूंच माझा पिता तूंच माझा कुटुंब परिवार आहेस हरी हाच आमची नौका आहे. पैलतीरावर उतरविणारा हरीच आहे. नौकेस गती देण्यास साधुसंगती लाभली आहे व नामदेवांचा दाता केशव आहे.

× × × ×

### माई गोब्यंदा बाप गोब्यंदा

गोविंद माझी माता आहे. गोविंद माझा पिता आहे. जात, पात; गुरुदेव हेहि गोविंद आहे. ईश्वर नित्य आनंदरूप आहे. गोविद गातो नि गोविद नाचतो. नित्य नवे वेष गोविंदच धारण करीत असतो. गोविंद हीच पानपात्री गोविंद हीच पूजा नामदेव म्हणतात, माझा याखेरीज अन्य देव नाहीं

× × × ×

### हिरदै माला हिरदै गोपाळा

माझ्या हृदयांतच सृष्टीचा पालनकर्ता दीनदयाळ गोपाळ बसलेला आहे आणि माझ्या हृदयांतच त्याला माला घातलेली आहे. हृदयाचा रंग हृदयांतच छपला आहे. शुद्ध प्रेमजल हृदयांतच आहे. माझ्या हृदयांतच त्याच्या भक्तीचा दीपक तेवत असून त्यामुळें हा घट ( शरीर ) प्रकाशमान झालेला आहे. त्याच्यामुळेच अज्ञानरूपा दरवाजे उघडले गेले त्यांची बंधनें तुटून पडली व ज्ञानाचा प्रकाश सगळया ठिकाणीं पसरला

आतां या हृदयांत कसलाच रंग रूप वा जात राहिली नाहीं. नामदेवाचे हृदय त्यांके जणुं हरीच असल्याप्रमाणे रंगून गेले.

× × × ×

**अब न बिचारूं राम संभारूं**

रामाचे स्मरण करणे आतां विसरणार नाहीं. जर विसरेल तर माझे सर्वस्व हरण होईल. क्षणाक्षणाला तन, मन, धन हरीच्या ठिकाणी राहिलेले आहे. प्रत्येक घडी मुहूर्त काय पण पळ सुद्धां मी हरीस्मरणाचे कामी चुकाविणार नाहीं. रामनाम ( नामस्मरण ) श्वासाश्वासाला भरपूर पिऊन घेऊं हे दरिद्री जावा ! तूं त्या रामरूपी गुळाचे सेवन कर. योगस्थ होऊन रामनामाचा जप कर. जर रामनामाचे विस्मरण होईल तर तूं त्याच्या वियोगानें रडावेस, नामदेव म्हणतात, मी आतां दुसरी आशा करीत नाहीं. रामनाम रूपी प्राप्तीसाठी नी मरण पत्करीन.

× × × ×

**राम राई उलगुं और न जाचूं**

रामरायशिवाय दुसरें कांहीं मागणे नाहीं. शरीरे अनंत प्राप्त होतात. शरीर जाणार असेल तर भले जाईल. योग, अन्य उपाय वा मुक्ति मी मागत नाहीं. हरीचें नांव, फक्त हरीचे नांव हृदयांत ठेवीन. नामदेव म्हणतात की रामनामाला सीमा नाहीं व तो ( नामदेव ) भक्तिरसाचा आणि प्रेमरसाचा महिमा गात गात नाचतो.

× × × ×

**बीहों बीहों तेरी सकळ माया**

हे विठला ! तुझी माया दुरत्यय आहे, सबल आहे. आतांपर्यंत तिनें अनेकांना भुलविले आहे. मायेच्या आवरणामुळें ब्रह्म दिसत नाहीं; पण ब्रह्मप्राप्ती नंतर म्हणजेच ब्रह्माचे ज्ञान झाल्यावर माया अस्तंगत होते. तिचे अस्तित्वच नष्ट होते. नामदेव म्हणतात, तूंच स्वतः विधाता आहेस, हे परमेश्वरा ! दशेंद्रियेरूपी घोड्यावर ( देह ) स्वार होणारा तूं परमात्मरूप श्रीकृष्ण आहेस.

# रामभक्त जटायू

लेखक : द. शं. टिपणीस

जटायू हा तर बोलून चालून पक्षी! परंतु त्याची रामभक्ति प्रखर होती. सीतेसाठीं तो रावणाशी शौर्यानें झगडला. राम सीतेसाठीं शोक करीत वणवण हिंडत असतां जटायूशीं त्याची कशी भेट झाली, यांचे सुंदर वर्णन पुढील लेखांत करण्यांत आलें आहे.

—संपादक

( रामायण म्हणजे मानवी जीवनाचें व मनाच्या खेळाचे चित्रण होय )

"लक्ष्मणा धाव—" ही आर्त हाक ऐकून वहिनी लक्ष्मणास म्हणाली भावोजी, आर्य संकटांत दिसतात. जा, लौकर मदतीला जा, धनुष्यबाण घेऊन लक्ष्मण त्वरेने निघाला. पण कांचनमृग एकाएकी कोठे नाहीसा झाल्यामुळें दोघेहि रिक्तहस्तानें परतले. पर्णकुटीकडे येताना वाटेंत नाना अपशकून घडूं लागले. रामाच्या मदतीला लक्ष्मण गेल्यामुळें सीता एकटीच पर्णकुटीत होती. रामाला तिची चिंता वाटूं लागली. त्यांना आणखी अपशकून. चिंताग्रस्त मन अपशकूनाला बिचकते व नाहीं नाहीं त्या वाईट कल्पना करीत बसते. मानवी मन येथून तेथून सारखेच. रामाच्याही मनांत शंकाकुशंका येऊं लागल्या.

राम लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, कां रे आज एकसारखे अपशकून होत आहेत! सीता सुखरूप आहे ना? कांहीं इजा तर झाली नाहीं ना!" लक्ष्मण बोलला नाहीं.

कांहींना कांहीं अपशकून होत राह्यचा व रामाची हुरहुर वाढत राह्यची प्रत्येक वेळीं तो पुन्हां पुन्हां लक्ष्मणाला विचारी सीता सुखरूप आहेना? तिच्यावर कांहीं संकट तर आलें नाहींना? पर्णकुटीका जस जशी जवळ लागली तस तशी रामाच्या मनाला अधिकाधिक हुरहुर वाटूं लागली. मन हें असेंच आहे. प्रिय

व्यक्तीला भेटण्यासाठीं तें उत्सुकच नव्हते तर उतावीळ होते. भेट होईपर्यं भल्याबुऱ्या कल्पना मनांत येत असतात. भेटीचा क्षण जसजसा जवळ येईल तसतशी भेट होईल कीं नाहीं अशी हुरहुर लागते व बहुतेक नाहीं असें गृहीत धरून मन शोकाकुल होते. मानवी मनाचा हा खेळ रामानें आपल्या शोकाने दर्शित केला आहे.

राम व लक्ष्मण पर्णकुटींत आले. पण सीता कोठें होती ? ती रामाला दिसली नाहीं. रामाच्या मनानें आधींच ठरविलेल्या भविष्यास सत्य रूप प्राप्त झाले व त्याचा शोक वाढला. त्यांनीं पर्णकुटी शोधली. पण सीता नाहीं. रामाचें मन सांगते, " पहा ! हें इतस्ततः पडलेले सामान पहा तें मृगाजिन, पहा तो कमंडलू. कसें तरी पडले आहेत. सीतेनें आपल्या सुटकेसाठीं केलेली ही धडपड. आतां शंका कसली ! कोणातरी राक्षसानें तिला पळविली खास."

" माझी सीता ! आतां तिचें काय झालें असेल " असें म्हणून राम शोक करूं लागला. सीतेला पळविली असेल हें लक्ष्मणाला पटेना. माझी रेषा ओलांडून कोण आंत जाईल ? असा कोण पराक्रमी आहे. ? निष्ठेची रेषा भक्तीने ओलांडली नाहीं तो पर्यंत कोण तिच्या अंगाला हात लावील ? पण नेम काय वहिनीनें ही रेषा ओलांडली असली तर लक्ष्मणाचे मन शनीत झाले. पण नाहीं. वहिनी पण माझा आज्ञाभंग करतील ? पण नेम काय सांगावा. ? स्त्री काय नि भाक्ति काय. दोघांही अंती भोळ्याच सीता नाहीं हे तर खरंच आम्ही नाही असे पाहून कोणी तरी डाव साधलेला दिसतोय सीता नाहीशीं झाली अशी त्याला खात्री वाटू लागली. लक्ष्मण रामाला म्हणतो, बंधो शोक कशाला ? माझी रेषा कोण ओलांडील वहिनीच कंटाळल्या असतील म्हणून बाहेर पुर्णकुटीच्या आसपास फिरत असतील नाहीं तर कोठें तरी फुलें वेचीत असतील. चल आपण उगाच शोक कशाला ? "

पर्णकुटीच्या आसपास त्यांनीं शोध केला. पण सीता दिसेना. रामाचा शोक हळू हळू वाढू लागला. लक्ष्मणाचे मन खिन्न होत चालले. एकंदर लक्षणें ठीक दिसत नाहीं हे तो समजून चुकला पण रामाला धीर देण्यासाठीं तो म्हणता, " रामा, वहिनी आजूबाजूस वनांत फिरत असतील. लता वेलींशीं बोलत खेळत असतील कदाचित आपली गंमत करण्यासाठीं त्या लपून बसल्या असतील. स्त्रीयांना लपंडाव खेळण्याची हौसच आपण शोधून काढूं "

" असली कसली थट्टा " असें म्हणून राम सीतेला मोठ्या मोठ्यान हाका मारूं लागला. पण प्रतिसाद नाहीं. राम लक्ष्मण अति दुःखीत होऊन सीतच्या शोधासाठीं निघाले. रामाला शोक आवरेना.

" लतांनो, सीतेला कोणी नेले. तेव्हां तुम्ही काय करत होता, माझं दुःख कमी करायचें टाकून असें विळखे घालून बघत काय राहिला. सीता कोठें आहे ! सांगाना. नाहीं. तुम्ही नाहीं बोलायचे. निर्दय आहांत. वृक्षांनो, असे मुकस्तंभासारखे दडेलोट काय उभे राहिलांत ! सीता दिसली कां तुम्हांला ? कोठे गेली ? बोलाना. नाहीं बोलत. माझें संकट पाहून तुमची वाचाच बसली कीं काय ? सिंहा वनराज आहेस तूं. आणि तुझ्याच राज्यांत असें घडावें आणि तुला त्याची दाद नसावी ! हा काय तुझा दरारा कां तूंच घाबरून पळालास. अरे व्याघ्रा, तुला तर कशाची भीति नाहींना ! मग सीतेला पळविली तेव्हां कां नाहीं झालास पुढे ? सांग ना मला, सीता कोठे आहे ? हरिणांनो, तुम्ही पाहिलीत कां सीतेला ? कोवळ्या मनाच्या तुम्ही. तुम्हीच भेदरला असाल. तुम्ही काय सांगणार. नाहीं. कोण कांहींच मला सांगत नाहीं. लक्ष्मणा, तूं तरी सांगरे मी आतां काय करूं ? कोठें जाऊं ? सीता कशी भेटेल ? काय झालें ? कोणी राक्षसानें तिला पळविली ? प्रिय सीते, आतां तूं कोठें असशील ? तुझें काय झाले असेल ? तुझ्यामुळें हा वनवास नंदनवनासारखा वाटत होता. पण आतां तो खरा वनवास वाटतोय. तुझ्या शिवाय मी काय करूं. "

रामाने धरणीवर अंग टाकलें व तो शोकानें लोळूं लागला. रामाची अवस्था पाहून लक्ष्मणाला अतिः दुःख झालें. पण रामाला धीर देण्यास आपल्याखेरीज कोण आहे हें जाणून त्यानें आपलें दुःख गिळले व रामास धीर देण्यासाठीं तो म्हणतो, " बंधो धीर धर. तुझ्यासारखा पराक्रमी वीरानें असा शोक करणें बरें दिसत नाहीं. तुझ्या बाणाचे टोंक काय बोथट झालें म्हणून तूं लहान मुलांप्रमाणें मुळमुळत बसावें अरे, सीतेच्या अंगावर पतिभक्तिचे कवच आहे कोण लावील तिला हात, पातिव्रत्याचे तेज नि सामर्थ्य तूं जाणतोस. चल उठ आपण आणखी शोधनस, हें वन शोधूं. नाहीं तर अनेक वने शोधूं. पृथ्वी पालथी घालू, इकडची दुनिया तिकडे करूं, पण सीतेला शोधून काढूं रघूवंशाच्या सामर्थ्याचा सूर्य नाहीं मावळला अजून. "

राम व लक्ष्मण दोघे सीतेच्या शोधासाठीं निघाले. जातजाता वाटेंत त्यांना हरिणांचा कळप दिसला. भित्रें जीवन. तें. राम लक्ष्मणाची चाहूल लागताच भीतीनें पळत सुटले. सीता कोणत्या दिशेला गेली. कांहींचि माहित नाहीं. मग जायचेतरी कोणत्या दिशेला ? राम व लक्ष्मण संभ्रयांत पडले. निराश झाले. पण निराशेच्या अंधकारांत आशेचा किरण मन शोधीत असते. हरिणांचा कळप पळतांना पाहून मग सापडल्याचा रामाला आशा वाटूं लागली. तो लक्ष्मणाला म्हणतो, " लक्ष्मणा, तो पहा हरिणांचा कळप दक्षिण दिशेकडे पळतो आहे. अरे, देवच आपल्या मदतीला धावून आला. त्यांचें पळणें सांगते कीं सीतेला दक्षिण दिशेला पळविली. चल त्याच दिशेनें आतां आपण शोध करीत जाऊ. " दोघेहि दक्षिण दिशेनें जाऊं लागले.

जातां जातां वाटेंत एके ठिकाणीं कांहीं फुलें पडलेली रामानें पाहिली. " लक्ष्मणा, पाहिलीस ही फुलें. मीच सीतेला सकाळीं हीं दिलीं होती. याच मार्गानें सीता गेली खास. " रामानें फुलांचा वास घेतला. आणखी थोडें पुढें गेल्यावर सोन्याचे कांहीं मणी मातीत पडलेले त्यांना दिसले, " लक्ष्मणा, हेंच ते मणी. सीतेच्या गेल्यातील माळेचे. कोणातरी राक्षसानें हिसकली असेल ती. " मणी पाहून राम अधिक शोकाकूल झाला. लक्ष्मण म्हणतो, " रामा, आपल्याला समजावे म्हणून सीतेनें ते मुद्दामच तोडून टाकले आहेत. चल असाच पुढें माग काढूं. " तें पुढें चालूं लागले. दोघेहि न बोलतां चांगले होते. फुले व मणी यांनी माग तर दाखवला पण सीतेची पावलें कोठेंच कशी दिसत नाहींत. फुलें व मणी दुसरी कोणाची तर नसावीत. नाहीं. ती सीतेचीच राजघराण्यांतील माळ दुसरे कोण घालणार. पण पाऊल ? कांहींतरी घोडाळा दिसतोय. अशा मनस्थितींत ते चालले होते. इतक्यांत एके ठिकाणीं मातींत पावलाचे ठसे त्यांना दिसले. राम म्हणतो, 'अरे लक्ष्मणा, बघ रे बघ. हें बघ ठसे ही बघ पाऊले. कांहीं ठसे मोठ्या पाऊलांचे आहेत तें राक्षसाचे आणि हें किती लहान व चिमुकलें हेंच तें तेच हें हेंच सीतेचे पाऊल राक्षसांनीं पळवून सीतेला येथपर्यंत आणली. बघ बघ तर खरं लक्ष्मणा चिमुकल्या पावलामागे ही जाड धिप्पाड पावले.. खास राक्षसांनी तिचा पाठलाग केला. सीतेचें कोवळें लुसलुसीत मांस भक्षण करण्यासाठीं कीरे राक्षस तिच्यामागे लागले. लक्ष्मणा काय रे झालें सीतेचें हें ! आता कशी रे मला सीता दिसणार ? कोवळी काकडी एकाद्या घटिंगानें करा करा—नको नको लक्ष्मणा तो विचार कसली सांपणार ? आणि सीता नाहीं तर लक्ष्मणा माझें जीवन ते काय राहिले. ? रथाचें एक चाक मोडल्यावर त्याला मुल्य ? अर्धांग गेल्यावर बाकीचे शरीर माती मोलाचे काय त्यांत जीवन राहणार ? सूर्याची प्रभा नाहीशीं झाल्यावर त्याचें काय अस्तित्व राहीले ? कोण म्हणेल त्याला सूर्य प्रभेमुळेंच ना सूर्याची कीर्ति होते व लोक कौतुक करतात. राम नाहीं सीता नाहीं व सीता नाहीं तर लक्ष्मणा, राम सीते शिवाय कसा जगू मी ? " ( शिवशक्ति, पुरुष, प्रकृती राम सीता, विठ्ठल रखुमाई, देवभक्ति ही अभिन्न आहेत. एका शिवाय दुसऱ्याला अस्तित्व नाहीं. शिवापासून शक्ति, पुरुषापासून प्रकृती, रामापासून सीता, विठ्ठलापासून रखुमाई, देवापासून भक्ति निराळी राहूं शकत नाहीं. असले तर दोन्ही एकत्रच )

लक्ष्मण रामाची समजूत घालतो. " रामा, उगाच शंकाकुशंका काढण्यांत काय अर्थ आहे ? निराश मन दिसेल त्यांतून स्वतास सोईस्कर अर्थ काढीत असतें. अशावेळीं शहाणे लोक त्याच्याकडे लक्ष देत नाहींत. तुझ्यासारख्या पराक्रमी वीराने

दुःख करीत बसणें हा पुरुषार्थ नव्हे. चल आपण आणखी पुढें जाऊं. सीता-वहिनींबद्दल कांहींना कांहीं अधिक माहिती मिळेल."

ते पुढें निघाले. कांहीं अंतर गेल्यावर एके ठिकाणी मोडून पडलेला रथ त्यांना आढळला. जिकडे तिकडे रक्ताचें थेंब दिसले. मोडून तोडून गेलेला मुकुट व पिखरलेली रत्ने त्यांनीं पाहिली. हें काय प्रकरण ? आजूबाजूला पाहातात तो एक मोठें धनुष्य मोडून पडलेलें. ध्वज फाडून तुटून पडलेला. थोड्या अंतरावर सारथी मरून पडलेले. त्यांना दिसला. रणांगणाचें दृश्य. तें पाहून रामाचे भानच हरवले.

"लक्ष्मणा, पाहिलेस हें सारें. अजूनही तुझी खात्री होत नाहीं. मी काय वेडा आहे उगाच शोक करायला, पहा हें. स्पष्टच आहे. सीतेसाठीं राक्षसांची आपआपसांत चांगलीच लढाई झालेली दिसते. तिचें हें दृश्य. राक्षसांनीं खास सीतेचें बरें वाईट केलें असेल. त्या आडदांडापुढें सीता काय करणार ? लक्ष्मण आतां नाहीरे सीता भेटायची." रामाचा शोक अनीवार झाला. बुद्धिचा ठाव सुटला. राम एकदम उसळून म्हणाला, "लक्ष्मणा, फुकट आहे आपला धर्म. कोठें आहे तो धर्म ? सीतेवर एवढा प्रसंग आला पण आला कां तो मदतीला सीतेच्या लपून कां बसता तो ? काय करायचा असला धर्म. देव देव म्हणतोस कोठें आहे तो देव यावेळीं कोठें गेला तो माझ्या सीतेला मदत करायला धावला नाहीं तो देव कसला ?" हे सगळं जगच खराब आहे. दुष्टांनीं भरलेले आहे. त्याचा साफ नायनाट करून टकला पाहिजे," बुद्धि विचार करतां करतां कित्येकवेळां एकदम स्थगित होते. अशावेळीं निराश मन मनमोकळे भटकतें व वाटेल त्या कल्पना करीत सुटते. व देवधर्मावर सगळे टाकून मोकळे झाले. राम निराश व शोकाकुल झाला होता.

हळूहळू लक्ष्मणानें त्याची पुष्कळ समजूत घातली. "रामा, देवा धर्माला कां उगाच दोष देतोस ? रणांगणाचे दृश्य पाहून नसत्या कल्पना कां करून घेतोस, भूतकाळ माहित नाहीं, वर्तमानकाळ समजत नाहीं मग भविष्यकाळाचे भलते सलते अंदाज बांधा कशाला ? देवाला दोष देतोस. पण कशावरून कोणाच्या रूपानें देव सीतेच्या मदतीस आला नसेल व त्यानेंच ही झुंज दिली नसेल ? रणांगण पाहून रामाचें धैर्य कधींतरी खचलें आहे ? तें शिष्य धनुष्य आठव. अशक्य गोष्ट शक्य करणें असें तुझें सामर्थ्य. मग सीतेला शोधून काढणें तुला अशक्य कां आहे."

दोघेही पुढें निघाले. एके ठिकाणीं देह छिन्न-विछिन्न झालेला. तोंड रक्तानें माखलेला असा कोणी तरी रक्ताच्या थोराळ्यांत लोळत असलेला त्यांनीं पाहिला.

त्याचें तें विचित्र तोंड पाहून राम ओरडला, " लक्ष्मणा, हाच तो राक्षस. यानेंच सीतेचें अपहरण केलें. मायावी हे राक्षस. आपल्याला फसविण्यासाठीं पक्षाचें रूप घेऊन पडला आहे. आण धनुष्यबाण. आतांच घेतो त्याचा समाचार. धनुष्यबाण घेऊन राम एकदम त्याच्या अंगावर धावून गेला.

" थांब रामा. मी जटायू. मारूं नकोस मला. मी आतां मरणारच आहे. केवळ तुझ्या दर्शनासाठीं व तुला कांहीं सांगण्यासाठीं जीव धरून राहिलो आहे. रामा, तूं जिच्या शोधासाठीं फिरत आहे व जी आम्हांस प्राणाहूनही प्रिय आहे अशा तुझ्या आवडत्या सीतेची बातमी तुला सांगण्यासाठीं मी जीव तगवून राहिलो आहे. रावणानें सीतेला पळवून नेतांना मी पाहिलें. तेव्हां त्याच्याशीं मी लढाई दिली व सीतेची सुटका करणाण्याचा प्रयत्न केला. त्याचा रथ मी मोडून टाकला. त्याचा सारथी मी मारला. रामा, मी तुझें कार्य करतोय या विचारानें मला हजार हत्तींचें बळ आले. रावणाला मी रोखून धरले. पण माझ्या सारख्या पक्षाचा टिकाव त्या धिप्पाड रावणापुढें कैसा लागणार. तो तरुण जवान व मी म्हातारा, त्याच्याकडे तीक्ष्ण शस्त्रास्त्रें. मी निःशस्त्र. चोंच व नखें हींच काय ती माझीं शस्त्रे पण नखांनीं व चोंचीनें मी त्याच्याशीं झुंज दिली. पण रामा त्याने माझें पंख छाटले. नाईलाज झाला माझा. मी जमीनीवर पडलों. मला मरणोन्मुख पडलेला पाहून रावण सीतेला घेऊन लंकेच्या दिशेला निघून गेला. रामा, मला वाईट वाटते कीं मी तुला पूर्ण मदत करूं शकलों नाहीं. सीतेची मला सुटका करता आली नाहीं." श्रमानें जटायूला ग्लानी आली तो निपचीत पडून राहिला.

रामाच्या डोळ्यांतून घळघळा आश्रू वाहूं लागले. काय ती भक्ति ! काय ती निष्ठा ! एका सच्चा दिलाच्या व सच्छा भावाच्या राम भक्तानें राम कार्यासाठी केलेलें बळीदान ते ! स्त्रीदाक्षिण्याचा मूर्तिमंत आदर्शच तो. जटायूच्या जीवनाची बैठक अध्यामिक होती अधिष्ठान पाहिजे भगवंताचें या तत्त्वाप्रमाणें चालणारा तो जटायूच्या रूपानें सीतेसाठीं धावून आला. देवाची इच्छा देवानें पूर्ण केली.


जटायूची स्थिति पाहून राम लक्ष्मण शोक करूं लागले. जवळ बसून मोठ्या प्रेमानें रामानें त्याच्या पाठीवरून हात फिरविला. रामाला वाटूं लागले की या सगळ्या अनर्थाला आपणच कारणी भूत आहोंत वनवास पत्करला वडिलांना बजावून बसलो, सीतेला बरोबर आणली रावणानें तिला पळविली व म्हणून जटायूसारखा निष्ठावंत भक्त गमावून बसलो. राम स्वतांला दोष देऊं लागला, " लक्ष्मणा, माझ्या सारखा पापी पृथ्वीवर नसेल. किती पापी मी. वडिलांना गमावून बसलो, सीतेला हरवून बसलो, जटायूला मुकलोच. मला भीति वाटते लक्ष्मणा, कदाचित् तुलाही हरवून

न. या पापी जीवनासाठीं निष्पाप जीवाचे बळी गेले. आत्मघाताखेरीज दुसरें यश्चित नाहीं या पापाला. अग्नींत उडी टाकेन तर माझ्या पापामुळें तोच विझून ईल, पाण्यांत उडी घेईन तर माझ्या पापाच्या दाहकतेमुळें तें आटून जाईल. काय माझा कर्मभोग. पराधीन हा जीव मानवाचा हेंच खरें, मळ्यांत पाटाचे पाणी ळी वळवीत असतो. जीवनाला वळवणारी असाच कोणीतरी असला पाहिजे. हांसर झालें हें कसें झालें असतें ?”

जटायू शुद्धिवर आला. तो क्षीण स्वरांत म्हणाला, “रामा, घाबरू नको. तेला कांहीं इजा होणार नाहीं, ती परत येईल. तुझें रत्न तुला परत मिळेल व नंदानें व सुखानें राज्य करशील, रामा येतो मी. मला आशिर्वाद दे. ’रक्ताची ळणी होऊन जटायूनें देह ठेवला.

रामलक्ष्मणानें जटायूला अग्नि संस्कार दिला. जें दशरथाच्या बाबतींत राहिलें तें तृतुल्य जटायूच्या रूपानें पूर्ण झालें व अंती वडिलाचा मान केल्याचें समाधान म लक्ष्मण दोघांनाही झालें. सगळे आटोपले. रामाच्या तोंडून एक सुस्कारा आला न हें असें आहे.

( श्री राजगोपाळचारी यांच्या इंग्रजी रामायणाच्या आधारे. )



# राम वनीं चालला ग, राम वनीं चालला!

कैकयीच्या इच्छेस अनुसरून केवळ कर्तव्यबुद्धीनें रामलक्ष्मण नि सीत वनवासास निघाले. त्यांचा पहिला मुक्काम झाला तो गुहाच्या अरण्यांतील राज्यांत तो परम रामभक्त होता. त्यानें या राज–पाहुण्यांचें स्वागत उत्तमप्रकारें केलें. तेथू भारद्वाजमुनींचा आशीर्वाद घेऊन ते चित्रकूट पर्वतावर दाखल झाले. हा रामायण तील हृद्य कथाभाग पुढें देण्यांत आला आहे.

तमसेच्या तीरावर झोंपलेले प्रजाजन सकाळीं जागे झाले आणि त्यांनीं समोवा पाहिलें. राम आणि त्याचा रथ अदृश्य झालेला पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. रथाच्या चाकांच्या खुणांमागोमाग ते गेले आणि त्या चाकोऱ्या शेवटीं राजधानीकडे जाणाऱ्या हमरस्त्याला जाऊन मिळालेल्या पाहिल्यावर प्रजाजन निराश झाले.

मग ते आपापल्या घरीं परतले आणि कैकेयीला नांवें ठेवण्यांतच त्यांनीं समाधा मानलें. राम नव्हता; राजधानींतलें सौंदर्यच जणूं नष्टप्राय झालें होतें आणि सर्व अयोध्येवर उदासीनतेची कळा आली होती.

इकडे सुमंत्र आणि राम-लक्ष्मण-सीता तमसा पार करून पहाट होण्यापूर्वी अरण्यांत खूप दूरवर गेलीं होतीं. कित्येक ओढे ओलांडून तीं कोसल देशाच्या दक्षि सीमेशीं येऊन ठेपलीं. रथ पुढें जात असतां राम सुमंत्राला म्हणाला, "शरयूच्या अरण्यांत शिकार करण्याचा योग आतां परत केव्हां येईल कोण जाणे! परंतु राजपुत्रा शिकार करणं योग्य आहे का? कुणास ठाऊक! कदाचित् अतिरेक टाळून केली, त तें अनुचित ठरणार नाहीं."

अशा प्रकारें विविध विषयांवर बोलत त्यांनीं मार्ग आक्रमिला. राज्याच्या दक्षि सीमेवर आल्यावर रामानें रथ थांबविला आणि उत्तरेकडे अयोध्येच्या दिशेला वळू नतमस्तक होत तो म्हणाला, "हे नगररत्ना, इक्ष्वाकु वंशाच्या राजनगरी, वनवा संपल्यावर परत मला तुझं व माझ्या मातापित्यांचं दर्शन घडेल का? ह्या सर्वो आनंदाचं दान तूं मला दे."

रथ गंगेच्या तीरावर आला. गंगेचें सौंदर्य डोळे भरून पाहात ते पुढें निघा तेथें एक अतिशय रम्य स्थळ रामाला दिसलें व तो म्हणाला, "आजची रात्र आप इथेंच मुक्काम करूं या."

घोड्यांना मोकळे सोडून ते एका झाडाखालीं बसले. गुह ह्या भागाचा प्रमु

होता. राम येथें येणार आहे, हें त्याला आधीच त्याच्या लोकांकडून कळलें होतें. लागलीच तो रामलक्ष्मणांचें स्वागत करण्यासाठीं आपल्या लवाजम्यासह आला.

राजवंशावर व रामावर त्याचें अमर्याद प्रेम होतें. गंगेच्या तीरावर वस्ती करून राहणाऱ्या जमातीचा तो नायक असल्यानें, त्याच्या हातांत सत्ता होती व समाजांत त्याला मान होता. तो दूर अंतरावर असतांनाच त्याला भेटण्यासाठीं राम व लक्ष्मण उभे राहिले. दृढ आलिंगन देऊन गुहानें त्यांचें स्वागत केलें व तो म्हणाला, “ही भूमि आपलीच समजा. अयोध्या जेवढी तुमची आहे, तेवढीच ही भूमिही तुमचीच आहे. तुमच्यासारख्या पाहुण्यांचे पाय आमच्या येथें लागतील, अशी आशा आम्ही गरीब लोक कशी बाळगणार ? आपण आलांत, हें माझें परमभाग्यच आहे.

पाहुण्यांच्या सरबराईची उत्कृष्ट व्यवस्था गुहानें केली होती. तो म्हणाला, “माझ्या ह्या राज्यांत अगदीं घरच्यासारखे राहा. हीं चौदाही वर्षे तुम्ही आमच्याबरोबर इथेंच घालवलींत, तरी तुम्हांला कांहीं कमी पडणार नाहीं याची हमी मी घेतों. तुमचं आदरातिथ्य करण्यांत मला गौरवच वाटेल. कृपा करून माझ्या ह्या आतिथ्याचा स्वीकार करा.”

परत एकदां गुहाला प्रेमानें आलिंगन देऊन राम म्हणाला, “गुहा, तूं माझा मित्र आहेस. तुझं माझ्यावर किती प्रेम आहे, हें मीं जाणतों. आमचं आदरातिथ्य करण्याची इच्छा तूं व्यक्त केलीस, यांतच तूं प्रत्यक्ष आदरातिथ्य केल्यासारखं झालं. परंतु माझ्या वचनांनीं मी बांधलेला असल्यानें, यापेक्षां अधिक कांहींच मला स्वीकारतां येणार नाहीं. मी वनांत राहाण्याकरतां आलों आहें, तुझ्यासारख्याचा पाहुणा म्हणून सुखोपभोग घेण्याकरितां मी आलेलों नाहीं. ह्या घोड्यांवर माझ्या वडिलांचा फार जीव आहे. त्यांना नीट खाऊं पिऊं घाल. साधं अन्न व रात्रीची विश्रांति एवढ्यावरच आम्ही संतुष्ट आहोंत.”

रात्रीं ते झाडाखालींच आडवे झाल. गुह आणि लक्ष्मण सुमंत्राशीं बोलत बसे राहिले.

गुह लक्ष्मणाला म्हणाला, “लक्ष्मणा, तूं जा आणि आराम कर. तुझं अंथरूण [illegible] ठेवलं आहे. माझीं माणसं जागता पहारा ठेवतील. हें अरण्य माझ्या [illegible]लं आहे. इथें कुणीच तुमच्या केंसाला धक्का लावूं शकणार नाही. तूं रामा-[illegible] काळजी करूं नकोस. जा, तूं जाऊन झोंप.” लक्ष्मणानें उत्तर दिलें, ‘गुहा, मी [illegible] झोंपूं ? दशरथाची सून आणि जनकाची कन्या सीता इथें जमिनीवर झोंपली [illegible] त्रिखंड जिंकूं शकणारा साक्षात् पुरुषोत्तम इथें गवतार झोंपला आहे. हे सारं [illegible] डोळ्यांसमोर असतांना मला झोंप कशी येईल ?

“अयोध्या नगरी हे कसं सहन करीत असेल ? राण्यांच्या महालांतून रडारड [illegible] असेल. राणी कौसल्या आणि माझी आई, ह्या दोघी जिवंत तरी असतील

का, याची मला शंका वाटते. रामाला वनांत जायला सांगण्याचे शब्द उच्चारण्याकरतां वडिलांना केवढं बळ एकवटावं लागलं; परंतु आतां राम प्रत्यक्ष निघून गेल्यावर, त्याचा विरह सहन करण्याचं सामर्थ्य त्यांच्यांत आहे किंवा काय, हें मी सांगूं शकणार नाही. आणि वडिलांचा जर मृत्यु ओढवला असेल, तर आमच्या मातांनींहि प्राणांचा त्याग केला असेल.

" परंतु, कांहीं झालं, तरी वनवासाच्या काळानंतर परत अयोध्येला गेल्यावर मातापित्यांचं दर्शन होणं फारसं शक्य कोटींतील वाटत नाही.

दुःखानें मारावून जाऊन लक्ष्मणानें वरील उद्गार काढले. गुहाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. अशाच करुण संवादांत त्यांनीं रात्र घालविली.

दुसऱ्या दिवशीं भल्या पहांटे राम लक्ष्मणाला म्हणाला,

" लक्ष्मणा, आतां आपल्याला नदी ओलांडायला हवी. हें पात्र विशाल आहे. तें पार करतां येवढी मोठी होडी तयार करायला तूं गुहाला सांग. "

गुहानें आपल्या माणसांना तशी आज्ञा केली व त्याप्रमाणें रामाला कळविलें.

लवून मुजरा करून पुढील आज्ञेची वाट पाहात सुमंत्र रामासमोर उभा राहिला.

रामानें सुमंत्राचं मुकें दुःख ओळखलें आणि सुमंत्राच्या खांद्यावर हात ठेवून तो म्हणाला, " सुमंत्रा, जितक्या वेगानें अयोध्येला जातां येईल, तितक्या वेगानें येथून प्रयाण कर व महाराजांच्या सेवेस हजर हो. त्यांची काळजी घेणं, हेंच आतां तुझं कर्तव्य आहे. "

सुमंत्र उद्गारला, " रामा, सदाचार, विद्वत्ता आणि संस्कृति यांना आतां कांहींच किंमत उरलेली नाहीं असं वाटतं. तूं, लक्ष्मण आणि वैदेही आतां वनांत राहणार आहांत. मग आतां आमच्या नशिबीं काय आहे ? कैकेयीच्या कारकीर्दीत आमची काय दशा होईल ? " असें म्हणून तो एखाद्या लहान मुलाप्रमाणे रडूं लागला.

सुमंत्राच्या डोळ्यांतील आंसवें पुसून राम म्हणाला, " राजघराण्याला तुझ्या इतका निष्ठावान् मित्र लाभलाच नाहीं. माझ्या पित्याचं सांत्वन करणें, हें तुझं कर्तव्य आहे. दुःख तिरेकानें त्यांचं हृदय जडावलं आहे. त्यांनीं कांहींहि आज्ञा केली, तरी तिचं तूं पालन कर. ती आज्ञा त्यांनीं स्वतःकरितां केली आहे, कीं कैकेयीला खूष करण्याकरितां केली आहे, याचा विचार तूं करूं नकोस. त्यांच्या मनाला कोणत्याहि प्रकारे ताप देऊं नको आणि आमची चिंता सोड.

" ' पूर्वी कधीं भोगलं नव्हतं एवढ्या प्रचंड दुःखानें जर्जर झालेल्या माझ्या वृद्ध पित्याला माझ्या वतीनें माझा हा निरोप सांग. मी जसे घरीत असें, तसे तूं त्यांचे पाय धर आणि त्यांना दिलासा दे, कीं मी किंवा लक्ष्मण किंवा सीता, आम्ही

कोणाच्याच मनांत, आपल्याला अयोध्येपासून दूर पाठवलं गेलं याबद्दल दुःख नाहीं. त्यामुळें आम्ही मुळींच दुखावले गेलेला नाही. वनवासाचा चौदा वर्षांचा काळ लवकर संपेल आणि आम्हांला परत त्यांच्या पायाशीं आशीर्वाद घेण्याची येण्याची संधि मिळेल, अशी आशा आम्ही बाळगून आहोंत. कौसल्या मातेला माझे प्रणाम सांग. तिच्या आशिर्वादाने आम्ही सर्वजण खुशाल असल्याचं वृत्त तिला दे, आणि माझ्या सर्व सावत्र मातांनाही. विशेषतः कैकयीला, नाहींतर तिला वाटेल आम्हीं रागानेंच आयोध्या सोडली, हाच निरोप सांग. भरताचा राज्यारोहणसमारंभ शक्य तितक्या लवकर उरकून टाकण्याचा निरोपहि महाराजांना सांग. म्हणजे आमच्या अनुपस्थितींत भरत त्यांची काळजी घेईल."

परंतु, सुमंत्राला आपला उसळून येणारा शोक आवरतां आला नाहीं. त्यानें विचारलें, "पण आतां मी कसा परत जाऊं ? आणि कोणत्या शब्दांनीं त्यांचं सांत्वन करूं ?" मोकळ्या रथाकडे पाहून तो रडत रडत म्हणाला, "तुम्ही बसलेले नसतांना हा रथ तरी मी कसा नेऊं ?"

रामानें परत एकदां सुमंत्राचें सांत्वन करणारे व त्याला धीर देणारे शब्द उच्चारले, धीरानें आपलें कर्तव्य करण्यास बजावून सांगितलें व त्याला परत पाठविलें.

नंतर राम गुहाला म्हणाला, "गुहा, तू म्हणतोस त्याप्रमाणे हीं चौदा वर्षं मी तुझ्या राज्यांतहि घालवूं शकेन; परंतु, तसं केल्यानें माझ्या वचनाची पूर्ति होईल काय ? माझ्या पित्याचं वचन खरं करण्याकरतां मीं अयोध्या सोडली. तेव्हां आतां मला तपस्याचं जीवनच व्यतीत करायला हवं. चमचमीत मिष्टान्न मला टाळलंच पाहिजे. फळं, कंदमुळं व यज्ञाग्नींत हवि म्हणून टाकण्यांत येणारं मांस सोडून दुसरं कांहींच मीं खातां कामा नये."

अशा प्रकारें गुहाचें सांत्वन करून, केसांना वडाच्या झाडाचा चीक लावून राम लक्ष्मणांनीं जटा बांधल्या. सीतेला होडींत बसवून नंतर ते स्वतः होडींत जाऊन बसले. गुहानें वल्हीं मारण्याची आज्ञा केली.

नावाड्यांनीं त्यांना थोड्या वेळांत पलीकडील तीरावर आणून सोडलें. गंगेच्या दुसऱ्या तीराला ते लागले आणि तेथें, प्रथमच कोणाहि मित्राच्या सोबतीविना, ते तीरावर उभे राहिले.

राम म्हणाला, "लक्ष्मणा, आतां तूंच काय तो माझा सशस्त्र रक्षक आहेस. तूं पुढें चाल, तुझ्या मागें सीता आणि तुम्हां दोघांच्या मागें शेवटीं मी. सीतेला वनवासाचे कष्ट पडूं नयेत, म्हणून आपण शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. येथपासून आतां आपण एकटे. आपल्याबरोबर कोणीच असणार नाहीं आणि आतां ऐषआराम वगैरे सर्व बंद !"

रामाला कौसल्यामातेची आठवण झाली.

तो म्हणाला, "परंतु लक्ष्मणा, तूं खरं म्हणजे अयोध्येला परत जाऊन कौसल्यामातेची व सुमित्रादेवींची सेवा करावीस. वनवासांत माझं मी कसंहि पाहून घेईन."

लक्ष्मण म्हणाला, "रामा, मला क्षमा कर, परंतु, मी कांहीं असा अयोध्येला परत जाणार नाहीं." अर्थात् रामाला ह्याहून वेगळ्या उत्तराची अपेक्षा नव्हती.

अशा प्रकारें रामायणांत माणसाच्या अंतःकरणाला भिडणारे प्रसंग वारंवार येतात आणि ईश्वरी अवतार असलेला राम साध्यासुध्या माणसाप्रमाणें बोलतो, असें आपल्याला आढळून येतें. रामायण आपल्याला आकर्षून घेतें तें असें. सर्वशक्तिमान् ईश्वर जर सर्वशक्तिमान्च राहिला व स्वतःच सर्व कांहीं करीत बसला, तर मग अवताराची जरूरीच काय आणि मग सामान्यजनांच्या धर्मांची प्रतिष्ठापना कशी होणार ?

पूर्वींच्या आणि नंतरच्या अवतारांत एक फरक आहे. रामावतारांत माणसाचें आचरण व तें आचरण आंखून देणारा धर्म हे एकमेकांत मिसळलेले आहेत, ही गोष्ट वाल्मीकीनें स्पष्ट केली आहे.

युद्धानंतर सीतेच्या अग्निदिव्याच्या प्रसंगी इतरांसमवेत ब्रह्मदेवही तेथें प्रकट झाला व सीतेच्या अग्निदिव्याविषयीं त्यानें आपली नापसंती व्यक्त केली. तेव्हां राम त्याला म्हणाला,

"मी स्वतःला फक्त एक सामान्य मानव, दशरथाचा पुत्र राम समजतों. मी खरोखर कोण आहे, मी मूळचा कोठला, मीं जन्म कां घेतला याविषयीं मला कांहींच माहिती नाहीं. तें ज्ञान आपण मला करून द्यावं."

रामाचें मन अयोध्येंत असलेल्या मातांविषयीं विचार करण्यांत गुंतलें असतांना लक्ष्मणानें चार प्रेमाचे शब्द बोलून त्याला धीर दिला.

ती रात्र त्यांनी एका वडाच्या झाडाखालीं घालविली. दुसऱ्या दिवशीं पहाटेच उठून त्यांनी भरद्वाज मुनींच्या आश्रमाकडे कूच केलें व सूर्यास्ताच्या सुमारास तीं आश्रमांत पोंचलीं.

भरद्वाज मुनींचें आतिथ्य ग्रहण करून, चौदा वर्षें वनांत शांतपणें कोठें घालवतां येतील, याबाबत त्यांनीं मुनींचा सल्ला घेतला व त्याप्रमाणें त्यांचे आशीर्वाद घेऊन तीं चित्रकूटाकडे रवाना झालीं.

ती रात्र रामानें भरद्वाज मुनींच्या आश्रमांत घालविली. सकाळीं उठल्यावर महर्षींना प्रणाम करून व त्यांचा निरोप घेऊन त्या तिघांनीं चित्रकूट पर्वताकडे प्रयाण केलें.

राम-लक्ष्मण-सीता यांना भरद्वाज मुनींनीं आपलींच मुलें मानलें व ते त्यांच्याशीं प्रेमळपणें वागले. आशीर्वाद देऊन व चित्रकूटाची वाट नीट समजावून सांगितल्यावरच मुनींनीं त्यांना निरोप दिला.

भरद्वाज मुनींनीं सांगितलेल्या वाटेनें तीं तिघेंहि पुढें निघालीं. वाटेंत त्यांना कालिंदी नदी लागली. ओंडके, बांबू व अरण्यांतील वेली कापून त्यांनीं एक तराफा बनविला. त्यावर कोमल वेली व पानांचें एक आसन लक्ष्मणानें सीतेकरितां तयार केलें. मग त्यांनीं सुखरूपपणें नदी ओलांडली.

प्रवाहाच्या मध्यभागीं आल्यावर सीतेनें त्या जलदेवतेला अर्घ्य देऊन तिचें स्तवन केलें. रामाचें वचन पुरें होवो व आम्हांला तिघांनाहि परत घरीं जातां येवो, अशी प्रार्थना तिनें केली.

आणखी कांहीं जलप्रवाह ओलांडल्यावर ते भरद्वाज मुनींनीं वर्णन करून सांगितलेल्या एका मोठ्या वडाच्या झाडाशी आले. ह्या झाडाखालीं सीतेनें परत प्रार्थना केली, "हे पवित्र वटवृक्षा, माझ्या पतीचं वचन पुरं होऊन मला परत कौशल्यामातेचं व सुमित्रादेवींचं दर्शन घडो, असा वर तूं मला दे."

रामानें लक्ष्मणाला सीतेच्या पुढें चालायला सांगितलें व तो स्वतः सीतेच्या मागोमाग चालूं लागला. "वाटेंत सीतेनें कोणतंहि फूल किंवा फळ मागितलं, तर तें तूं तिला देऊन तिच्या वृत्ति सतत आनंदित ठेव," असें रामानें लक्ष्मणाला सुचविलें.

वाटेंत सीतेनें कुतूहलानें अरण्यांतील वृक्षवेलींविषयीं प्रश्न विचारले. अरण्याच्या विपुल व विविध सौंदर्याचें आकंठ पान करण्यांत ती गुंग झाली.

त्यांचा हा प्रवास अतिशय सुखकर झाला व रात्रीचा मुक्काम त्यांनीं एका नदीच्या तीरावर ठोकला.

शिकार करून रामानें व लक्ष्मणानें अन्न कसें मिळविलें, याचें वर्णन वाल्मीकि येथें व इतरत्रही करतात. त्यांना मुख्यत्वेंकरून मांसावरच उपजीविका करावी लागली, हें ते उघडपणें सांगतात. यामुळें कांहीं सज्जन विचलित होतात. परंतु क्षत्रियांना मांसाहार निषिद्ध नव्हता आणि खरें म्हणजे सरळ मार्गानें मिळविलेलें व ईश्वरार्पण केलेलें कोणतेंहि अन्न चांगलेंच असतें, असा एक नियमच भारतांत चालत आला आहे. राम क्षत्रिय होता आणि अरण्यांत तो क्षत्रियाप्रमाणेंच, परंतु संयमानें राहिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं राम उठला व लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, ऐक. पक्षी उगवत्या सूर्याचीं स्तोत्रें गात आहेत. आपली निघायची वेळ झाली आहे."

वनांतलीं चौदाही वर्षें लक्ष्मणानें उपवास करून व न झोंपतां काढलीं, ह्या लोकप्रिय कहाणीला वाल्मीकि दुजोरा देत नाहीं. कांहीं वेळां तर दमल्यामुळें लक्ष्मणाला सकाळीं लौकर जाग येत नाहीं आणि मग राम त्याला झोंपेंतून जागा करतो, असेही उल्लेख रामायणांत आहेत.

स्नान उरकून व पूजा आटोपून परत त्यांनीं भरद्वाज मुनींनीं सांगितलेल्या वाटेवरून चालायला सुरुवात केली. उन्हाळ्याचे दिवस होते. झाडेंझुडपें रंगीबेरंगी फुलांनीं फुललीं होतीं. फुलाफळांच्या भारानें फांद्या खालीं झुकल्या होत्या.

राम त्या सृष्टिसौंदर्याकडे सीतेचें लक्ष एकसारखें वेधीत होता. तो म्हणत होता, "इथें माणसांची गजबज नाहीं. त्यामुळें हें अरण्य किती सुंदर राहिलं आहे! तीं मधाचीं पोवळीं पाहा! कशीं झुलत आहेत! जमिनीवर पाहा कसा फुलांचा सडा पडला आहे! ती पक्ष्यांची किलबिल ऐक! ते एकमेकांना म्हणणारीं गाणीं किती गोड आहेत! त्यांचं जीवन किती आनंदानें भरलेलं आहे! हे नाद आणि हीं दृश्यं जर आपल्याला उपभोगतां आलीं, तर आपलं जीवन किती सुखी होईल!"

मग दूर अंतरावर त्यांना चित्रकूट पर्वत दिसला. आनंदित होऊन त्यांनीं पाऊल उचललें. "हा प्रदेश किती सुंदर आहे!" राम उद्गारला. "येथील वनांत उत्कृष्ट फळं व कंदमुळं आहेत! पाणीहि जवळच आहे आणि तें गोड आहे. ह्या वनांतील आश्रमांत ऋषींचा वास आहे. त्यांच्या पवित्र संगतींत आपले दिवस नक्कीच मोठ्या आनंदांत जातील."

तेथें त्यांनीं स्वतःकरितां एक आश्रम बांधायला सुरुवात केली. लक्ष्मण अतिशय कुशल कारागीर होता. थोडक्याच वेळांत त्यानें एक मजबूत झोपडी उभी केली. त्या झोपडींत पाण्याला शिरायला वाट नव्हती. ती अतिशय आरामशीर व सोयीस्कर होती. बांबूचीं खिडक्या-दारें बसवून लक्ष्मणानें एकट्यानेंच ती मातीची झोपडी बांधून काढली.

ह्या प्रसंगाचें वर्णन करण्यांत वाल्मीकि आणि कंबण यांच्यांत जणूं स्पर्धा लागते. कंबण म्हणतो, लक्ष्मणानें झोपडी बांधून पुरी केल्यावर रामानें स्फुंदत स्फुंदत त्याला मिठी मारली व तो म्हणाला, "लक्ष्मणा, अरे हें सर्व तूं शिकलास तरी केव्हां आणि कसं?" ह्या प्रसंगाची आपण कल्पना करूं शकतों.

कंबण म्हणतो, रामाचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले होते. तो म्हणाला, "मिथिलेच्या ह्या राजकन्येच्या फुलासारख्या कोमल पायांनीं अरण्याची कठीण वाट तुडविली आहे. तिच्या पायांनीं हा एक चमत्कारच घडवून आणला आहे. परंतु, लक्ष्मणा, तुझ्या हातांनींही हा एक चमत्कारच घडवून आणला आहे. दुर्दैवांतहि लाभ असतो, हें मला आजच प्रथम पाहायला मिळालं." तेथें, चित्रकूट पर्वताच्या बाजुला, माल्यवती नदीच्या तीरावर उभारलेल्या त्या पर्णकुटींत दैनंदिन पूजाअर्चा करीत तीं तिघें स्वच्छंदानें राहिलीं. आपण वनवासांत आहोत, हेंहि तीं विसरून गेलीं. इंद्र जसा देवांच्या घोळक्यांत सुखानें राहातो, तसे ते येथें राहिले.

चित्रकूटांतील सुखाचे दिवस ही नंतर त्या तिघांवर कोसळणाऱ्या दुःखाकष्टांना एक अद्भुत पार्श्वभूमि म्हणून लाभली.

# रामावताराचा अर्थ

लेखक : केशव कृष्ण प्रधान

शरीर, मन नि बुद्धि या मानवांतील तिन्ही भागांचा योग्य विकास झाला तरच खरीखुरी सत्व, रज, तम या त्रिगुणांची साम्यावस्था साधणार आहे व त्यांचा सुंदर मिलाफ हृदयाच्या ठिकाणीं अद्वैत होऊन मानवास ईश्वरी साक्षात्काराचा मार्ग सांपडणार आहे. आपण प्रति वर्षी रामजन्मोत्सव साजरा करतों; परंतु त्या अवताराचे रहस्य काय, हें आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मत्स्य, कच्छ, कूर्म, वराह, नारसिंह, व परशुराम या सहा अवतारानंतर श्री. प्रभूरामचंद्राचा अवतार झाला. अवतार ही उत्क्रांती चिन्हे आहेत. ती उत्क्रांतीतील ठराविक टप्पे दर्शविणारी श्रेष्ठ प्रतिके असतात.

मानवाची उत्क्रांती याच टप्प्या, टप्प्यानें झाली आहे. मानवाच्या कमरेपर्यंतच्या भागांतील उत्क्रांती कच्छ, मत्स्य, कूर्म, वराह या क्रमानुसार झाली आहे.

### उत्क्रांतीचा इतिहास

मत्स्य उत्क्रांतीत माशाच्या अंगातील चपळपणा, तुकतुकीत अंगकांती, पाण्याखाली असलेला हवेचा दाब सहन करण्याएवढी, क्षम फुफ्फुसे मानवाला लाभली, तर कच्छ उत्क्रांतीत शरीराचा चिवटपणा भूमीला व पाण्याखालील खडकाला चिकटून राहण्याची जबरदस्त इच्छाशक्ति वगैरे गुण निसर्गानें बहाल केले. कूर्म उत्क्रांतीत कातडीचा जाड, कठीणपणा संथगतीनें पण ध्येयाकडे निश्चित जाण्याची प्रवृत्ति हे गुण मानवानें आत्मसात केले. वराह उत्क्रांतीत साहस, धाडस ठोकर मारून संकटास तोंड देण्याची वृत्ति, एका तऱ्हेनें कांहीं न साधल्यास ते अगदी मूळासकट उपटून काढण्याची प्रवृत्तिही मानवास मिळाली.

नारसिंह अवतारात मानवाला अर्ध पशु व अर्ध मानव या अवस्थेची जाणीव झाली. नारसिंह या अवताराला पूर्णावस्थेला गेलेल्या पशुराजांचे मुख व जबडा देऊन पशुयोनीतील मानवांच्या उत्क्रांतीला पूर्णविराम, व मानवयोनींत पदार्पण केलेली अवस्था व मानव शरीर बहाल करून दाखविलेली सुचिन्हें प्राप्त झाली.

मानवाला पशुयोनींत पशुत्व येणे अपरिहार्य होते. त्यांतील क्रूरपणा, क्रोध, द्वेष, असूया या दुर्गुणांचा नाश करण्यास परशुरामाचा परशु घेऊन अवतार झाला परंतु तोच परशु घेऊन जेव्हां परशुराम सद्गुणांचे चालते बोलते प्रतीक अशा प्रभु रामचंद्रावर वार करण्यास प्रवृत्त झाले, तेव्हां प्रभुच्या सामर्थ्यानें तोच परशु वरच्यावर राहिला व

व परशुरामाला रामचंद्रास शरण जाण्याखेरीज दुसरा मार्ग राहिला नाहीं. नंतर गंगातटाकीं जाऊन तप करून अवतार समाप्ती करावी लागली.

असा हा उत्क्रांतीचा व अवतारांचा थोडक्यात इतिहास झाला. या पार्श्वभूमीवरून प्रभुरामचंद्राच्या अवताराचा विचार केला तर तो अवतार मानवाच्या कंबरेपासून हृदयापर्यंतच्या भागाची उत्क्रांती करण्याकरितां मुख्यतः झालेला दिसतो. या दृष्टीकोनातून पाहिल्यास प्रभु रामचंद्राच्या ठिकाणीं वसत असलेल्या विविध सद्‌गुणसमुहावर फारच उत्तम प्रकारें प्रकाश पडतो.

### आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पति व योद्धा

ऋषींच्या धार्मिक कर्मांमध्ये नेहमी व्यत्यय आणणाऱ्या राक्षसापासून ऋषीमुनींचे रक्षण करण्याचे कर्तव्य क्षत्रियांचे. ते क्षत्रिय जेव्हां यांत हेळसांड करू लागले तेव्हां एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करून श्री. परशुरामानी त्यांस योग्य तऱ्हेनें ताळ्यावर आणले व अवतार समाप्ती केली. तर प्रभु रामचंद्रानी रघुकुलांत जन्म घेऊन क्षत्रियाचें नांव पुन्हां एकदां उज्वल केले. बालवयातच विश्वामित्रऋषींच्या समवेत अरण्यात जाऊन लक्ष्मणाच्या सहाय्यानें तीच यज्ञकर्में राक्षसांचा नाश करून निर्विघ्नपणें योग्य तऱ्हेनें पुन्हां सुरू केली. व मानवातील कर्तव्यपरायणता हा गुण वाढीस लावला. अयोध्येच्या सार्वभौमपदाचा त्याग करून आपला प्रिय बन्धू भरत यासच राज्यपद मिळवून देण्याचा आपल्या सावत्र मातेचा हट्ट पुरा केला. व मोह झुगारून आपल्या प्रियजनांच्या इच्छा पुरविण्यासाठीं नानातऱ्हेच्या हालअपेष्टा भोगल्या. आदर्श पुत्र, आदर्श बन्धू, आदर्श पति, आदर्श योद्धा या सर्व आदर्शांत जे जे सद्‌गुण मानवात वाढीस लागावयास पाहिजेत ते ते सद्‌गुण कसे वाढीस लावावे, याचे सोदाहरण प्रात्यक्षिक दाखवून मानवाच्या उत्क्रांतीस जोरानें चालना दिली.

मानवाच्या कंबरेपासून हृदयापर्यंतच्या भागांतील नुसत्या कमरेचा जर आपण विचार केला तरी आपणास असे दिसून येईल की मानवाच्या कटीप्रदेशावर मानवाची बळकटी अवलंबून आहे. कारण कंबरेपासून वर मानवाच्या विशाल वक्षस्थळास सुरुवात होऊन मानवाच्या बाहूंची पुष्ठता व सुडौल आकार त्यावरच अवलंबून असतो. थोडक्यात, मानवाच्या पराक्रमाचें व शौर्याचे एकमेव स्थान हे वक्षस्थळच असून ते शौर्य व पराक्रम गाजविण्यास तितक्याच पुष्ठ पराक्रमी बाहुंची गरज असते. श्री. प्रभुरामचंद्राची कंबर हरीणासारखी बारीक असून वक्षस्थळ विशाल व बाहु पुष्ठ व दौलदार होते असे वर्णन आपण वाचतो. या भागांचा नुसता शारीरीक विकास होऊन चालत नाही तर मानवाच्या वक्षस्थळांच्या ठिकाणी ज्या हृदयमंदीराची आपण कल्पना करतो त्याचाही निकटचा संबंध या भागाशी येतो.

### अवतारांतील श्रेष्ठ कार्य

"हृदय कुहरमध्यें केवलं ब्रह्ममात्र" किंवा "ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशे तिष्ठतेर्जुन" अशी ज्याची महती गाइली आहे त्या हृदयांत परमेश्वराचा वास असल्याकारणानें

तथूनच मानवाचे सर्व सद्गुण वाढीस लागतात. त्या हृदयाचा विकास करण्याचे फार महत्त्वाचे कार्य प्रभूरामचंद्राच्या अवतारातील सर्वांत श्रेष्ठ कार्य आहे.

मानव हा त्रिगुणात्मक स्वरूपात असून पशु योनीत तमाधीन, मानवयोनीत रजोमय व देवयोनीत सत्वमय अशा तिन्ही अवस्थांचा अनुभव मानवी देहात घेऊ शकतो. कंबरेखाली तमाचा प्रभाव जास्त व कंबरेपासून हृदयापर्यन्त रजोगुणाचा अम्मल जास्त व मानेपासून डोक्यापर्यंत सत्त्वगुणाचा प्रभाव जास्त. मानवाच्या देहात त्रिगुणात्मक संचार सतत चालू असून कधी तम जास्त तर कधी रज, तर कधी सत्व जास्त अशी सतत क्रिया चालू असते. सत्व, रज आणि तम या तिन्ही गुणांचा सुन्दर मिलाफ फक्त मानवांच्या हृदयातच निर्माण होऊ शकतो व म्हणूनच हृदयाच्या ठिकाणी परमेश्वराचा सतत वास असल्याचा मानवाला अनुभव येतो. या तीन्ही गुणांचा उत्तम तऱ्हेने मिलाफ करण्यासाठी त्यांची साम्यावस्था निर्माण होणे आवश्यक आहे. ती साम्यावस्था हृदयात निर्माण झाल्यास मानवात श्रद्धा वाढीला लागते व 'श्रद्धावान लभते ज्ञानं' ह्या भगवान् उक्तीप्रमाणें त्याला हृदयांत ईश्वरी साक्षात्कार होतो.

### योगवाशिष्ट


'योगवाशिष्ट' हा ग्रंथ केवळ श्री. प्रभूरामचंद्राच्या अवताराची खास आठवण करून देण्याकरितां म्हणून श्री वसीष्ठमुनींनी केलेल्या उपदेशातून निर्माण झाला आहे. या ग्रंथात प्रभूरामचंद्रानी वसीष्ठ मुनींना विचारलेल्या मानवीजीवनाविषयीच्या समस्या प्रभूरामचंद्राच्या दिव्य बुद्धीमत्तेचे प्रतीक आहेत. सत्व गुणांचा प्रभाव नुसता बुद्धी-निदर्शकच नसून तो रज आणि तम या इतर दोन गुणांना संभाळून घेऊन त्रिगुणांच्या साम्यावस्थेकडे नेतो. रजोगुणाचा पूर्णविकास झाल्यामुळें कर्तव्यपरायणता, शौर्य, अतिशय धाडसाची कामें प्रभू रामचंद्रास करितां आली. तमोगुणाचा योग्य विकास होऊन शांत, गंभीर, वृत्तीचे पोषण प्रभू रामचंद्राच्या ठिकाणी पूर्णपणें आपणास दिसून आले. या सर्व गुणांना वाढीस लावून प्रभू रामचंद्रानी मानवाचा विकास करण्याचे कार्य नियतीनें नेमून दिलेल्या उद्दीष्टापर्यंत साधलें. त्रिगुणांची साम्यावस्था मानवाच्या हृदयात निर्माण करून प्रभू भक्ति भावात्मक आहे हा अनुभव मानवास पुरेपूर करून दिला. व म्हणूनच तहत पशुकोटीतून मानवकोटींत पदार्पण करण्याच्या बेतात असलेल्या हजारो वानरांचे सैन्य तयार करून त्यांच्या हातून शौर्याची कृत्ये करून घेऊन शेवटी त्यास केवळ रामनामाने दगडसुद्धां तरून जातात हे सिद्ध करून भक्तीमार्गाला लावले. वानरांच्यातील बुद्धीमंत हनुमंताला बुद्धीविकासा-बरोबरच भावविकास करावयास शिकवून कायमचे रामभक्त केले व पुढील मानवांच्या पिढीसाठी त्याला देवत्व प्राप्त करून दिले.

## ' भाव तोचि देव ' तत्त्वाचा विकास

राम अवतारानंतर श्रीकृष्ण अवतार झाला. श्रीकृष्णानें प्रभु रामचंद्राच्या ' भाव तोची देव ' या तत्वज्ञानाचा विकास करून पूर्वार्धात गोपींना भक्तिमार्ग व उत्तरार्धात अर्जुन व उद्धवास अवशिष्ट राहिलेल्या मानवी उत्क्रांतीसाठी ज्ञानमार्गाचे धडे दिले. श्रीकृष्णांनी मानवाचा विकास थेट ब्रह्मरंध्रापर्यंत करून, बुद्धीयुगास चालना दिली.

हल्ली बुद्धीयुगच चालू आहे. भांडवलशाही कळसास पोचून ठिकठिकाणी साम्य-वाद घुसू पहात आहे. या साम्यवादाचा अर्थमात्र सत्व, रज, तम, या त्रिगुणांची मानवातील साम्यावस्था नसून तो केवळ मानवाच्या अर्थव्यवस्थेपुरताच व्यापक करण्याकडे अलिकडील मानवांचा कल आहे. याचे कारण मानवाची प्रवृत्ती आपल्या सर्व शारीरीक, मानासिक, व बौद्धिक क्रियांना बुद्धीप्रधान समजण्यामुळें हा कल झाला आहे. प्रत्येक प्रान्तात मानवाच्या बुद्धीचेच फक्त कौतुक होत आहे. शरीराची उपेक्षा भांडवलशाहीत होणाऱ्या बुभुक्षतेने होते असे धरले तरी देखील या बुद्धीयुगांत मानवाच्या भावनांची इतकी उपेक्षा व हेळसांड का व्हावी हे कळत नाही. शरीर, मन आणि बुद्धी या मानवातील तिन्ही भागांचा योग्य विकास झाल्यासच खरीखुरी सत्व, रज, तम, याची साम्यावस्था साधारण आहे व त्यांचा सुंदर मिलाफ हृदयाच्या ठिकाणी श्रद्धेत होऊन मानवास ईश्वरी साक्षात्काराचा मार्ग सापडणार आहे. परंतु हें न समजून आजचा बुद्धीयुगातील मानव बुद्धीच्या जोरावर निव्वळ वेडेपणानें ईश्वराच्या अस्तीत्वाच्या कल्पनेचे वामाडे मात्र काढीत आहे व या तऱ्हेने प्रभू रामचंद्रानी व श्रीकृष्णांनीं वाढीस लावलेल्या कार्याच्या उद्दीष्टात अडथळे मात्र निर्माण होत आहेत.

आपण रामनवमीचा उत्सव दरवर्षी साजरा करतो. परंतु रामावताराचे कार्य खऱ्याखुऱ्या अर्थानें आपणास पूर्ण करावयाचे असेल तर आपणास मानवात त्रिगूणात्मक साम्यावस्था निर्माण करण्याकडे पावले टाकावयास नकोत काय ?



# रामकालीन अर्थव्यवस्था

**आपल्या भारताचीच नव्हे तर आज साऱ्या जगाची अर्थव्यवस्था कोलमडून पडली आहे. मोठी कठीण परिस्थिति निर्माण झाली आहे. अशा वेळी रामायणकाळी भारत कोणत्या सुसंपन्न स्थितींत होता व तत्कालीन अर्थव्यवस्था जनतेच्या दृष्टीनें किती सुखावह होती याची कल्पना करून देणारा पुढील लेख, दुःखांत क्षणिक सुखाचा आभास निर्माण केल्याशिवाय रहाणार नाहीं.**

आज रामकालीन अर्थव्यवस्थेवर थोडेंसें बोलणार आहें. आजच्या अर्थप्रधान युगांत, पुष्कळसे अर्थशास्त्रज्ञ इथें उपस्थित असतांना, ज्याचा खिसा रिकामा आहे असा मनुष्य रामकालीन अर्थ " ( Theory ) सांगत आहे. रामायणांत असें कांहीं विशेष आहे कीं ज्यामुळें आजचे जडवादी देश सुद्धां रामायणाचें संशोधन करीत आहेत. ' राम भगवान् होता, आणि त्याची लीला जाणण्याकरितां ते मानवी श्रम आणि मरमसाट पैसा खर्च करीत नाहींत; तर रामायण वैज्ञानिक दृष्टीनें जाणून स्वतःच्या देशांत त्याचे प्रयोग करण्यासाठीं ते लोक हे परिश्रम करीत आहेत. मानवजातीची बुद्धि जेथें कुंठित होते तेथें वाल्मीकींनीं रामायणांत मार्गदर्शन केलें आहे. हेंच रामायणाचें अलौकिकत्व होय. अर्थशास्त्राच्या बाबतींत सुद्धां रामायणानें मार्ग दाखविला आहे.

अर्थशास्त्र ( Economimcs ) ' सायन्स ' Science आहे की " आर्ट्स् Arts ? या बाबतीत मतभेद आहेत. ' आर्टस्, वाले म्हणतात की कित्येक बाबींत तें ' ऑर्टस, आहे; आणि ' सायन्स, वाले म्हणतात कीं—कांहीं बाबतींत तें ' सायन्स, आहे, परंतु तें रसायनविज्ञानासारखें तर नाहींना ? रामायणांत तें शास्त्र होतें.

जे शासन करूं शकतें तें शास्त्र. आज सगळें जग अर्थशास्त्राचा विचार करीत आहे. त्याच्यांत पुष्कळ दोष आहेत.—" प्रथम मागणी आणि नंतर पुरवठा " हा अर्थशास्त्राचा नियम आहे. परंतु आपण मात्र याच्यां उलटच वर्तन करीत असतों. मनुष्य अर्थशास्त्रांत मोठमोठे शब्द वापरतो. परंतु मानवी स्वभावाच्या मूर्खपणामुळें " पहिला पुरवठा आणि नंतर मागणी " निर्माण करून अर्थशास्त्राचे सिद्धांत आपण फोल करून टाकलेले आहेत. आणि या विषयावर अर्थशास्त्र नियंत्रण घालूं शकत नाहीं; कारण त्यावर नियंत्रण घालणें हा स्वतःचा विषय आहे असें अर्थशास्त्र मानीत नाहीं. तर्कशास्त्र सोडून जर अर्थशास्त्र लिहिलें गेलें, तर त्याला शास्त्र म्हणून कोण मान्यता देईल ? अर्थशास्त्र कित्येक ठिकाणीं अशीं भयंकर

विधानें करतें कीं सामान्य माणसाला तें घोटाळ्यांत पाडतें, आणि मग त्याला शास्त्र म्हणावें कीं नाहीं अशी शंका मनांत निर्माण होते. शास्त्र कुठें माणसाला घोटाळ्यांत पाडतें ? "मानवी श्रमाची किंमत बाजारभावावर आधारली जाते व बाजारभाव मानवी श्रमांवर अवलंबून असतात." हें कसलें तर्कशास्त्र ? अर्थशास्त्र कुठें कुंठित होतें तें पहावयास नको का ? कोणी म्हणेल कीं हॅट ( Hat ) वाल्रणारा सांगेल तें बरोबर, तर कोणी म्हणतील कीं ऋषि सांगतील तें बरोबर, परंतु शंकराचार्य म्हणतात कीं प्रत्येक गोष्ट बुद्धीवर घांसून पाहा. परमेश्वरानें माणसाला आपली बुद्धि गहाण टाकण्याकरितां दिलेली नाहीं. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन तत्वांची घोषणा करून, फ्रान्समध्यें १६ व्या लुईला ठार करून लष्करी सत्ता प्रस्थापित झाली. रशियांत झारशाही नष्ट होऊन तिच्याऐवजीं एकमुखी सत्ता आली. अहिंसा आणि प्रेम यांचे संदेश देणारे ख्रिस्ती धर्मांचे अनुयायी जगांत युद्धेच निर्माण करीत आहेत. व्यापाराकरितां प्रवृत्त झालेल्या इंग्लंडला साम्राज्य मिळालें आणि साम्राज्याकरितां प्रवृत्त झालेल्या कैसरला बंदिवास घडला ! परंतु सगळ्यांत आश्चर्याची ही गोष्ट आहे कीं, प्रत्येक समाज "मी विजयी आहें, आणि माझ्यासारखेंच इतरांनीं व्हावयास पाहिजे." असें सर्वांना सांगत आहे.

अर्थशास्त्रांत केवळ भाकरीचाच विचार नव्हे, तर मानवी भावना आणि वासना यांच्या नियमनाचा पण विचार व्हावयास पाहिजे. प्रत्येक क्षणीं बदलणाऱ्या वासनांमुळे सुद्धां अर्थव्यवस्थेवर अत्यंत वाईट परिणाम होत असतो. मार्क्स वगैरे लोकांचें असें म्हणणें आहे कीं उपभोग्य वस्तूपेक्षां लोकसंख्येची वाढ अधिक प्रमाणांत असते. हे तत्त्व कुठपर्यंत खरें आहे हे कोणाला ठाऊक ? पण ही गोष्ट जर कदाचित् आपण खरी मानली तर वासनांची वाढ किती प्रमाणांत होत आहे हे सुद्धा नक्की करावयास पाहिजे. उपभोगाची साधनें गणित श्रेणीनें आणि लोकसंख्या भूमिति श्रेणीनें वाढत असते. मग मानवी वासना कोणत्या श्रेणीनीं वाढत असतील ? गेल्या शंभर वर्षांत वासनांची वाढ युरोप अमेरिकेंत जितक्या प्रमाणांत झालेली आहे तितक्या प्रमाणांत हिंदुस्थानांत लोकसंख्या सुद्धां वाढली आहे काय ? स्पर्धेवर नियंत्रण घातलें गेलें आणि उपभोगाच्या वासना भरमसाट वाढल्या तर काय करायचें ? या गोष्टींचा विचार अर्थशास्त्रात व्हावयास पाहिजे. आणि हा विचार जर अर्थशास्त्रांत नसेल आणि मानवी मनाचें नियमन करण्याची शक्ति त्याच्यांत नसेल तर तें शास्त्र अपुरें आहे असें म्हणावें लागेल.

आज माणसाला लहानपणापासूनच पैशाचें महत्त्व व आवश्यकता शिकविली जाते. आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत पैशालाच महत्त्व प्राप्त झालें. द्रव्य असेल तरच सुख आणि सुरक्षितपणा—असें मानलें जात आहे. आज समाजांत मानमान्यतासुद्धां 'बँकेच्या क्रेडीटवर मिळत आहे. लहानपणापासूनच धंद्याविषयीं विचारण्यांत येत असतें. सर्व लोक धंदे करण्याकरितांच जन्मलेले नाहींत ना ! संपत्ति, सत्ता, मान, सुख या सर्व गोष्टी पैशावरच अवलंबून आहेत. गरीब मनुष्य पोटासाठी वणवण करीत

हिंडत असतो, त्याला उद्यांची काळजी असते. आणि लक्षाधीश, कोट्याधीश होण्यासाठीं धांवपळ करीत असतो, तसेंच कोट्याधीश सात पिढ्यांचें धन एकत्र करण्याकरितां धांवत असतो; अशा तऱ्हेनें सर्वांचीच धांवपळ सुरू असते ! कोणालाही उभें राहायला सवडच नाही, आणि कुठें उभे राहायचें हेंही त्याला माहीत नाहीं. जास्तींत जास्त एक वर्षासाठीं, दोन किंवा दहा वर्षांकरितां संग्रह करा. परंतु गरीबापासून कोट्याधीशापर्यंत सर्वांची धांवपळच सुरू आहे. जणूं त्यांच्यांत शर्यतच लागली आहे. शेवटीं छाती फुटून मरत असतो ! अर्थशास्त्राच्या अस्थिरपणामुळें व्यक्तीचाच नव्हे तर खुद्द समाजाचाच नाश होत चालला आहे. लक्षाधीशसुद्धां मिळविण्याचाच प्रयत्न करणार, कारण कीं त्यालासुद्धां विश्वास वाटत नाहीं. त्याला सांगावेंसें वाटतें की, ' अरेबाबा, पैशाचा सदुपयोग कर. " तो विचारील कीं पैसा खलास झाला तर माझ्या मुलांबाळांचें कसें होणार ? " अशा तऱ्हेनें आत्मविश्वासच जात चालला आहे. प्रोफेसर जे. एम्. क्लिन्स यांसारखे अर्थशास्त्रज्ञसुद्धां आत्मविश्वासासारख्या गुणांची या शास्त्रांत गरज आहे, असें प्रतिपादन करूं लागले आहेत. आत्मविश्वास हा एक अत्यंत महत्वाचा गुण आहे व तो निर्माण करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न आपल्याला करावयास पाहिजे. आजच्या अर्थव्यवस्थेंत अशा तऱ्हेचा आत्मविश्वास कोणालाही वाटत नाहीं म्हणूनच सर्वांची धांवपळ सुरू आहे.

रशियन तत्त्वज्ञानांत ( साम्यवादांत ) आत्मविश्वासाला योग्य असें कांहीं उत्पादनाचें साधन आहे काय ? किंवा त्याला कांही सामाजिक भूमिका आहे काय ? बुखरिन, लेनिन वगैरे लेखकांनीं—विचारवंतांनीं याचें उत्तर दिलेलें नाहीं. इंग्रजी मानसशास्त्रांत सुद्धां आत्मविश्वास निर्माण करण्याचा उपाय नाहीं. जगाची रचना यांत्रिक स्वरूपाची आहे असें प्रतिपादन करणाऱ्या लोकांच्या तत्वज्ञानांत त्याचें रासायनिक समीकरण किंवा इलेक्ट्रो मॅग्नेटिक इक्वेशन नाहीं ! जीवरसायन शास्त्रज्ञांनीं आत्मविश्वास उत्पन्न करण्याचें एखादें रसायन शोधून काढावें, अशी माझी नम्र प्रार्थना आहे ! किंवा कोणता गंड निर्माण झाल्यावर आत्मविश्वास येईल, ही गोष्ट वॅटन आदि लोकांनीं सांगितली तर जगावर केवढे मोठे उपकार होतील ! रामकालीन भोळ्या लोकांना मात्र असेंच वाटत होतें कीं—व्यक्तीचें नियतकर्म-निश्चित धंदा असेल तर आत्मविश्वास निर्माण होणारच, म्हणूनच अर्थव्यवस्थेंत अत्यंत आवश्यक अशी जातिव्यवस्था रामराज्यानें मान्य केली. जातिव्यवस्थेंत व्यक्तीचा धंदा निश्चित असतो-मागणीनंतरच पुरवठा असतो—त्यामुळें अयोग्य स्पर्धेचें कारणच नाहीं. त्यामुळें प्रत्येक व्यक्तीला आपल्या योगक्षेमासंबंधीं आत्मविश्वास वाटत असे.

रामराज्याची संस्था विधायक-रचनात्मक होती. विधातक नव्हती. एखादें विशिष्ट ध्येय किंवा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून लोक काम करीत असत. या अर्थशास्त्रांत रामचंद्रांनीं धर्मसत्ता गोंवली. परंतु केवळ ऐश्वरी तत्त्वाच्या धाकामुळें आत्मविश्वास निर्माण होत नाहीं. आत्मविश्वास टिकविण्याकरितां जातिव्यवस्था होती. आज लोकांना

धर्माचें नांवच अफूसारखें वाटत आहे; परंतु अफूनें थोडीशी मानसिक शांति तरी मिळते ना! आजचे अर्थशास्त्रज्ञ म्हणतात कीं, " There is no relation between Economics and Ethjsr. "

रामराज्यांत याच्या अगदीं नेमकें उलटें (म्हणजे तत्वत: खरें) तत्व मान्य झालेलें होतें. परंतु आजचे अर्थशास्त्रज्ञ मानवाचे मूळ प्रश्न लक्षांतच घेत नाहींत. परंतु व्यापार खुला असावा कीं नियंत्रित ' आर्थिक व्यवहारांत नियोजन असावें कीं नियुक्त अर्थव्यवस्था असावी ! एवढाच स्वत:चा विषय समजतात. मानवाच्या मूल भूत विचारांची गंभीर चर्चा आणि गहन सिद्धांत ज्या शास्त्रांत नसतील हें शास्त्र शास्त्रच राहूं शकत नाहीं, केवळ तें लिखाण कादंबरीसारखें वाटतें.

अर्थशास्त्रांत धार्मिक, नैतिक सत्ता आणि जातिव्यवस्था असावयास पाहिजे. जातिव्यवस्था आत्मविश्वास उत्पन्न करते. आज तर ' मी भविष्यकाळांत कोण होणार, याची कल्पनाच कोणाला करतां येत नाहीं. कोणता धंदा करावा ही गोष्ट त्याच्या हातांतच राहिलेली नाहीं. नोकरी मिळाली तर जाईन रेशनिंग ऑफिसमध्यें; नाहीं तर जाईन हायस्कूल किंवा कॉलजमध्यें अध्यापक म्हणून ! सांगायचें तात्पर्य हें कीं–मला कोण व्हायचें आहे आणि काय करणार, याची नक्की कल्पना कोणालाच नसते. आणि अशा तऱ्हेची कल्पना ठेवून पण चालत नाहीं. अशा प्रकारची अव्यवस्थित सामाजिक व्यवस्था वर्तमान काळांत चालू आहे.

रामकालांत धंदा जन्माबरोबरच नक्की होत असे. मजुरी मिळविण्याकरितां नसून सेवा-परोपकार करण्यासाठीं आहे असे मानलें जात असे. उमेदवारीसाठीं शिक्षण घरच्या घरींच मिळत असे. मागणी आल्यानंतरच पुरवठा होत असे आणि हें सर्व जाति-व्यवस्था असेल तरच शक्य आहे. त्या काळांत ' अर्थाला जीवनांतला फक्त चौथा भाग म्हणून महत्त्व होतें; आज जीवन अगदीं शंभर टक्के पैशाकरितांच व्यतीत केलें जात आहे ! अहो ! तरी सुद्धां तें पुरें पडत नाहीं. पूर्वी निश्चितपणा होता; आज अनिश्चितपणा आहे. कारण कीं पैसा हा जीवनाचे सामान्य व्यवहार निश्चित करण्याचें केवळ साधन असें त्या काळीं मानण्यांत येत असे.

स्पर्धेवर योग्य नियंत्रण असावयास पाहिजे. स्त्रीसाठीं स्पर्धा, पैशासाठीं आणि प्रतिष्ठेसाठीं स्पर्धा होत असते. आज तर स्पर्धा हें अर्थशास्त्राचें मुख्य सूत्र झालें आहे. आज मात्र पैशासाठींच स्पर्धा दृष्टोत्पत्तीला येत आहे.

आदर्श अर्थव्यवस्था खालीं लिहिलेल्या चार गोष्टींवरून अजमावावयास पाहिजे:-

१) प्रत्येक व्यक्तीला धंदा मिळावयास पाहिजे.

२) धंदा लायकीप्रमाणें असावयास पाहिजे.

३) धंद्याकरितां फुकट शिक्षण मिळालें पाहिजे; आणि

४) जेवढी जरूरी असेल तेवढेंच उत्पादन व्हावयास पाहिजे.

या चार गोष्टी रामराज्यांत मूर्तिमंत होत्या, आणि त्यामुळेंच लोकांच्या जीवनांत निश्चितपणा होता.

अर्थशास्त्रज्ञाच्या पुढें तीन राक्षसी प्रश्न उभे आहेत.

१) गरज पुरी करण्यासाठीं उत्पादन.

२) उत्पादनोपयोगी मजुरीचा पुरवठा

३) उत्पन्न झालेल्या मालाची विभागणी व विनियोग

हे तीन प्रश्न सोडविण्यासाठीं अर्थशास्त्रज्ञ खूप मेहनत करीत आहेत.

आपणांला ही गोष्ट आढळून येईल कीं, रामायणानें या बाबतींत केवढी बुद्धि चाल. विलेली होती. या अडचणी रामायणांत नव्हत्याच, कारण त्यावेळीं जातिव्यवस्था होती. जातिव्यवस्थेंत गरज उत्पन्न झाल्यावरच उत्पादन होत असे. "मागणीनंतरच पुरवठा" जातिव्यवस्थेशिवाय शक्यच नाहीं. कारण त्यांत बेकाम माणसालासुद्धां उलटसुलट करावयाला जागाच शिल्लक रहात नाहीं. आणि अन्य तऱ्हेनें अव्यवस्था होण्याचा संभवच नसतो.

"Every one has aright to work" हे आजचे उद्गार आहेत. मजुराला काम कसें द्यावें आणि कामाची मजुरी कशी द्यावी; ही आजच्या अर्थशास्त्रांतील एक मोठी समस्या आहे. रामकाळांत तर ज्या घरांत जन्म त्या घरांतीलच पिढीजाद काम करावयाचें असल्यामुळें त्या समाजांत मजुरीच्या अयोग्य स्पर्धेचा प्रश्न येतच नसे. भविष्यकाळीं आपल्याला तिकडेच जावयाचें आहे. आज किंवा उद्यां जगाला ही गोष्ट मानावीच लागणार आहे. नाहींतर आत्मविश्वास केव्हांही निर्माण करणें शक्य होणार नाहीं, आणि प्रश्न गुंतागुंतीचेच होत जाणार. शास्त्री महाराज लहान तोंडी मोठा घांस घेत नाहींत. तर आज आपण पाहातोंच आहों कीं Problems चा उलगडाच होत नाहीं, आणि दररोज नवीन नवीन प्रश्न उभे राहत आहेत.

त्या काळीं स्पर्धा नव्हतीच. वृत्तिसंकर हा एक गुन्हा समजला जात असे व त्याकरितां देहांताची शिक्षाही देण्यांत येत असे. भारतांत वृत्तिसंकराच्यापूर्वी बेकारी नव्हतीच. वृत्तिसंकरांमुळेंच बेकारी वाढते जर वृत्तिसांकर्य नसेल, तर धंदा नक्की आणि दुसऱ्याशीं स्पर्धेचा प्रश्नच उद्भवत नाहीं. अशा तऱ्हेची स्थिति प्राप्त झाल्यावर नैसर्गिक सत्य, प्रीति, इत्यादि गुण आपोआप येणारच. अशा तऱ्हेची विशुद्ध अर्थव्यवस्था असल्यामुळें त्या काळच्या लोकांत सद्गुण होतेच. जातिव्यवस्थेला इतकें प्राधान्य होतें. लोक अर्थशास्त्राचा अभ्यास करीत असत. ऋषिलोक समाजाची सेवा करण्यासाठीं बद्धपरिकर होऊन अर्थशास्त्राचा अभ्यास करीत असत.

उत्पादित वस्तूंची योग्य विभागणी आणि विनियोग–

आपला माल समाजाला द्या आणि समाज आपल्या सर्व गरज

कोणाचा नोकर नाहीं, आणि कोणी कोणाचा मालक नाहीं. नोकरांचें प्रमाण अगदींच कमी होतें. एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून होती. मोफत खाणाऱ्यांसाठीं १ वें शतक ठेवलेलें आहे! आज फुकटचें वेण्यासाठीं लक्षाधीश सुद्धां धावपळ करीत असतो. आज तर कोणाचीही वृत्ति कोणाला कांहीं सुद्धां देण्याची नाहीं, त्या काळांत ही वृत्ति नव्हतीच. 'मी ज्याच्याजवळून घेईन त्याला कांहीं तरी देईन, आणि दिल्या-शिवाय घेणार नाहीं—हे तत्त्व प्रत्येकाच्या रोमरोमांत भिनलेलें होतें. अर्थशास्त्राच्या या तिन्ही प्रश्नांचीं उत्तरें भारतीयांनीं शोधून काढलीं होतीं, आणि तीं जीवनांत प्रत्यक्ष उतरवली होती. अशा तऱ्हेची अर्थव्यवस्था ज्या ठिकाणीं असेल ती प्रजा निःसंशय सुखीच असणार.

अर्थशास्त्रांत दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैशाचा विनियोग. पैशाचा विनियोग करण्याचे बाबतींत त्या काळीं संपूर्ण विचार करण्यांत आला होता. 'विनियोग केलाच पाहिजे' अशा तऱ्हेचें नैतिक बंधन त्या काळीं होतें. 'प्राप्तीचा विशिष्ट भाग समाजाला दिलाच पाहिजे' अशा प्रकारचे सामाजिक कायदे होते. विशिष्ट प्रमाणापेक्षां जास्त संग्रह करूं नये, अशा तऱ्हेची भावना होती. थोडक्यांत म्हणजे आपल्याजवळ आलेलें धन किती ठेवायचें, किती वापरायचें, त्याचप्रमाणें कुठें वापरायचें आणि कसें वापरायचें, तें नक्की करण्यांत आलेलें होतें. याचेंच नांव विनियोगशास्त्र. म्हणूनच जुन्या लोकांनीं इष्टापूर्त कर्मांचें महत्त्व वाढविलें होतें. अमुक इतकें धन मिळाल्यावर अमुक यज्ञ केलाच पाहिजे, अशा तऱ्हेची कल्पना त्या काळच्या समाजाच्या मनांत ठसलेली होती. थोडक्यांत, दान, धर्म, पुण्य इत्यादि गोष्टींत तत्कालीन अर्थशास्त्रांत विशिष्ट महत्त्व होतें. आजचें अर्थशास्त्र विनियोगावर कांहींच लिहीत नाहीं, त्यामुळें या गोष्टीचें महत्त्व आधुनिक अर्थशास्त्र समजूंच शकत नाहीं. आजच्या अर्थशास्त्रज्ञांनीं विनियोगावर भविष्यकाळांत एखादा ग्रंथ जरूर लिहावा, अशी त्यांना माझी नम्र प्रार्थना आहे. आज जो पैसा मिळाला तो माझा, तो मी वाटेल तसा खर्च करीन किंवा न करीन, या बाबतींत मोकळीक आहे. त्यामुळेंच अर्थसंग्रह होत चालला आहे, आणि लोक हैराण होत आहेत. परंतु रामायण काळांत मिळालेला पैसा ईश्वराचा असल्यामुळें तो कोणत्या प्रकारें खर्च करावा याकरितां शास्त्र होतें, किती शिल्लक ठेवावा यावर शास्त्राचा अंकुश होता. त्यामुळेंच अर्थव्यवस्था अतिशय सुंदर होती. आजचे लोक ज्यावेळीं विनियोगशास्त्रावर लिहूं लागतील, त्यावेळीं त्यांना समजून येईल, कीं विनियोगांत मानवी मनाचा पण विचार करावयाचा असतो. त्या काळीं माणसाला जो पैसा मिळत असे त्याचा विनियोग कुठें करावा हें मानवी मनाचा पूर्ण विचार करून सांगण्यांत आलें होतें. विनियोगांत मानवी मनाच्या भावनांचा पूर्ण विचार व्हायलाच हवा. एकाला विचारलें कीं "तूं ५॥ वाजतां घरीं येतोस; मग पांच वाजतां दोन आण्यांचा चहा कां पितोस!?" तो म्हणतो, "हॉटेलांत जायचें कारण, खुर्चीत बसून 'बॉयला' हुकूम करावयास मिळतो हें आहे. आणि घरीं आल्यावर आई किंवा पत्नी यांना विनंती

करावी लागते.” अधिकार गाजविण्याच्या वृत्तीचासुद्धां विनियोगशास्त्रांत अभ्यास व्हावयास पाहिजे.

पैशाचा विनियोग कसा करावा ? आजचें अर्थशास्त्र सांगतें कीं—“ तुमच्या पैशाचे तुम्ही मालक आहांत, ” रामराज्य सांगतें कीं “ तुम्ही तुमच्या पैशाचे विश्वस्त आहांत. तुमचा पैसा वाटेल त्या ठिकाणीं तुम्हांला खर्च करतां येणार नाहीं. एका ब्राह्मणाच्या मुलानें मोटारीच्या धंद्यांत खूप पैसा मिळविला, नंतर त्यानें दहा दहा रुपयांच्या नोटांचा हार वेश्येला घातला होता ! त्यांच्या दृष्टीनें हा विनियोगच होता. त्याच्याऐवजीं चांगल्या कामीं हा पैसा खर्च केला असता तर ! रामकालीन समाजांत तर त्याला तसें करायला भागच पाडलें जात असे. पैशाचा वाटेल तसा विनियोग करायला तुम्हीं स्वतंत्र नाहींत. पैसा चांगल्या ठिकाणींच खर्चायला पाहिजे. कंजूष म्हणेल कीं, मला पैसा खर्च करावयाचा नाहीं.’ ( अर्थमनर्थं भावय नित्यम् ) परंतु नाहीं, असें सुद्धां चालणार नाहीं. कंजूष माणसाला रामकाळांत स्थानच नव्हतें.

आज कुटुंबाच्या नांवानें पैसा गोळा करण्यांत येतो. परंतु ही सुद्धां संग्रहवृत्तीच होय. जास्तींत जास्त दहा वर्षेंपर्यन्त योगक्षेम चालेल एवढे शिल्लक राहिलेल्या पैशानें यज्ञ करावयास पाहिजे; अशा तऱ्हेची रामकाळांत कल्पना होती. तुम्ही खा, प्या आणि वापरा. वर्ग–विग्रह, अर्थसंग्रह आणि आर्थिक विग्रह यामुळेंच आज देशदेशांतरांत जीं भांडणं चालू आहेत त्यांचें नांव सुद्धां रामकाळांत नव्हतें. कारण, विश्वस्त ही भावना आणि जातिव्यवस्था.

आजचे “इझम”वाले म्हणतात कीं, “ ट्रस्टीशिपमध्यें त्यांची मालकी तर मान्य करतोंच कीं नाहीं ? आम्हीं तर त्यांचा मालकी हक्कच नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहोंत ” असें म्हणणारे अतिशय परागतिक आहेत. कारण कीं हे लोक फक्त आज-पासूनच मालकी हक्क नष्ट करूं पहात आहेत. अर्थात् आजपर्यंतचा मालकी हक्क मान्य झालाच आणि आतां तो नष्ट करूं पहात आहेत. सभ्य समाजांत याला चोरीच म्हटलें पाहिजे. पैसा-लक्ष्मी ईश्वराची आहे, म्हणून पैशावर कोणाही व्यक्तीचा मालकी हक्क संभवतच नाहीं. वस्तू एक असून फक्त व्यवहारांत फरक.

उदा०—प्रत्येकाला मग तो राजा असो किंवा मजूर असो, त्याला भविष्य जाणण्याची इच्छा असते. एका राजानें आपली जन्मपत्रिका एका ज्योतिष्याला दाखविली. ज्योतिषी म्हणाला, कीं ‘ तूं अनेक आप्तांचा मृत्यु पाहाणार आहेस. ’ राजा संतापला व त्यानें ज्योतिष्याला हांकलून दिलें. राजानें दुसऱ्याला बोलावलें. दुसऱ्यानें सांगितलें, ‘ तुझें आयुष्य दीडशें वर्षें आहे. ’ तें ऐकून राजा खूष झाला आणि त्यानें ज्योतिष्याला सुद्धां खूष केलें. दोघांनीं एकच गोष्ट सांगितली. ‘ पुष्कळांचा मृत्यु पाहाशील, ’ आणि पुष्कळ वर्षें जगशील ’ या दोन गोष्टी आहेत कीं वेगळ्या ? राजाच्या लक्षात आलें नाहीं. तसेंच या ठिकाणीं झालें आहे. आजचे लोक मालकी हक्क नष्ट करूं पाहात आहेत-आणि

रामराज्यांत मालकी हक्क नव्हताच. द्रव्य ईश्वराचे आहे, हीच एकमेव कल्पना समाजांत पसरलेली होती. परंतु आजपर्यंत मालकी हक्काची कल्पना होती आणि आतां मालकी हक्क नष्ट करूं पहात आहांत, तेव्हां तुम्ही चोर आहांत. आम्ही कायद्यानें नष्ट करूं! कायद्यानें नष्ट केलीत तरी सुद्धां तुम्ही चोरच ठरणार. तुम्ही मालकी हक्क होता असें मानतां, परंतु रामायण तर मूलभूत मालकी हक्कच मानीत नाहीं. लक्ष्मी ही मातुःश्री आहे. तिचा कोणीही मालक नाहीं. जर तिचा कोणी मालक असेल तर तो भगवानच होय. आपण तर तिचे केवळ दास आहोंत. या भावनेमुळेंच रघुराजानें कौत्साला १४ कोटी रुपयांचें सोनें बोलबोलतां देऊन टाकलें. प्रत्येक व्यक्ति चांगल्या ठिकाणींच पैसा खर्च करीत असे. "पैसा हेंच जीवनाचें सर्वस्व" हें सूत्र रामकालांत नव्हतें.

अर्थशास्त्रांतली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीवनार्थ कलह असावयास पाहिजे, आणि कोणीही उपाशीं मरतां कामा नये. जीवनार्थ कलह असेल तरच उत्कृष्टाची निर्मिति होईल आणि कलांचा विकास होईल. जीवनार्थ कलह नसेल तर कोणीही स्वतःचें डोकें चालवणारच नाहीं. कोणीही उपाशीं मरूं नये याचें नांव अर्थशास्त्र. रामराज्यांत कोणी लोभी, दुर्बळ किंवा बेकार नव्हताच. प्रत्येकाला मला स्वतःला 'भाकरी आणि घर' मिळणारच अशा प्रकारचा आत्मविश्वास होता. राजसत्ता त्याकाळीं उत्पन्नाचा ६ वा भाग–रुपयांतले सुमारें अडीच आणे कर म्हणून घेत असे आणि त्यांतला पाऊण हिस्सा योग्य ठिकाणीं प्रजेच्या हितासाठीं खर्च करीत असे. फक्त चौथा हिस्साच राजसत्ता स्वतःसाठीं खर्च करीत असे. प्रत्येक गोष्टींत लोक राजसत्तेकडे धांव घेत नसत. प्रत्येक ठिकाणीं राजसत्तेला लक्ष घालावें लागत नसे. आज तर प्रत्येक गोष्टींत राजसत्तेकडे धांव घ्यावी लागते. उदा०–देवळांसंबंधींच्या भांडणांत, भावांभावांच्या भांडणांत, बाप-मुलींच्या भांडणांत, पतिपत्नींच्या भांडणांत, अशा तऱ्हेच्या प्रत्येक भांडणांत राजसत्तेकडे धांव घ्यावी लागते. याचा परिणाम कर वाढींत झाला. राजसत्ता आपल्याकरितां जें काम करते त्याकरितां लागणारा पैसा ती आपल्याजवळूनच नाही का वसूल करणार? म्हणून राजसत्तेचेंच काम जिथें कमी, तिथें कर पण कमीच. रामराज्यांत करवसुलीसाठीं आजच्यासारखीं खातीं नव्हतीं. कारण कीं लोकांत इतकी राजनिष्ठा होती कीं, ते स्वतःच आपला कराचा भाग जरासुद्धां लबाडी न करता राजाच्या खजिन्यांत जमा करण्यासाठीं आणून देत असत. इतकी नैतिक उच्चता त्या लोकांत होती. म्हणूनच अर्थशास्त्रांत नीतिशास्त्राचासुद्धां विचार व्हावयास पाहिजे.

रामायणांत ४८ प्रकारचे उद्योगधंदे होते. आज कदाचित् त्यांच्यांत वाढ झाली असेल, कारण कीं आज मुलगी द्यायची हासुद्धां एक धंदा झालेला आहे आणि मुलगी करायची हासुद्धां एक धंदा झालेला आहे. व्यापाऱ्यांनीं वाईट मार्गांनीं पैसा मिळवूं नये, म्हणून त्यांच्यावर रामकालीन समाजाचें नियंत्रण होतें. वाईट मार्गानें पैसा मिळवणाराला समाज महारोग्यासारखा ठेवीत असे. अर्थात् लोक त्याला शिवतही

नसते. परंतु आज तर वाटेल त्या मार्गानें पैसा मिळविणाराला खात्रीच आहे कीं-पैसा आला रे आला कीं मोठेपणा येणारच. कारण कीं आज तर योगवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध सर्व धनवृद्धांच्या द्वारीं बंदीजनांप्रमाणें खुशामत करण्यांतच स्वतःच्या जीवनाची सार्थकता मानीत आहेत !

( ज्ञानवृद्धास्तपोवृद्धा योगवृद्धास्तथापरे। ते सर्वे धनवृद्धानां द्वारि तिष्ठंति किंकराः ॥ )

आज या लोकांना काळजीच नाहीं कीं माझ्या मुलीला कोणी करणार नाहीं. परंतु रामकाळांत वाईट मार्गानें पैसा मिळविणाऱ्या माणसाची मुलगी कोणीही करीत नसे. अशा तऱ्हेचा एक सामाजिक " कंट्रोल " त्या काळांत होता. ( He was totally outcasted and his daughter would not be accepted by any body not even by an inferior labourer ) अशा तऱ्हेची स्थिति होती. म्हणून त्या काळांत पत्नीच हातीं पायीं पडून विनवीत असे कीं " आपलीं मुलें बाळें समाजांत रहावीं याकरितां चांगल्या मार्गानेंच पैसा मिळवा. मला दागिने नसले तरी चालतील. " परंतु आज पत्नीच सांगेल कीं, " वाटेल त्या मार्गानें पैसा मिळवा पण मला हिऱ्यांचीं कुडीं घ्या. ! " नीतिमत्तेला आदर्श मानणारा एक समाज आणि नटीला देवी मानणारा दुसरा समाज यांत फेर असणारच कीं नाहीं ? अशा तऱ्हेनें रामकालीन अर्थशास्त्रावर नीतित्तेचें नियंत्रण होतें.

रामकालांत नाणीं सोन्याचीं होतीं. आणि सोन्याचींच असावयास पाहिजेत असा नियम होता. आधुनिक अर्थशास्त्रांत उत्कृष्ट बुद्धीचा शोध पेपर करन्सीचा शोध. खरोखर ! ' पेपर करन्सीचा ' शोध ही गोष्ट मानवाच्या बुद्धिमत्तेला गौरवास्पद गोष्ट होय. परंतु ' पेपर करन्सीवर संपूर्ण ताबा राजसत्तेचा असल्यामुळें द्रव्याशिवाय वेल्थ निर्माण करतां येते. आणि शेवटीं ' इन्फ्लेशन–' डीफ्लेशन, या गोष्टी निर्माण झाल्या. परंतु ईश्वरानें निर्माण केलेला " वेल्थ " तिला किंमत प्राप्त झालेली असल्यामुळें तिची " फेस व्हॅल्यु " वाटेल त्यावेळीं मिळूं शकत असे. म्हणूनच रामायणांत " करन्सी " कागदाची ठेवली नसावी ! त्यामुळें " इन्फ्लेशन " होत नसे व त्याचे परिणाम समाजाला भोगायला लागत नसत ! रामकाळांत सोनें पुष्कळ आणि लोकसंख्या कमी, यामुळें सोन्याचीं नाणीं होतीं, असें नव्हतें, तर त्या काळचे लोक अतिशय बुद्धिमान् होते. म्हणूनच पूर्ण विचारांतीं सोन्याचीं नाणीं ठेवलेलीं होतीं.

रामकालीन लोक साधु नव्हते, तर स्वपराक्रमानें द्रव्य मिळवीत असत, आणि कांहीं ठराविक मर्यादेपर्यंत द्रव्यसंग्रहसुद्धा करीत असत, व त्याची वाढही करीत असत. नंतरची सर्व प्राप्ति सामाजहिताच्या कामीं–इष्टपूर्तादी कामीं खर्च केली जात असे. ( अलब्धं चैव लिप्सेत लब्धं रक्षेदवक्षयात्। रक्षितं वर्धयेत् सम्यक् वृद्धं तीर्थेषु निक्षिपेत् ॥ ) लोक म्हणतील कीं, तीर्थ म्हणजे गंगा. परंतु तीर्थ म्हणजे पावित्र्यानें युक्त असें स्थान. त्या काळचे लोक विचारवंत होते. त्यांना हे माहीत होतें कीं, जें कांहीं सत्कार्याकरितां

दिलें जाईल किंवा ज्याचा उपभोग घेऊं तेवढेंच द्रव्य आपलें स्वतःचें, परंतु आज तर "आयत्या बिळांत नागोबा!" स्वतः रक्ताचें पाणी करून मिळविलेले द्रव्य मुलगा उडवीत असेल, तर वडील स्विट्झर्लंडमध्यें तबेल्यांत ( दुसऱ्या जन्मांत ) घोडा होऊन उभे असतील! अरे! मुलगा त्यांचें श्राद्ध सुद्धां नाहीं करीत. दुसऱ्याकरितां धन मिळवून ठेवून देणारा अव्यवहारी होय.

थोडक्यांत म्हणजे अर्थशास्त्राला शास्त्र म्हणण्याकारितां ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्या सर्व रामकालांत होत्या. वैयक्तिक जीवनांत आत्मविश्वास, धंद्याचा निश्चितपणा, स्पर्धेचें नियंत्रण, वासनांवर अंकुश, आणि विनियोग कसा करावा यासंबंधीं विचार—या सर्व गोष्टींमुळें रामकालीन अर्थशास्त्र हें एक दिव्य आणि सफल शास्त्र होतें.




## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी—किंमत टपाल खर्चासह ( स्टँप-तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

# विचार लहरी

शिकागो येथील सर्व धर्म परिषदेंत स्वामी विवेकानंदांनी आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें अमोघ वाणीनें आणि आंतरिक शालीनतेनें एक नवं तेज, नवविचार, नवचैतन्य निर्माण केलें. त्यांनीं सांगितलें.

" Thegi²t of iudia is the gift of religiou and philosophy and wisdom ond spirituality. " " धर्म आणि तत्त्वज्ञान, शहाणपण आणि अध्यात्म ही भारताची महान् देणगी आहे. " धर्म शस्त्रबळावर वाटचाल करीत नाहीं, शहाणपण आणि तत्त्वज्ञान मानवी रक्त सांडित पुढें जात नाहींत, हिंसेनें मार्ग आक्रमत नाहींतर प्रेम आणि शांतता यांच्या पंखावर आरूढ होऊन संचार करतात. आणि नेहमी असेच घडलें आहे. मूकता आणि शांतता हें भारतीय तत्त्वज्ञानाचें वैशिष्ठ्य आहे; हे जनमानसावर शस्त्रसंभारानें आपला प्रभाव कधीच पाडीत नाहीं. मूक प्रभाव हा भारतीय तत्त्वज्ञानाचा आंतरिक गुण आहे. दवं जसे नकळत व न दिसतां खालील भू प्रदेशावर ठिबकते व तो भू प्रदेश पुष्पमय करते, तसाच संचार भारतीय तत्त्वज्ञानानें जगभर केला आहे. मूकतेनें आणि अदृश्य रितीनें भारतीय तत्त्वज्ञान प्रवेशतें पण आपलें क्रांतिकार्य पूर्ण करतें, त्याचा प्रभाव सर्वगामी असतो, पण ते कधी आलें आणि कशा रितीने आले हें कोणालाच ठाउक नसतें. " केवढा अर्थमय आशय आहे हा !

× × ×

पैगंबर साहेब म्हणतात, " प्रार्थना, उपवास आणि भुकेलेल्यांना अन्नदान यापेक्षां अधिक चांगलें काय हें सांगू का ? मानवा मानवामधील आंतरीक मतभेद आणि आंतरीक कलह नष्ट करणें हें अधिक मोलाचें आहे. मतभेदाला फुंकर घातलीत की सर्वनाश ओढवलाच. "

× × ×

डॉ. झकीर हुसेन म्हणतात. " आपल्या काल खंडांत महात्मा गांधी आपले सत्याचे प्रयोग अहिंसेवर आधारित केलें. "

× × ×

व्हिक्टर ह्यूगो म्हणतो, आत्मा अंधारांत ठेवलात की हातून पातकें घडलीच समजा. पातक करणारा दोषी नव्हे, खरा दोषी अंधकार निर्माण करणारा. "

× × ×

श्री. मेहेरबाबा यांचा २५ फेब्रुवारी रोजीं ७४ वा वाढदिवस भक्तगणांनीं मोठा भक्तिभावानें साजरा केला. परळगांव येथें दिनांक २० फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारीपर्यंत अखंड नामजप व संकीर्तन सुरू होते. "ज्ञान, प्रेम व आत्मसमर्पण यांतच मानवाचें कल्याण आहे." हा श्री. मेहेरबाबा यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

× × ×

लोकमान्य टिळकांच्या कालखंडात डॉ. ॲनी बेझट याचें नांव भारतांत सर्वतोमुखी होते. होमरूल लीगच्या संस्थापक म्हणून त्यांनीं राजकारणांत प्रवेश केला; पण जग त्यांना ओळखते थिऑसफीच्या आद्यप्रवर्तक म्हणून. भारतांत थिऑसफीचा विचार प्रसृत करीत असतांना डॉ. बेझटबाईंना श्री. जे. कृष्णमूर्ती या नांवाचा एक चुणचुणीत तरुण आढळला. त्यांनीं या तरुणाला थिऑसफीचा प्रेषित या अत्युच्चपदी नियुक्त करण्याचें ठरविलें; या पदाला पोषक अशी एक प्रभावळ— order तयार केली. पण श्री. जे. कृष्णमूर्ती यांनीं या पदावर आरुढ होण्याचें नाकारलें. आज ते एक थोर भारतीय तत्त्वचिंतक म्हणून ओळखले जातात.

श्री. जे. कृष्णमूर्ती यांना ग्रंथ प्रामाण्य मान्य नाहीं. त्यांचा भर आहे वैयक्तिक अंतःप्रेरणेवर. बुद्धीच्या कसोटीवर प्रश्नाचें स्वरूप पारखून घ्या असा त्यांचा आग्रह आहे. त्यांच्या व्याख्यानाला असंख्य लोक उपस्थित असतात.

× × ×

माझ्या व्यक्तिगत विचारसरणीनुसार brooding काळजी करत रहाणें आणि thinking मूलभुत विचार करणें यांत महद् अंतर आहे. पहिलें मनःस्वास्थ्याला अपायकारक आहे तर दुसरें जीवनाला अत्यंत पोषक आहे. डार्विनच्या सिद्धांताप्रमाणें उत्क्रांति माकडापासून मानवापर्यंत—from ape to man झाली आहे. श्री अरविंदाच्या सिद्धांताप्रमाणें मानवापासून अतिमानवाकडे— from man to superman जावयाचे आहे. अतिमानव निर्मितीसाठीं विचार प्रगत व्हावयास पाहिजे. मन उन्मनाकडे—from mind to supermind गेले पाहिजे. म्हणून विचार करणें अत्यावश्यक आहे. आजच्या जागतिक य वैयक्तिक दुर्घटणेला अविचार कारणीभूत आहे. आाण संतांचें आगमन होतें सुविचार प्रसृत करण्यासाठी, जनमानस उन्नत करण्यासाठी.

Lead us from darkness to light oh sai !

—द. मो. चित्रे

# पंचगंगा-मीलन

लेखक :—द मो. चित्रे

१०९

या लेखाचे लेखक श्री. द. मो. चित्रे यांचा आमच्या वाचकांस आतां नव्यानें परिचय करून देण्याची जरूरी नाही. संतवाङ्मयाचा आणि त्यांतल्या त्यांत तुकोबा-राय नि समर्थ रामदास यांच्या वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास सखोल आहे. तुकाराम व रामदास यांच्या काव्य वाङ्मयांतील निवडक अभंग-ओव्यांचा त्यांनीं केलेला इंग्रजी अनुवाद प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

लोकमान्य टिळकांच्या संशोधन ग्रंथानें हें सिद्ध केलें की आर्यांचें मूलवस्ती-स्थान उत्तर ध्रुवाच्या आर्टिक प्रदेशांत होतें. कडाक्याच्या थंडीनें जीवन असह्य झाल्यामुळें हळुहळु ते दक्षिण दिशेस सरकूं लागले. आर्य हे टोळी टोळीनें रहात. त्यांच्या कांही टोळ्या युरोपखंडांत पसरल्या. व कांही खैबर खिंडींतून सिंधू, गंगा, यमुना आदि नद्यांच्या सुपीक प्रदेशांत उतरल्या या प्रदेशाला आर्यावर्त असें नांव पडलें. पुढें अगस्तऋषीच्या प्रेरणेनें आर्यांनीं दंडकारण्यांत पदार्पण केलें. त्यांचा द्रविडांशीं संपर्क झाला; आणि या संपर्कामुळें एक विशाल संस्कृती जन्माला आली. या विशाल संस्कृतींत निर्गुण आणि निराकर परमेश्वरानें सगुण आणि आकारयुक्त असें रूप धारण केलें. प्रभुरामचंद्राचें आगमन ह्या भरतखंडांत झाल. त्यांच्या पदस्पर्शानें ही भूमि पावन झाली. गंगा हर्षानें दुथडी वाहूं लगली. धन, धान्य, वाङ:मय कला यांनी लोकजीवन समृद्ध झालें आणि भारतवासियांनीं जय गंगे, भागिरथीं, असा उच्च स्वरानें उद्‌घोष केला.

कैकई मातेनें मागितला वर खरा करण्यासाठी प्रभुरामचंद्रांना दंड कारण्यांत यावें लागलें. प्रभूंच्या बरोबर कोमलांगी सीतामाई आली आणि बंधू प्रेमाचें प्रतीक असलेला लक्ष्मण हाही आला. गोदावरीनें ह्या त्रिमूर्तीचें हर्षभरानें स्वागत केल आणि वास्तव्या-साठीं आपल्या कांठीं जागा दिली. पंचवटीच भाग्य उदयाला आल. नाशिक एक पावनतीर्थ झालें. दंडकारण्यांत नवचैतन्य खेळूं लागलें. समाज निर्मितीसाठीं एक नवें स्थान निर्माण झाले. याच परिसरांत वज्रदेही हनुमान प्रभू रामचंद्रांच्या सान्निध्यांत आला, राम, लक्ष्मण, सीता, भरत शत्रूघ्न या पंचायतनाबरोबर अंजनीसुत हनुमंत लोकमानसांत कायमचा आसनस्थ झाला.

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज रामनामाचे 'पवाडे' गातांना म्हणतात, "रामनामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ॥ १ ॥ धृ ॥ धन्य तो एक संसारी । रामनाम जो उच्चारी ॥ ÷ ॥ रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक

त्याचा ॥ २ ॥ तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य जालों आम्ही ॥ ३ ॥ " आपापली कामें करण्यासाठीं लोक सकाळीच उठतात तेंच रामप्रहरांत. स्वतंत्र भारताचे पहिले अध्यक्षपद विभुषित करणारे डॉ. राजेंद्रप्रसाद उठतांच रामनामाचा जप करित. 'हे राम' हें नाम उच्चारीत महात्माजींनी शेवटचा श्वास घेतला. श्री तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे जो रामनामाचा जप करतो तो कृतकृत्य होतो !

रामनामाचा उच्चार करण्यासाठीं आळस करूं नका असे श्री तुकाराम महाराज आग्रहानें सांगतात. माझ्या दुकानांत तुम्हांला प्रथम रामनाम मिळेल असेही ते सांगतात. " रामनाम हाचि मांडिला दुकान । आहे वानोवाण घ्यारे कोणी ॥ १ ॥ ॥धृ०॥ नका रे करूं घेतां आळस । वांटितों तुम्हांस फुकाचें हें ॥ ÷ ॥ संचितासारिखें पडे त्याच्या हातां । फारसें मागतां तरी न ये ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हीं सांठविलें सार । उरलिया थार विचारितां ॥ ३ ॥ " विष प्राशन केल्यावर भगवान शंकरांनीं रामनामाचा जप केला आणि तें विष शीतल झालें. " रामनाम उत्तम अक्षरें । कंठीं धरली आपण शंकरें ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ कैसी तारक उत्तम तिहीं लोकां । हळाहळ शीतल केलें शिवा देखा ॥ ÷ ॥ हाचि मंत्र उपदेश भवानी । तिच्या चुकल्या गर्भादि योनि ॥ २ ॥ जुनाट नागर नीच नवें । तुका म्हणे म्यां धरिलें जीवें भावें ॥ ३ ॥ "

मानवाचा देह धारण केल्यावर मानवाची सुखदुःखें अनुभवावी लागणारच. प्रभु रामचंद्र वनवासांत आले आणि सीतेचें हरण झाल्यामुळें शोकाकुल झाले. " रामा वनवास । तेणें वसे सर्व देश ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ केलें नामाचें जतन । समर्थ तो नव्हे भिन्न ॥ १ ॥ वनांतरी रडे । ऐसे पुराणीं पवाडे ॥ २ ॥ तुका म्हणे ऋषिनेम । ऐसा कळोनि कां भ्रम ॥ ३ ॥

श्री तुकाराम महाराज आपला अनुभव कथन करतात, " राम म्हणे ग्रासो ग्रासीं । तोचि जेविला उपवासी ॥१॥ ॥धृ०॥ धन्य धन्य तें शरीर । तीर्थां व्रतांचें माहेर ॥÷॥ राम म्हणे करितां धंदा । सुखसमाधि त्या सदा । राम म्हणे वाट चाली । यज्ञ पाउला-पाउलीं ॥३॥ राम म्हणे भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या अंगी ॥४॥ ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे जीवन्मुक्त ॥५॥ जनक राजानें जीवन्मुक्ती मिळविली ती ह्याच प्रकारे.

राम नामाचा महिमा केवढा आहे याचें उत्तम वर्णन पुढील अभंगांत आहे, आई, ऋषि, कपि, लोक, सर्व प्रभु रामचंद्राच्या सहवासानें राम रूप झाले. राम रूप केली । रामें कौसल्या माऊली ॥१॥ ॥धृ०॥ राम राहिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासी । राम होय त्यासी । संदेह नाहीं हा भरवसा ॥÷॥ अयोध्येचे लोक । राम जाले सकळीक ॥२॥ स्मरता जानकी । राम रूप जाले कपि ॥३॥ रावणेसी लंका । राम आपण जाला देखा ॥४॥ ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ॥५॥ "

प्रभु रामचंद्राचा पदस्पर्श होतांच शीळ होऊन पडलेली अहल्या परत मानव देह-

धारी झाली " अहल्या जेणें तारिला नामें । गणिका परलोका नेली नामें ॥ रामनामाचा जप केल्यामुळें वाल्मीक ऋषि रामायण रचूं शकलें " तारक मंत्रश्रवण काशी । नाम जपतां वाल्मीक ऋषि ॥ " नाम जप जीवन मुनिजना । तुकयास्वामी रघुनंदना ॥

सीतामाईचें हरण झाल्यामुळें प्रभु रामचंद्रांना लंकेंत जावें लागलें. प्रभु धनुर्धारी असल्यामुळें लंकाधिपतीवर केवढें भीषण संकट ओढवलें याचें वर्णन श्री तुकाराम करतात, " पैल आला राम रावणासी सांगाती । काय निदसुरा निजलासी भूपति ॥१॥ ॥धृ०॥ अवघे लंकेमाजी जाले रामाचे दूत । व्यापिलें सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ॥ ÷ ॥ अवघे अवलंग तुझे वधियेले वीर । होईं शरणागत किंवा युद्धासी सादर ॥ २ ॥ तुका म्हणे एक्या भावे रामेसी । करूनी घेईं आतां संबधेसी तुटी ॥ ३ ॥ श्री तुकाराम महाराज विषय प्रतिपादन करण्यासाठीं दृष्टांत किती उत्तम देऊं शकतात याच उत्तम उदाहरण आहे. रावणाचा भवबंध श्रीरामाच्या साहचर्यानें तुटला ! पण एकरूप झाल्यावर जित कोण जेता कोण ?

गंगा, गोदावरी, शरयु प्रभु रामचंद्राच्या पदस्पर्शानें पुनित झाल्या. चंद्रभागा, इंद्रायणी पांडुरंगाच्या पदस्पर्शानें पुनित. झाल्या गंगा, गोदावरी, शरयु चंद्रभागा, इंद्रायणी पंचगगांचे मिलन म्हणजे राम, कृष्ण, पांडुरंग यांची एकरूपता श्री तुकाराम महाराज हर्षानें गातात, " रामकृष्ण गोविंद नारायण हरी । केशवा मुरारी पांडुरंगा ॥ १ ॥ ॥ धृ ॥ लक्ष्मी निवास पाहे दिनबंधु । तुझा लागो छंदु सदा मज ॥ २ ॥ तुझे नामीं प्रेम देईं अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें हेंचि गा मागणें । अखंड ही गाणें नाम तुझें ॥ ४ ॥

गंगा, गोदावरी, शरयू, चंद्रभाभा, इंद्रायणी या पंचगंगांचें मिलन म्हणजे भारताच्या एकात्मत्तेचें भव्य दर्शन ! सर्वधर्मी समानतेचा कंठरव उद्‌घोष !

# श्री साई सेवकाला आलेला अनुभव

लेखक : डी. बी. पोतनीस खडकी पुणें ३

पुलगांय येथें दिनांक १५ सप्टेंबर १९५८ रोजीं युनिट आकौटन्ट बि. एस. ओ पुलगांव या ऑफिसमध्यें काम करीत होतो. दुपारी साडेबारा वाजतां ऑफिस सुप्ररिंन्टेंथूत श्रीनिवासन यांनीं कंट्रोलर ऑफ डिफेन्स आकौंन्टस सदर्न कमांत पुणें येथून आलेले पत्र मला वाचावयास दिलें त्यातील मजकूर असा होता कीं, " लोकल ऑडीट ऑफिसर सेंट्रल अम्युनेशन डेपो पुलगांव यांनी माझा कॉन्फीडेन्शनल रिपोर्ट पाठविला नाही यामुळें प्रमोशन बाबत विचार करतां येत नाहीं "

मी हें वाचुन फार बेचैन झालों. काम सुचेना. लक्ष घरांतहि लागेना. चिडका स्वभाव बनला. गुरुवारी संध्याकाळीं श्री सदगुरु साईबाबाची मनोभावे पूजा केली. आरतीसाठी एस. पी. कॅाम्प पुलगांव मधील श्री साईभक्ताना बोलाविले. आरती, प्रसाद भजनाचा कार्यक्रम झाला. मी सद्‌गुरु साईमाऊलीला हांक घातली आणि फोटोवर गुलाबाचे फुल ठेवलें.

बाबा मी झालो व्याकूळ ।
कंठासीं आला रे प्राण ॥

आणि

धावधाली साईनाथा चालू नको मंद हा दोन प्रार्थनेनीं मी बाबांना आळविले श्री सदगुरूनी उजवा कौल दिला त्याचे फोटोवरील फुल उजवीकडे पडले माझ्या पेक्षां जमलेला श्रीसाई भक्तांना गुरुकृपेची साद ऐकू आली

दिनांक १५ आक्टोबर १९५८ रोजी सिडीएटि, सदर्न कमाण्ड पुणें या ऑफीस मधून माझी आर्डर आली. मला १ आक्टोबर १९५८ पासून प्रमोशन मिळाल्याचे समजले. धन्य ती गुरू माऊली. ॥ सदागुरुवचन हाची वेदान्त। सद्‌गुरु वचन हाची सिद्धांत ॥

# "ललाट रेखा"

कर्मांच्या अनेक विचित्र गती आपण पोथी पुराणांत ऐकतों. ललाट रेखेत लिहील्याप्रमाणें भोग भोगावे लागतात. राजा हरिश्चंद्र, राजा दशरथ अयोध्यापति रामराजा यांनाही भोग भोगावे लागले. धृतराष्ट्राला अंधत्व आले. पंडुराजाला कोड उठले अशा अनेक कथा आहेत. याविषयीं 'सिद्धांत बोध' या ग्रंथाचे आधाराने येथे वाचकांना एक कथा देत आहे—

लंकाधिपति रावण याला एक कन्या झाली ती अतिशय लावण्यवती, भव्य कपाळाची. हरिणीसारखे नयन, गोरवर्णाची अगदीं सौंदर्याची पुतळीच होती. रावणाचे आवडत्या कन्येवर फार प्रेम होते. तिला सभाळण्यासाठीं रावणाने एक गुलाम मुलगा ठेवला. त्याचा रंग काळाकुट्ट, पोटाचा नगारा, हातापायाचे पडवळ आणि नांकाचा शेंडा गेलेला असा कुरुप होता.

रावणाने आपल्या मुलीचे नांव भामिनिका असें ठेवले आणि गुलामाचे नांव रेखा ठेवले. रेखा गुलाम भामिनिकेला कडी खांदी हिंडवून खेळवित असे. रावण आपल्या कन्येला कधी कधी राजसभेत घेऊन जात असे. एकदा रावण अतिशय आनंदी होऊन त्याने मुलीला राजसभेंत आणलें. तो आपल्या कन्येचे रूप पाहून फार आनंदांत होता. त्याने आनंदाचे भरांत राजसभेमधें ब्रह्मास विचारले की ब्रह्मा माझ्या प्रियकन्येला कोणता नवरा मिळणार आहे तें पंचांग पाहून सत्य तें सांगा.

लंकाधिपतिचीचों आज्ञा तेव्हां ब्रह्मा म्हणाला, हे राजाधिराज भामिनिकेचा भ्रतार तुमचे घरचा गुलाम रेखा आहे. हें ऐकताच रावण क्रोधायमान झाला त्याने तावडतोब आपल्या सेवकांना आज्ञा केली कीं, रेखा गुलामाचा याक्षणीं शिरच्छेद करा अथवा त्वरीत समुद्रात फेकुन द्या. राजाचीच आज्ञा मग त्या सेवकांनीं किती वेळ लागणार ! त्यांनी त्या गुलामास तावडतोब समुद्रांत लोटून दिले याचवेळीं मणिमल्ल दानवाची पत्नि पुत्र प्राप्तिसाठीं समुद्रकाठीं शिवशंकराचें तप करीत होती. समुद्राचे लाटांबरोबर वाहात आलेला मुलगा पाहतांच तिनें समुद्रांत उडी टाकली आणि त्या मुलाला बाहेर काढले. शिवशंकर प्रसन्न होऊन आपल्याला पुत्र प्रसाद दिला म्हणून ती फार आनंदी झाली. त्याला घरी आणले आणि वैद्य औषधोपचार केले. मुलाची दैवरेषा उजळली. शरीराचा ठसा पालटला. मदनाचा पुतळा झाला. त्याचे नांव तिने चिंतामणि असें ठेविलें. चिंतामणिला राजा धिकारी केलें.

रावणानें आपल्या लाडक्या कन्येसाठी वर संशोधनास जोशीला सांगितले. जोशीनी वर संशोधन केले आणि रावणास सांगितलें कीं महाराज ! माणिमल दानवाचा पुत्र चिंतामणि अतिशय लावण्य सुंदर मदनाचा पुतळा आहे. आपल्या भामिनिकेला योग्य असा वर आहे. रावनानें त्यांस पसंत केले, आणि लग्नाचा शुभ मुहूर्त ठरविला. त्याला फार आनंद झाला. वऱ्हाड लंकेत आलें. रावण त्यांना सामोरा गेला आणि मोठ्या गौरवानें वऱ्हाडास लग्न मंडपात आणलें चिंतामणि बरोबर भामिनिकेचा विवाह झाला नंतर लज्जाहोमाचेवेळीं चिंतामणि भामिकेला कडेवर घेऊन लज्जाहोमास प्रदक्षिणा घालीत होता त्यावेळीं रावण ब्रह्मास विचारतां झाला कीं ब्रह्मा आतां मला तुमचें खरे भविष्य सांग तेव्हां ब्रह्मा म्हणाले.

" या सत्य गोष्टी । कर्म रेखा लिहीली ललाटी ॥<br>
भामिनिका रेखास पडली गाठी ।<br>
ही सत्य गोष्टी रावणा " ॥ १ ॥<br>
रेखा म्हणोन हांक मारा । धावत येईल समोरा ॥<br>
तरीच मी ब्रह्म खरा । वचन मानी यतार्थ ॥ २ ॥

येणें प्रमाणें हें ऐकून रावणानें रेखा म्हणून हांक मारली तोंच रेखा धांवत येऊन समोर उभा राहिला आणि म्हणाला राजाधिराज लंकाधिपते " मी पूर्वीचा तुमचा सेवक रेखा आतां जामात जाहलो "

वाचकहो !! ललाट रेषेप्रमाणें भोग भोगावें लागणार म्हणून चिंताक्रांत होऊन कोमेजून जाऊं नका. आपल्या अंगावर गुरुकृपेचे वज्रकवच असेल तर कळीकाळाचेहि भय राहाणार नाहीं.

श्री गुरुच्या सेवेंत मग्न होऊन जा कीं, ज्यांत स्वानंद आनंद मिळेल. संसार माया मोहाचा सोस धरण्या पेक्षां श्रीगुरूचे अविनाश चरणांला घट्ट धरून रहा. त्यांतच कल्याण आहे. मुक्ती आहे.

सद्भक्तांनो ! ज्याप्रमाणें हनुमंताला अनंत जन्माचे ऋणानुबंधनामुळें श्री रामाचा सेवक होता आले व श्रीरामाची सेवा करावयास मिळाली, तसेच या श्रीसाई सेवकाला श्री सद्गुरु साईनाथांचा अखंड सेवा घडण्यामधें अन्तर पडूं नये हीच प्रभुचरणी प्रार्थना आहे.

# नामदेवांची हिंदी कविता

************************

लेखक : ग. वि. कविटकर एम्. ए.

## लेखांक–तिसरा

श्री. ग. वि. कविटकर एम्. ए. हे संत नामदेवाच्या वाङ्मयाचे केवळ भोक्ते नाहींत तर त्यांच्या काव्यवाङ्मयाचा सखोल व संशोधनपूर्वक अभ्यास केलेले निष्ठावंत लेखक आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्यानीं अभ्यासू वृत्तीनें केलेलें नामदेवांच्या अभंगांचें —ज्ञात नि अज्ञात— संशोधन साईलीलेच्या वाचकांपुढें नित्यनेमानें ठेविलें आहे, याबद्दल वाचकांतर्फे त्यांना धन्यवाद.

नई पदावली

" भक्त शिरोमणी नामदेव की नई जीवनी, नई पदावली, ( सन १९४७ ) या लहानशा पुस्तकांत डॉ. मोहन सिंह दीवाना, यांनी इ. स. १६९५ त उपलब्ध झालेली नामदेवांची आत्मकथा व नामदेवांची पदे, रविदास, पीपा आणि रामानंद यांच्या थोड्या पदासह प्रकाशित केलेली आहेत. ही पदे लाहोर विद्यापीठांतून मिळविलेल्या जुन्या हस्तलिखितावरून इ. स. १९४७ पूर्वी नकलून ओरिएंटल कॉलेज मॅगेझीन, लाहोरमध्ये प्रथम प्रकाशित केली होती. या पदसंग्रहांत श्रीगुरुग्रंथांतील ११ आणि श्रीगुरुग्रंथेतर ३४ अशी एकूण ४५ पदें घेतली आहेत. पदांतील विषयवारीपेक्षा रागवारीची उपयुक्तता गायकास अधिक वाटते. वास्तव या संग्रहांत घेतलेली नामदेवांची रचना रागवारीने लावून विविध रागांतील पदांची गटवारी केली आहे. या पदांच्या वाटिकेंत पुढील अठरा रागांतील रचना मिळते. गौडी, आसा, सोरठ, धनाश्री, टोडी, बैराडी. तिलंग, बिलावल, रामकली, मारू, परज आसा, तुखारी, किदारा, भैरव, कानडा, खिमाच, कल्याण याशिवाय एक श्लोकहि आहे. यातील कांहीं पदे पूर्वी प्रसिद्ध झालेली असली तरी या पदसंग्रहांतील शब्दयोजना अधिक अर्थग्राही व अन्वर्थक वाटते. या संग्रहांतील पदावर अरबी, फारसी व पंजाबी भाषेची छाया दिसून येते. जसे.—

अरबी : महल, रहीमाँ, दावा, दुनिया, करीमाँ, अलाह ( अल्लाह ), हजूरि ( हजूर ), गनी.

फारसी : दिवाने, परवाना, यार, बाज़ीगर, बखशी, हाजरां ( हजरा ), दरीआऊ ( दरिया ), दरियाव, दिहिंद ( दिहन्दा, देहेन्द ), खुसखबरी, आमद ( आमदरफ्त )

पंजाबी : सोहंदा, पेखदा, गावंदा.

इत्यादि शब्द सर्वत्र विखुरलेले आहेत. हा नामदेवांच्या भारतभर भ्रमणवृत्तीचा आणि हिंदुमुस्लिम समाजास सामान्य भक्तिदर्शन तत्कालीन जनभाषेंत घडविल्याचा परिणाम होय.

दोन नामदेव वाद

या काव्यसंग्रहाच्या अकरा पानी प्राक्कथनांत या पदांचे निर्माते नामदेव व महाराष्ट्रांतील पंढरपूरचे अभंग–रचनेचे कर्ते आद्य नामदेव हे एकच होत हे आदिग्रंथांतील गुरु अमरदास, गुरु अर्जुनदेव आणि भाई गुरुदास यांच्या काव्यांच्या आधारे दाखविले आहे. याखेरीज आणखी कांही स्थळे नामदेवांचे कर्तृत्व दर्शविणारी आहेत.

मराठी वाक्संप्रदाय

या पदावलीतील वाक्संप्रदाय आणि विठ्ठलनामाचा उल्लेख या पदनिर्मात्याचे मराठीपण सिद्ध करतात. हा नमुना पहा:—

कांशी करवतले कंर मरै।, पृ० ४२. काशीस जलसमाधी घेऊन मरण पत्करले तरी रामनामाची त्यानें बरोबरी होत नाहीं. यांतील करवत घेणें ( जलसमाधी घेण ) हा वाक्संप्रदाय खास महाराष्ट्रांतील आहे पाणिपतच्या बखरींतहि ' किती एकांनीं राज्यलोभें प्रयागी जाऊन करवत घेतले असा तत्कालीन धार्मिक समजुतीची कल्पना देणारा हा वाक्स प्रदाय याच संदर्भात आढळतो.

विठ्ठलनामाचा उल्लेख

नामदेव व त्यांची माता यांच्या संवादांतील विठ्ठलाचा उल्लेख विचारांत घेण्यासारखा आहे :

> **काहूँ कै मन कछु बसै काहूँ कछु सुहाइ ।**
> **नाम के मन बीठुला छीपा हरिगुण गाई ॥ पृ० ४५ ॥**

( कोणाच्या मनांत कांहीं वसो अगर कोणाला कोणताहि विषय आवडो; नामदेवांच्या अंतःकरणांत मात्र एक परमेश्वर ( विठ्ठल ) छपून राहिलेला आहे, अंतरांत विठ्ठलाचे नामच आहे. ) आद्य नामदेव विठ्ठलभक्त होते हे लोकपरिचित आहे.

दुसरा एक उल्लेख : आणखी एक उल्लेख नामदेवांचे कर्तृत्व सूचित करणारा आहे. प्रकृतिभिन्न चैतन्य ( परब्रह्म ) पायाशिवाय चालते, कानाशिवाय ऐकते इत्यादि सांगताना नामदेवांनीं आपल्या शिंपी जातीच्या व्यवसायांतील उदाहरणें दिली आहेत व नकळत विभावना अलंकार साधला आहे.

> सूत बिन बुणत है ।

( ते परब्रह्म धाग्याशिवाय विणते; गजाशिवाय मोजते )

नामदेवांचा काळ

या पदसंग्रहाच्या प्राक्कथनांत मात्र एक गोष्ट खटकणारी आहे. ती म्हणजे डॉ. मोहनसिंहांनीं नामदेवांच्या कालासंबंधी केलेले अनुमान होय. अर्धमृत गाय जिवंत केल्याची कथा 'बिसमिलि गऊ देहु जीवाइ' या पदांत आली आहे. या कथेच्या आधारे डॉ. मोहनसिंह म्हणतात कीं या कथेंतील सुलतान दक्षिणेकडील बहामनी वंशांतील फिरोजशहा ( इ. स. १३९७ ते १४२२ ) असावा. त्यांना उपलब्ध झालेल्या स. १६९३ तील नामदेव जीवनवृत्तांतांत, या वृत्तांताचा लेखक अज्ञात आहे, या सुलतानाचे वा शहाचे नांव सलीम असे दिले आहे. ( पृ० ३ ). म्हणून महाराष्ट्रीय विद्वानांनीं स्वीकारलेला नामदेवांचा काल ( इ. स. १२७० ते १३५० ) एका शतकानें पुढे नेण्याचा पुनर्विचार या 'नामदेव की नई जीवनीच्या' आधारे होणे आवश्यक आहे, असे डॉ. मजकूरांचे म्हणणे आहे. प्राक्कथनांतील ही विचारसरणी इतिहासविरुद्ध असल्यामुळें तिचे निराकरण व्हावयास पाहिजे व ते मी पुढील परिच्छेदांत यथामति केले आहे.

( १ ) दक्षिणेकडील ज्ञानदेवकालीन संतांचे उल्लेखावरून ज्ञानदेव व नामदेव समकालीन होते हे निर्विवाद सिद्ध झाले आहे; व नामदेवांचे आयुर्मान ८० वर्षांचे होते. यावरून संत नामदेवांना १०० वर्षांपेक्षा अधिक वर्षांचे दीर्घायुष्य कल्पिल्या-खेरीज इसवी सनाच्या १५ व्या शतकापर्यंत ओढता येत नाहीं. याखेरीज, या पदसंग्रहाच्या इतर अंतर्गत पुराव्यावरून काय हातीं येते तें आतां पाहूं

( २ ) आदिग्रंथांतील ज्या पदांच्या आधारें नामदेवांचा काल एक शतक पुढे नेण्याची सूचना डॉ. मोहनसिंग करतात त्याच पदांत गंगा यमुनांचा उल्लेख आहे. त्यांत नामदेव म्हणतात—

**गंग जमुन जऊ उलटी बहै । तऊ नामा हरिकरता रहै ॥**

( गंगायमुना जेव्हां उलट्या वाहूं लागतील तोपर्यंत नामदेव हरीचे नाम घेतच राहील. म्हणजेच नामदेवाचे हरीस्मरण सतत अखंड चालू राहील. ) या गंगायमुनाच्या उल्लेखावरून गाय जीवंत केल्याची घटना सुलतान फिरोजशहा खिलजी ( इ. स. १२८२–१२९६ ) याच्या कारकीर्दीत दिल्ली येथे घडली असावी हे जास्त संभवनीय आहे.

( ३ ) या पदावलींतील पहिल्या पदांत अधम असूनहि भजन सामर्थ्यानें तरून गेलेल्या प्राचीन भक्तांत अजामिळ आणि गणिका यांच्याबरोबर सदनाचा ( सधनाचा ) नामदेवांनी परमेश्रद्धेनें उल्लेख केला आहे.

जो न पतीजै तौ साक्षी बतावउ ।
अजामिल्ल गनिका सधना ॥ पृ० ३५

( तुम्हाला नामस्मरणाचे महत्व पटत नसेल तर अजामिळ, गणिका, सदना या भक्तींची साक्ष देतो )

या पदांत उल्लेखिलेले सदना हे जातीने कसाई होते. त्यांचा जन्म सेहवान ( सिंध प्रांत ) मध्ये झाला होता. ते शालीग्रामाची पूजा करीत असत. पश्चात् संसाराची घृणा वाटून ते घराबाहेर पडले. अनेक दुःखद प्रसंग आले असतांहि ईश्वर नामाचा त्यांनी त्याग केला नाही किंवा सन्मार्गापासून ते यत्किंचितहि ढळले नाहींत. डॉ. रामकुमार वर्मा यांच्या मते त्यांचा काळ विक्रम चौदाव्या शतकाचा मध्यकाल. मेकॉलिफच्या मते नामदेव व ज्ञानदेव यांच्या तीर्थयात्रेच्या वेळी सदनाची एलोरा येथें कंदराजवळ भेटहि झाली होती आणि त्यानें दोन्ही संतांचे आदरातिथ्य करून त्यांच्याबरोबर तीर्थयात्रेंतहि भाग होता. ( २ ) नामदेवांचा काल [ सं. १३२७–१४०७ ] हा होय. म्हणजे सदना हे नामदेव समकालीन होते. या विवेचनावरून नामदेवाचा काल एक शतक पुढे ओढण्याचा प्रयत्न करणे इतिहास विसंगत होईल.

( १ ) हिन्दी साहित्य का आलोचनात्मक इतिहास, पृ० २१९.
( २ ) मेकॉलिफ : दि सिख रिलिजन, भाग ६, पृ० ३२.

४ ) याच पदावलींत नामदेव आणि त्रिलोचन यांचा संवाद आला आहे.

कहत नामदेउ सुनहु तिलोचन
बालक पालन पौढी अले ।
अन्तर बाहरि काज विरूधी
चीत सु बारिक राखी अले ॥ पृ० ५८

( ज्याप्रमाणे आई छोट्या बालकाला पाळण्यात निजवून आंत बाहेर कामकाज करण्यात व्यग्र राहूनहि ती त्या बालकाकडे मन लावून असते, त्याप्रमाणे, नामदेव म्हणतात, हे त्रिलोचना ! ऐक ! आपले मन नेहमीं परमेश्वरनामीं मग्न ठेवले पाहिजे, )

या संवादावरून संत त्रिलोचन हे नामदेव समकालीन होते. त्रिलोचनाचा निर्देश महीपतींनी भक्त विजयाच्या शेवटच्या अध्यायांत केला आहे आणि मोरोपंतांनी 'सन्मणिमालेंत' त्रिलोचनाचा नामनिर्देश करताना म्हटले आहे ते असे

गावा त्रिलोचनाभिध अखिल शुभ गुणार्थि कल्पनगवाणी ।
हरिजन यशींच रमशिल तरि काय मना, सुखासि मग वाणी ॥ १ ॥

नामादास यांच्या मते नामदेव व त्रिलोचन हे समकालीन होते. ३ त्रिलोचन हे पंढरपूर निवासी

३ विष्णु स्वामी सम्प्रदाय दृढ ज्ञानदेव गंभीर मति ।
नामदेव त्रिलोचन शिष्य सूर शशि सदृश उजागर ॥

भक्तमाल, पृ० ३६३.

( ज्ञानदेव हे विष्णुसंप्रदायी होते; नामदेव व त्रिलोचन हे चंद्रसूर्यासारखे त्यांचे दोन शिष्य होते. ) ते जातीने वैश्य होते. त्यांचा जन्मकाल सं. १३२४ ( सन १२६७ ) होता आणि त्यांचा नामदेवाशी स्नेहसंबंध होता इत्यादि माहिती देणारे पाश्चात्य व उत्तर भारतीय विद्वानांच्या लेखांत उल्लेख आहेत. या उल्लेखावरून नामदेव सदना व त्रिलोचन हे तिघे समकालीन होते हे स्पष्ट होईल. तेव्हां नामदेवांच्या काल निर्णयाच्या तारखा एक शतक पुढें ओढण्याचा प्रयत्न करणे हे इतिहास विरूद्ध असल्यामुळें कसे व्यर्थ आहे हे सहज लक्षांत येईल.


---

( अ ) जे. एन्. फर्कुहार— An dutlinc of the religious litetature of india पृ० २९०–३०० वरील टीप.

( आ ) मेकॉलिफ— The sikh religion, Vol. VI पृ० ७६.

( इ ) श्री. परशुराम चतुर्वेदी—उत्तरी भारत की संत-परंम्परा, पृ० १२३.

( ई ) डॉ. रामकुमार वर्मा—हिन्दी साहित्य का आलोचनात्मक इतिहास पृ० २१९.



# अध्यात्मरामायण, वाल्मीकिरामायण आणि रामचरितमानस

लेखक : कै. श्री. के. र. काशीक

तुलसीदास आपल्या ज्या एका अमर ग्रंथामुळें विश्वविख्यात झाले आहेत तो ग्रंथ म्हणजे 'रामचरित मानस' हा होय. यालाच 'तुलसी रामायण' असें म्हणतात. केवळ काव्यग्रंथ म्हणूनच नव्हे तर धर्मशास्त्राचाही एक प्रमाणग्रंथ आणि नीतिशास्त्राचा आधारग्रंथ या दृष्टीनेंही या ग्रंथराजाला अपूर्व महत्त्व लाभलें आहे. ज्या ग्रंथाची रचना एका सिद्धपीठावर झाली, ज्या ग्रंथाला प्रेरक प्रत्यक्ष श्रीशंकर, ज्या ग्रंथाचे नकलाकार प्रत्यक्ष श्रीगणपति, ज्या ग्रंथाचा आरंभ व अखेर अभिनव अशा दैवी वातावरणांत झाला, ज्या ग्रंथाचे लेखक प्रत्यक्ष रामरायाचा साक्षात्कार झालेले प्रतिभासंपन्न कवि, ज्याच्या रामायणाचा प्रत्येक शब्द मंत्रासारखा प्रभावी व प्रासादिक आहे असे सूरदासासारख्या भक्त शिरोमणीनें म्हटलें आहे आज साडेतीनशें वर्षें जो ग्रंथ उत्तर भारतीयांच्या जीवनाला दीपस्तंभाप्रमाणें अहर्निश प्रकाशदानाचें कार्य करीत आहे आणि म. गांधीपासून परदेशांतल्या श्रेष्ठ साहित्यभक्तांच्या जीवनावरही जो प्रभुत्व गाजवीत आहे, त्या ग्रंथाचें वैशिष्ट्य व रूपदर्शन करावयाचें आहे.

दैवीसृष्टीच्या अस्तित्वासंबंधीं जे संशयात्मे आहेत त्यांना कसेंही वाटो पण महात्मा श्री बालकरामजींनीं 'मानस' या शीर्षकाखालीं जी माहिती दिली आहे ती वाचून सश्रद्ध वाचकांना तरी मानसाचें महत्त्व अतिमानुष शक्तींनींही पाठिंबिल्याचें पटून त्यांचें हृदय उचंबळल्यावांचून रहाणार नाहीं. बालकरामजी आपल्या लेखांत म्हणतात—

'१३ एप्रिल १९३८ बुधवारीं प्रवर्धमानयोगावर हरिद्वार येथें हस्तनक्षत्रीं युगांतरव्यापी 'सन्तसभा' रात्रीं झाली. वस्तुतः नरलोकांची व्यवस्था करणारी हीच महान् सभा होय.

पंचक्लेशजवित (आवद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश हे पांच क्लेश) विकारांमुळें जगांत जें कांहीं बरें वाईट होतें. तें सर्व या सभेच्या व्यवस्थेप्रमाणें घडतें. या सन्तसभेचे अधिनायक 'सप्तर्षि' होत. जगांतल्या निरनिराळ्या भागांत जे महापुरुष उदयास येतात ते याच सभेचे सदस्य असतात. मानवाचें भाग्य म्हणूनच कर्मभूमि भारतवर्षांत पवित्र पर्वकालीं ह्या सदस्यांच्या उपस्थितींत या सन्तसभेचे अधिवेशन

होत असतें. या अधिवेशनांत सन्तलोकांकडून समयानुकूल अशा प्रकारचा उपदेश केला जातो कीं त्या कालचे प्रश्न त्यामुळें सहज सुटले जातात.

एकाद्याच भाग्यशाली पुरुषास हा उपदेश ऐकण्याचे भाग्य सन्तकृपेनें मिळतें आणि मौनभाषेंत विद्युद्वेगानें हा उपदेश जनतेच्या अंतःकरणांत प्रतिष्ठ होतो

कुंभमेळ्याच्या प्रसंगीं संतसभेत जो सर्वोमुखी उपदेश झाला तो ऐकण्याचे भाग्य हरीजीनियादेवी यांना लाभलें. ही फ्रेंच स्त्री यमुनातीरी राहात असून भजन करते. कुंभ-मेळ्याचे प्रसंगीं ही देवीही हरिद्वारला होती आणि तेथें जमलेल्या १० लाख मनुष्यांत फक्त तिला एकटीलाच हें सौभाग्य लाभले.

देवीजीकडून संग्रहीत केलेल्या उपदेशांपैकी "श्रीरामचरित मानस" शीं संबद्ध असलेलेच उपदेश पुढें आहेत—चारिउ वेद, पुरान अष्टदश, छया शास्त्र सब ग्रंथनको रस। तनमनधन संतनको सरबस, सार अंश संमत सबही की ॥

(आरति श्री रामायनजीकी)

तात्पर्य 'रामचरित मानस' या एकाच ग्रंथांत संपूर्ण संस्कृत वाङ्मय अंतर्भूत आहे. अगदीं वेदापासून तों छीट्याशा महिम्नस्तोत्रापर्यंत जितकें म्हणून सद्ग्रंथ आहेत तितक्यांचें सार 'मानसां' त आहे.

रामचरित मानस ऊर्फ तुलसी रामायण या ग्रंथराजाच्या सप्तकाण्डांत मिळून ४६८७ चौपाया असून दोहा, सोरठा आणि छंद मिळून १०७४ आहेत. बालकाण्ड आणि अयोध्या काण्ड हीं विस्तारानें मोठी असून, उत्तरकाण्ड, लंकाकाण्ड, अरण्यकाण्ड, सुंदरकाण्ड आणि किष्किंधाकाण्ड ह्यांचा विस्तार अनुक्रमानें संकुचित होत गेला आहे.

'रामायण' म्हटलें कीं भारतीयांच्या धार्मिक मनावर आज अनेक शतकें अप्रतिहत प्रभुत्व गाजविणारे दोन ग्रंथ डोळ्यापुढें येतात ते 'वाल्मीकि रामायण' व 'अध्यात्म रामायण' हे होत. त्यांतही 'अध्यात्म रामायणात श्रीराम चन्द्रांचें चरित्र आध्यात्मिक दृष्टीनें वर्णन केलें असल्यामुळें व व्यावहारिक सर्व प्रकारचें कौटुंबिक व सामाजिक आदर्श उज्ज्वलतेनें सतत नंदादीपाप्रमाणें डोळ्यांपुढें ठेवणारा म्हणून बहुजन समाजाला सदैव मार्गदर्शक होणारा एकमेव नितिग्रंथ म्हणजे वाल्मीकि रामायण हाच होय. आदर्श पिता, आदर्श माता, आदर्श पुत्र, आदर्श भ्राता, आदर्श पत्नी, आदर्श राजा, आदर्श प्रजा तात्पर्य भारतीय समाजजीवनांतील सर्वांगीण आदर्शांचे आराध्य व ज्वलत् चित्र वाल्मीकि रामायणानें रंगविलें असून एकप्रकारें भारताच्या सांस्कृतिक जीवनाची अभंग मूसच तयार करून ठेवली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं किंबहुना रामचरित्राच्या रूपानें कौटुंबिक व सामाजिक जीवननाच्या अत्युच आद-र्शांचा महासागर महर्षि वाल्मीकींनीं निर्माण करून ठेवला आहे. या सागराच्या

पृष्ठावर, मध्याशी वा तळांत आपापल्या शक्तीप्रमाणें प्रविष्ट होऊन प्रत्येकानें आपलें जीवनमौक्तिक घडवावयाचें आहे.

वाल्मीकि रामायण हा ग्रंथ कर्मप्रेरक, अध्यात्मरामायण ज्ञानप्रेरक आणि तुलसी रामायण हा भक्तिप्रेरक ग्रंथ एवढें म्हटल्यानें त्यांच्या तात्विक स्वरूपाची जरी सूत्रमय कल्पना आली तरी तिचा थोडासा विस्तार केल्यावांचून वाचकांस प्रत्येक रामायणाच्या वैशिष्ट्याचें स्वरूप पुरतेपणीं उमगणार नाहीं.

उदाहरणार्थ सुंदरकांडांत वाल्मीकि महर्षींनीं चित्रित केलेलें हनुमंतांचें चरित्र पहा. जेंव्हा मारुतिरायांनीं आकाशांत उडण्यापूर्वी महेंद्रपर्वताला पायाखालीं दाबलें आणि हत्तीच्या गंडस्थळांतून स्रवणाऱ्या मदाप्रमाणें त्यांतून अजस्र पाण्याच्या धारा वाहूं लागल्या तेव्हां भयानें माणसें, जनावरें, पशुपक्ष्यादि प्राणिमात्रांनीं इतका आरडाओरडा केला कीं त्या भयंकर आवाजानें जमीन, वनें, जंगलें आणि सर्व दशदिशा हादरून गेल्या. गंधर्वांना वाटलें कीं पर्वत भंगलाच म्हणून सुवर्णपात्रांतल्या मधुर भोजनाला लाथाडून आपापल्या बायकांसह ते आकाशांत निघून गेले. मारुतिरायांच्या ह्या विक्राळरूपाचें आणि प्रभावाचें दर्शन इतरत्र मिळणार नाहीं. दुर्गम अशा दुर्गरचनेमुळें लंका अगदीं अगम्य होती तरीसुद्धां साहसानें लंकेंत प्रवेश करून सीतेंचा शोध लावण्यांत मारुतिरायांनीं ज्या चातुर्याचा आणि व्युत्पन्न बुद्धीचा प्रत्यय दाखविला आहे त्याला इतरत्र तोड नाही. तुलसिदासांनीं मानसांत अनुमंतांच्या लंकाप्रवेशानंतर बिभीषणाची भेट करवून त्याच्या द्वारें सीताशोधास सहाय्य घेतलें आहे. पण वाल्मीकिनी हनुमंतांना आपल्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर सीतेचा शोध लावल्याचें दर्शविलें आहे. अशोकवाटिकेंत रामचरित्राचें यशोगान करून आपला परिचय करून देणें, पकडल्यानंतर रावणसभेंत आपल्या कार्याची सूचना देणें, शत्रूंनीं वेढून टाकल्यावरही निश्चिंतता धारण करणें, रावणाशीं संभाषण करण्यांत वाक्‌चातुर्य दाखविणें, वानरांसमोर सीतादेवींच्या कांहीं गोपनीय गोष्टी गुप्त ठेवण्यांत राजनीतिज्ञता व्यक्त करणें इत्यादि ज्या बहुमोल गुणांचें वर्णन वाल्मीकींनीं ज्या सहज सुंदर पद्धतीनें केलें आहे तसें वर्णन इतरत्र कुठेंही सांपडणार नाहीं.

रावण सीतादेवीजवळ प्रेमयाचना करित आहे त्यावेळीं जनकनंदिनीनें—

चरणेनाऽपि सव्येन न स्पृशेयं निशाचरम् ।
रावणं किं पुनरहं कामयेयं विगर्हितम् ॥

(सुंदरकाण्ड २६।१०)

'ह्या निशाचर रावणाला मी डाव्या पायानेंही शिवणार नाहीं मग त्याच्यावर प्रेम करण्याचें तर राहोच.' हजारों निशाचरी सीतादेवीची क्रूर भर्त्सना करित असतां अशा प्रकारचें तेजस्वी उत्तर जाज्वल्य पातिव्रत्याच्या श्रेष्ठ मूर्तीलाच शक्य आहेत. वियोगविधुरा सीतादेवीचें वर्णन करण्यांत वाल्मीकींनीं दाखविलेल्या उपमांची व्यूहरचना तर वाचकांनीं मूळांतच पाहिली पाहिजे. वाल्मीकींची प्रतिभा आणि प्रसाद यांचा मधुर संगम आणि सीतादेवीच्या पावित्र्याची नि प्रेमाची मंदाकिनी स्वैरपणें वहात असल्याचें रम्य दर्शन त्यांत वाचकांना होईल. तात्पर्य रामचरित्राची विशालता, उदात्तता आणि महनीयता यथार्थतेनें प्रकट करणारा आणि अलौकिक काव्यमाधुरीनें संपन्न असें वाल्मीकि रामायण हें महाकाव्य आणि तसाच तो इतिहास आहे. आपल्या प्राचीन महतेची नि संस्कृतीची परिपूर्ण कल्पना येण्यास वाचकांचा वाल्मीकीय रामायणाचें अध्ययन केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

अध्यात्म—रामायणांत सीतारामाच्या आध्यात्मिक रूपाचेंच वर्णन झालें आहे. रामपुरुष आणि सीता प्रकृति, राम परमब्रह्म आणि सीता ही त्याची अनिर्वचनीय माया आहे. ह्यांचाच लीलाविकास म्हणजे संपूर्ण विश्व देवतांकडून पृथ्वीचा भार उतरण्याची प्रार्थना झाल्यावर जगांत प्रगट होऊन आपला लीलाविस्तार दाखविणारी ही ब्रह्ममायाच. अध्यात्मरामायणांत वर्णन केलेलें संपूर्ण रामचरित्र हें याच अभिनव ब्रह्ममायेचें मानव-समाजाच्या उद्धारार्थ गाइलेलें पावन चरित्र होय.

यः पृथिवीभरवारणाय दिविजैः संप्रार्थितश्चिन्मयः ।
संजातः पृथिवींतले रविकुले मायामनुष्योऽव्ययः ॥
निश्चक्रं हतराक्षसः पुनरगाद् ब्रह्मत्वकाद्यं स्थिरां ।
कीर्तिं पापहरां विधाय जगतां तं जानकीशं भजे ॥

अध्यात्मरामायणांतील ग्रंथारंभींच्या या श्लोकावरूनही वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे. उत्तरकाण्डांतल्या सुप्रसिद्ध 'रामगीतेंत' तर अद्वैतवेदांताच्या प्रख्यात पद्धतीनें 'तत्त्वमसि' चें विशद वर्णन आलें आहे. अशाप्रकारें ज्ञानाच्या पायावर अध्यात्म रामायणानें रामचरित्र वर्णन केलें आहे.

तुलसीदासांनीं आपल्या रामचरित मानसांत रामचरित्राचें वर्णन करतांना भक्तिपक्षाचा आश्रय घेतलेला आहे. तुलसीदासांचे श्रीरामजी स्वयं भगवत्स्वरूप आणि श्री जानकीजी साक्षात् शक्तिरूपा आहे. रामाच्या रोमरोमापासून कोट्यावधी विष्णु, ब्रह्मा आणि शिव उत्पन्न होतात, तद्वतच सीताजीच्या शरीरापासून कोट्यावधि उमा, रमा आणि ब्रह्माणी यांचा उदय होतो अशी त्यांची सीतारामविषयक भावना आहे.

गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न ।
बंदउं सीताराम पद जिन्हहिं परम प्रिय खिन्न ॥

ज्याप्रमाणें वाणी आणि अर्थ किंवा पाणी आणि तरंग दिसण्यांत भिन्न वाटले तरी वस्तुतः अभिन्न आहेत, तद्वतच सीता आणि राम यांच्यांत बाह्यतः भिन्नत्व भासलें तरी आंतरिक एकता आहे.


तुलसीदासांनीं उत्तरकाण्डांत ज्ञान आणि भक्तीसंबंधीं जे आपले स्पष्ट विचार मोठ्या चातुर्यानें मांडले आहेत त्यांचा जरा खोल विचार केल्यास दासांच्या विचारांचें भक्तिमय स्वरूप स्पष्टपणें प्रचीतीस येतें. दास म्हणतात—'ज्ञानदीप प्रज्ज्वलित ठेवण्यास खूप परिश्रम नि प्रयास पडतात आणि इतकें करून थोड्याशाच विघ्नांनीं तो विझला जातो, पण भक्ति! ती साक्षात् चिंतामणीसारखी सुंदर आहे तिचा प्रकाश स्वयंभू नि अहोरात्र आहे. तिला तुपाची नि वातीची मुळींच गरज नाहीं. लोभाचा वायू तिला शांत करूं शकत नाहीं. तिच्यापुढें प्रबल अविद्येचा अंधार नष्ट होतो. काम-क्रोधादि खल तिच्यापाशीं फिरकूही शकत नाहींत. ज्याच्याशीं भक्तिचिंतामणी आहे त्याला मानसिक रोगही ग्रासूं शकत नाहींत. ज्ञान आणि भक्ति यांच्यांत जमीन अस्मानचा फरक आहे. म्हणून तुलशीदासांनीं या याबाबतींत आपला सिद्धांत खालील दोह्याच्या रूपानें स्पष्ट केला आहे.

ते म्हणतात—

सेवक सेव्य भाव बिनु भय न तरिअ उरगारि।
भजहु राम पद पंकज अस सिद्धांत बिचारि॥
बारि मथें घृत होइ बरु सिकता ते बरु तेल।
बिनु हरिभजन न भव तरिअ यह सिद्धांत अपेल॥

या थोड्याशा स्पष्टीकरणावरूनही तिन्ही रामायणांचें भिन्नत्व कां व कशांत आहे याची बरीचशी स्पष्ट कल्पना वाचकांस आल्यावांचून रहाणार नाहीं. ● ● ●

—पुरुषार्थ (एप्रील). आभारपूर्वक.



# नामसाधना

लेखक—प्रा. के. वि. बेलसरे

## १ प्रास्ताविक

आपल्याला भगवंताचे दर्शन व्हावें व आपले जीवन आनंदमय बनावें असें पुष्कळ माणसांना मनापासून वाटतें. तसें घडून येण्यासाठीं पुष्कळ माणसें मनापासून प्रयत्न देखील करतात. परन्तु प्रयत्न करणाऱ्या थोड्याच माणसांना भगवंताचें दर्शन घडून दिव्य आनंदाचा अनुभव येतो. याचें कारण असें कीं भगवंताचे खरें स्वरूप कोणते, खरा संबंध कोणता, त्याचें दर्शन व्हायचें म्हणजे काय घडायचें आणि दर्शन होण्याचा सरळ, सोपा, पण खात्रीचा अनुभवसिद्ध मार्ग कोणता या विषयीं शास्त्रशुद्ध कल्पना फारच थोड्याच लोकांना असतात. म्हणून भगवंताच्या नादीं लागलेल्या अशा बऱ्याच माणसांना देवाचें दर्शन होण्याचें बाजूलाच राहतें. उलट प्रापंचिक नुकसान सोसण्याचे कटु प्रसंग मात्र नशिबी येतात. भगवंताकडे नेणारा खरा मार्ग कोणता आणि त्याची प्रपंचाशीं जोड कशी घालावी म्हणजे मुलांबाळांत राहून नोकरीधंदा करून त्याचें आचरण कसें करावें हे दाखविण्याचा हेतु मनांत धरून ही पुस्तिका लिहीली आहे. वास्तविक सर्वसामान्य मानवी जीवन आणि भगवंताला वाहिलेले जीवन या दोन्हींमधें मूलतः विरोध नाहीं. कोणत्याहि कालीं, कोणत्याहि देशांत सामान्य माणूस कांहीं आशाआकांक्षा मनांत बाळगून जीवनांत धडपडत असतो, त्याचीं खरी दिशा नकळत आनंदाकडे म्हणजेच भगवंताकडे असते. या कारणानें भगवंताच्या साधनमार्गामधें मानवी आचारांचा, परंपरांचा, संस्थांचा, ध्येयांचा आणि मूल्यांचा अव्हेर करण्याचें प्रयोजन उरत नाहीं. फक्त त्यांचा अपुरेपणा, तात्पुरतेपणा, तोचतोपणा आणि बहिर्मुखपणा मनाला पटला म्हणजे भगवताच्या साधनेशीं त्या सर्वांची जोड घालता येते. अर्थांत अशी जोड घालण्याची युक्ति एकदा साधली की माणसाला प्रंपचांत राहून म्हणजे संसारामधे आपल्या वांट्यास आलेलीं सर्व कामें नीट

करून परमार्थ साधतां येतो. अशा रीतीनें प्रपंचपरमार्थाचा सुंदर समन्वय साधून जगलेलें जीवन केवळ पारमार्थिक जीवनापेक्षां अधिक समृद्ध, व्यापक, बोधप्रद, मार्गदर्शक, मनोहर आणि समजोपयोगी असतें हें काय सांगायला हवें! शास्त्रप्रचीति म्हणजे थोर साधुसंतांचे अनुभव, गुरुप्रचीति म्हणजे श्रीसद्‌गुरुंची अनुभवसंपदा आणि कांहींशी आत्मप्रचीति या तिन्ही प्रचीतींचा पाया घालून त्यावर पुस्तिकेंतील प्रमेयें रचल्यानें त्यांच्या खरेपणाबद्दल माझ्या मनांत तिळमात्र शंका नाहीं. ज्याला खरोखरच भगवंताच्या मार्गाला लागायचें असेल म्हणजे ज्याला आत्मज्ञानानें निर्माण होणारा दिव्य परमानंद भोगायचा असेल त्यानें ध्येयें सांगितलेला अभ्यास नीट समजून व मन लावून करावा. त्याच्या जीवनांत भगवंताच्या दर्शनानें प्राप्त होणारें पूर्ण समाधान खात्रीनें अनुभवास येईल, हा श्रीसदगुरूंचा आशीर्वाद या समाधानामागें आहे.

## २. भगवंताचे खरें स्वरूप :

मूळ परमात्म्याची अमूर्त व मूर्त अशीं दोन रूपें आहेत. निर्गुण ब्रह्म म्हणजे अमूर्त परमात्मा होय. तो केवळ सद्रुप असल्यानें "; तो आहे" इतकेंच त्याच्याबद्दल मानवी बुद्धीला सांगता येतें सगुण ब्रह्म म्हणजे मूर्त परमात्मा होय. तो सर्व मूल्यांचा, सर्व सद्‌गुणांचा आणि सर्व शक्तींचा मूलाधारा आहे. म्हणून ईश्वर हा अनादि, अनंत, अपार, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वगुणसंपन्न आणि पूर्ण आहे असें वर्णन करतात. ब्रह्मज्ञानी पुरुषांना सच्चिदानंदरूपानें तो अनुभवास येतो. सच्चिदानंदालाच प्रणव, ओंकार; शब्द ब्रह्म, नादब्रह्म आणि ईश्वर अशीं शास्त्रांत नांवें आहेत. त्यालाच संत भगवंत किंवा नाम असें म्हणतात. भगवंत काय किंवा नाम काय आनंदरूप आहे. अखंड उसळणाऱ्या परमानंदांतून हें विश्व निर्माण झालें, त्याच्यावरच तें जगतें आणि पुन्हा त्याच्याकडेच ते धांव घेत असते. आनंदांतून निर्माण झालेल्या या विश्वातील प्रत्येक वस्तूमध्यें हा आनंद अंतर्यामिरूपानें राहातो. म्हणून नाम म्हणजे प्रत्येक वस्तूचा आनंदरूप असलेला आत्मा होय. आनंद हेच भगवंताचें खरें स्वरूप समजावें.

## ३ खरें साधायचें काय:

आनंद शुद्धजाणीवरूप असल्यानें तो खरा जिवंत असतो. खरा जिवंत असल्यानें तो शक्तिमान, अखंड दंडायमान व गतिमान असतो. प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांतील हा आनंद त्याला आपल्याकडे खेचतो. म्हणून कळत नकळत प्रत्येक माणसाचा स्वाभाविक कल आनंदाकडे असतो. आनंद म्हणजे पूर्ण समाधान किंवा

अभग शांति होय. माणूस श्रीमंत असो वा गरीब असो, विद्वान असो वा अडाणी असो, स्त्री असो वा पुरुष असो, रोगी, भोगी वा योगी असो, समाधानासाठीं धडपड करतो. हें जरी खरें तरी जगांत बहुसंख्य माणसांना तेच मिळालेलें आढळत नाही. त्यांचा मार्ग चुकलेला असतो हेच त्याचें प्रमुख कारण होय. ज्यांतून समाधान मिळणे शक्य नसते त्यांतून तें मिळविण्याचा प्रयत्न केल्यानें माणसाचे सर्व श्रम व्यर्थ जातात. वस्तु समाधान देते अशी श्रद्धा माणूस ठेवतो. अमुक एक वस्तु आपल्याला मिळाली तर ती समाधान ज्यांच्यावर अवलंबून राहते अशा असंख्य वस्तु जगांत असतात. त्यांपैकीं सर्वच्या सर्व वस्तु एकदम कोणाहि एका व्यक्तीला मिळूं शकत नाहींत. अर्थात इच्छा असणाऱ्या सर्व वस्तू मिळवून मग कोणीहि पूर्ण समाधानी होऊ शकत नाहीं. या मार्गानें समाधानी झालेला आजपर्यंत आढळला नाहीं. शिवाय जोंपर्यंत वस्तु आपल्याजवळ नसते तोपर्यंतच तिचें भारी आकर्षण असतें. कोणतीहि वस्तु अपूर्ण असल्यानें ती मिळाली आणि भोगली की तिची सुख देण्याची शक्ति कमी होते, अर्थात तिचें आकर्षण कमी पडते. तसेंच आपल्यामधे जसजसा फरक पडतो तसतशा निरनिराळ्या वस्तु मनाला आकर्षित करतात. लहानपणीं खेळणीं, खिळे, काचा, गोट्या वगैरे फार आवडतात, इच्छाशा वाटतात. पुढें त्यांच्याबद्दल यत्किंचितहि आकर्षण उरत नाही. तरुणपणी व म्हातारपणी अगदी निराळ्याच वस्तु मन खेचून घेतात. बरें वस्तु स्वभावतःच अशाश्वत व बदलणारी असल्यानें ती नाहींशी होण्याची किंवा सुख देण्यास असमर्थ होण्याची भीति राहाते. वस्तूपासून सुख भोगणारा जो "मी" त्याला देखील हा नियम लागू पडतो. तोहि हळुहळू वयस्कर होत जातो आणि वाढत्या वयाबरोबर सुख भोगण्याची त्याची शक्ति स्वाभाविकपणें क्षय पावते. तरी वस्तूंचा हव्यास माणसाला चैन पडूं देत नाहीं. म्हणून नवीन नवीन वस्तु मिळविण्याच्या खटपटींत स्वतः जवळ असलेल्या वस्तूकडे त्याचें आपोआप दुर्लक्ष होतें. पण सर्वांत महत्वाची गोष्ट अशी कीं भोगणारा "मी" असतो व भोगायची वस्तू देखील जवळ असते. परंत तिचा भोग घेण्यास लागणारी परिस्थिति अनुकूल नसेल तर पुन्हां वस्तूपासून सुख घेतां येत नाहीं. तात्पर्य वस्तु जवळ नसून समाधान मिळत नाही तसेंच ती जवळ असूनहि समाधान मिळेल याची खात्री नाहीं. वस्तु एक आपल्याजवळ असते किंवा ती आपल्याजवळ नसते. या दोन्ही अवस्थांमध्यें तिच्यापासून समाधान मिळत नाहीं. म्हणून वस्तूमध्यें समाधानाचें स्थान नाहीं. असें निःसंशयपणें समजावें. वस्तू इंद्रियांना दिसतात म्हणून त्याना 'दृश्य' असें म्हणतात. समाधानाचें स्थान दृश्याच्या पलीकडे आहे. जोपर्यंत आपलें समाधान कोणत्यातरी वस्तूवर किंवा दृश्यावर अवलंबून असतें तोंपर्यंत त्याचा खरा अनुभव येणें शक्य नसते. खऱ्या समाधानाचा अनुभव येण्यास आपली

दृष्टि दृश्याच्या पलीकडे गेली पाहिजे. स्वतःचा देह, इतरांचे देह आणि नाना प्रकारच्या वस्तु मिळून आपली परिस्थिति असते. ती सर्वस्वी दृश्य असते. म्हणून खरें समाधान परिस्थितीवर अवलंबून राहात नाहीं. परिस्थितिनिरपेक्ष समाधान, वस्तू रहित समाधान हेंच पूर्ण समाधान होय. आणि तेंच खरें आपल्याला साधायचं आहे. परिस्थिति चांगली असो या वाईट असो, तसेंच देहाची अवस्था भली असो वा बुरी असो, त्यांच्यावर अवलंबून नसणारें समाधान मिळविणें हे आपलें खरें ध्येय आहे. कोणत्याहि परिस्थितीत अभंग राहाणारें समाधान हेंच भगवंताचें दर्शन झाल्याची खरी खूण आहे. समाधान अभंग राखण्याची विद्या शिकणें म्हणजे भगवंताचें साधन करणें होय. सर्व साधुसंत या विद्येमध्यें अति पारंगत असतात. प्रत्येक माणसामध्यें समाधान मिळविण्यास लागणारी सर्व सामुग्री असल्यानें सामान्य माणसांनादेखील ही विद्या साधुं शकते, परामार्थ किंवा अध्यात्मिक जीवन म्हणजे समाधानाचा अखंड अनुभव.



# शिरडी येथील श्री रामनवमी उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथील श्री रामनवमी उत्सव सालाबादप्रमाणें मि॥ चैत्र शु॥ ८ शके १८९० शनिवार दि. ६–४–१९६८ पासून श्रीक्षेत्र शिरर्डी येथें सुरू होईल. त्याची समाप्ति मंगळवार दि. ८–४–१९६८ रोजीं आहे.

म्हणून नम्र विनंती कीं आपण आपल्या कुटुंबीय मंडळीसह मित्रमंडळींना घेऊन श्रींच्या तीर्थप्रसादास यावें आणि बाबांचा आशीर्वाद घ्यावा, अशी संस्थानतर्फे विनंति आहे.

113




## फेब्रुवारी १९६८

या महिन्यांत बाहेरगावचे भक्तांची गर्दी गुरुवार व रविवार या दिवशी बरीच होत असे व इतर दिवशीं थोडी कमी होत असे विद्यार्थी विद्यार्थीनींच्या सहली शिर्डीस होत आहेत. कांहीं कलाकारांनीं श्रींचे समाधीपुढें हजेरी दिली. खालीलप्रमाणें—

### कीर्तन

सौ. इंदिराबाई देशपांडे ( न्याकुडर ) रविकीरणवाडा ब्राह्मणपुरी. मिरज.

संस्थानगवई विठ्ठल मराठे यांची किर्तनें नेहमीप्रमाणें झाली. शिवाय महाशिवरात्र व श्रीरामदास नवमी प्रित्यर्थ जादा कीर्तनें झाली.

### गायन

श्री. गजानन केरनाथ कदम ( आनंदविलास संगीत नाटक मंडळी )

( नट ) मुं सासवड जि. पुणें.

श्री. केशव बालकृष्ण कुलकर्णी बुधवार ६७७ पुणें. नं. २

श्री. पी. बी. म्हात्रे. गावदेवी मुंबई ( गायनदार्टी )

सौ. मिरा श्रीकृष्ण भागवत वांद्रे मुंबई ५१

### प्रवचन

श्री. विष्णू मल्हार सावळे चेंबूर मुंबई ७१

### महाशिवरात्र

महाशिवरात्रीनिमित्त श्रीसाईनाथांची पालखीची गांवातून मिरवणुक व कीर्तन असें कार्यक्रम झाले.

श्रीसाईबाबांची ५० वी पुण्यतिथी प्रचारकार्य आतापासून चालू असून त्या निमित्त एक कायम स्वरुपाचें (स्मारक) फाऊंडेशन योजनाही आखण्यांत आलेली आहे.

### हवापाणी

वळिवाचे एक दोन पाऊन शिर्डीत आले, बाकी हवापाणी उत्तम आहे.

## हांक

साई कृपाघना
करि रे करुणा।
निवारी आपदा
देई जीवदाना॥

कृपेची पाखर
घाली आम्हावर।
नेऊनि संकटे
सारीं पैलतीर॥

सदा तुजवरी
विसंबुनि राहूं।
फक्त तुला ध्याऊ
साई देवा॥

धांव झडकरी
धरि हृदयासी।
भक्त आतुरला
तुझ्या भेटीसाठीं॥

—सौ. श्री शहाणे, डोंबिवली

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | श्रीसाईसच्चरित्र | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ४–५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४–०० |
| ( ५ ) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| ( ६ ) | Glimpes of Indian Spirituality– | | by Pradhan | १–०० |
| ( ७ ) | Glimpes of Indian Spirituality | ( Telgu ) | | १–०० |
| ( ८ ) | श्री साईलीलामृत | ( मराठी ) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| ( ९ ) | साईबाबा–अवतार व कार्य | ( मराठी ) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | ( मराठी ) | श्री. देव | १–५० |
| (१५) | शीलधी | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१७) | Guide to Shirdi | ( English ) | | ००–१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | ( मराठी ) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| ( 1 ) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00–37 |
| ( 2 ) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां